वर्ष ४ थे अंक १४
जाने.-जून २०१६

National Research Journal
ISSN 2319-6289

आर्थिक घडामोडीचे त्रैमासिक

# अर्थविश्व

EDITOR :
DR. SANGITA TAKKAMORE



# SURYALAKSHMI COTTON MILLS LTD.

AN ISO 9001 : 2008, ISO 14001 : 2004 CERTIFIED COMPANY




**WORK**

9 Km, Ramtek Mouda Road, Village Nagardhan,
Taluka Ramtek, Dist. Nagpur, Pin : 441 106

**MOB :**

9923756521 / 9923756532

**E-MAIL :**

suryala_ngp@bsnl.in
slcmltd-rtk@suryalakshmi.com

**NAGPUR OFFICE :**

40, " Visawa" Tilak Nagar, West High Court Road,
Nagpur - 440 010

PHONE : (0712) 2545687, 2535467 FAX : 0712 - 2551260

National Research Journal
ISSN-2319 -6289
# अर्थविश्व
आर्थिक घडामोडीचे त्रैमासिक
National Research Journal of Economics, Social Science & Commerce

## अर्थविश्वसाठी लेख, जाहिराती, सदस्यत्व इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता

वर्गणी डिमांड ड्राफ्टद्वारे किंवा मनिऑर्डर किंवा चेकद्वारे खालील पत्त्यावर पाठवावी.

**डॉ. संगीता जी. टक्कामोरे**

तारण तरण महिला पत संस्था,
राधाकृष्ण वार्ड, रामटेक, जि. नागपूर-४४११०६
भ्रमणध्वनी- 9423408291
Email : takkamoresangita@gmail.com

*मुखपृष्ठ रचना, जाहिरात मांडणी व सजावट, अक्षर जुळवणी :*
*लक्ष्मी ग्राफिक्स डिझाईनिंग*
24, मौसम कॉलनी, न्यु सोमलवाडा,
मनिष नगर, नागपूर-05.
*भ्रमणध्वनी*-9881661434,
8055544656

- वर्गणी :-
  स्थायी सदस्य : रू. 3000/-
  वार्षिक सदस्य : रू. 1000/-
- शैक्षणिक संस्था व ग्रंथालय :
  त्रैवार्षिक : रू. 800/-
  वार्षिक वर्गणी : रू. 300/-
- अंकाची किंमत : 50 Rs.
  (खाजगी वितरणाकरिता)

**टीप : - वाचकांनी आपल्या सूचना व प्रतिक्रिया अवश्य पाठवाव्या. जेणेकरून अंक अधिकाधिक गुणवत्तापूर्वक व दर्जेदार काढण्याकरीता आम्हास वाव मिळेल...**

**National Research Journal**
**ISSN-2319 -6289**

# अर्थविश्व आर्थिक घडामोडीचे त्रैमासिक

**National Research Journal of Economics, Social Science & Commerce**

*वर्ष चवथे/अंक 14* *जाने-जून 2016*

मुख्य संपादक
***प्रा. डॉ. संगीता जी. टक्कामोरे***

संपादकीय पत्रव्यवहार :
***डॉ. संगीता जी. टक्कामोरे***
तारण तरण महिला पत संस्था,
राधाकृष्ण वार्ड, रामटेक
जि. नागपूर– 441106
भ्रमणध्वनी– 9423408291/ 9527379231
Email : takkamoresangita@gmail.com.

सल्लागार मंडळ :
***डॉ. श्रीनिवास खांदेवाले***
***प्रा. कमलाकर हणवंते***
***डॉ. अंजली कुलकर्णी***

विशेष सहयोग :
***निलम छंगाणी***
***डॉ. वर्षा गंगणे***

व्यवस्थापक :
***प्रा. नरेश आंबिलकर***
नरेन्द्र तिडके कला–वाणिज्य
महाविद्यालय, रामटेक.

त्रैमासिकात प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील मते त्या–त्या लेखकांची असतात. यामध्ये संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही.

## ॥ अनुक्रम ॥

- हात फिरे तिथे लक्ष्मी शिरे– स्वच्छतेतून समृद्धीकडे – नरेश दे. आंबिलकर ५
- स्वच्छ भारत अभियान – रमेश पं. गान ९
- स्वच्छ भारत अभियान : एक स्तुत्य उपक्रम –सुनिल शिंदे १२
- स्वच्छता आणि आधुनिक भारताचा विकास – प्रफुल्ल रावजी झोडापे १६
- आर्थिक विकासात स्वच्छता अभियानाचे महत्व – वर्षा गंगणे २३
- स्वच्छ भारत अभियान–एक सर्वेक्षण – संगीता टक्कामोरे २९
- सप्तपदी स्वच्छतेची– ज्योती व्ही. कवठे (रणदिवे) ३२
- ''स्वच्छ भारताच्या अंतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियान'' – ममता आर. साहू ३७
- ''स्वच्छ भारत अभियान आणि प्रसार माध्यम'' – ज्योती पांडे राय ३९
- स्वच्छता अभियान आणि ग्रामीण भारत – शुभांगी मुनघाटे ४२
- तरूणाईचे नवे धडे स्वच्छतेतून समृद्धीकडे – अनिल दे. गायकवाड ४६
- संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान : एक अध्ययन – प्रभाकर उ. आठवले ५०
- स्वच्छता विकासासाठी शारीरिक शिक्षण व खेळ – अजय श्री. बोंडे ५३
- भारतातील निर्माणी क्षेत्र स्थिती व समस्या – सुभाष आर. गुर्जर ५७
- **Swachh Bharat Abhiyan : An Overview** – Dr. Anil R. Bansod ६१
- "IMPACT OF SARVA SHIKSHA ABHIYAN ON ACADEMIC ACHIEVEMENT OF UPPER PRIMARY STUDENT'S OF CHANDRAPUR DISTRICT IN MAHARASTRA" – Vinod W. Dongarwar ६४

# • लेखकांना सुचना :-

१) प्रकाशनासाठी पाठविलेले संशोधनात्मक लेख विशेष करून संकल्पनात्मक व विश्लेषणात्मक असावेत. आढाव्यात्मक नसावे व लेखाची किमान शब्दमर्यादा २००० शब्दापर्यंत असावी. लेखाचाथोडक्यात सारांश लेखाच्या सुरूवातीलाच असावा. लेखामध्ये तक्ते व आकृत्या मर्यादित असाव्यात.

२) प्रसिद्धीसाठी पाठवावयाचे लेख/संशोधन निबंध संगणकीय अक्षरजुळवणी करून सी.डी.द्वारा पाठवावे. यासाठी मराठी व हिंदी फॉन्ट Shreelipi तील Shree-Dev7-0708 व इंग्रजीसाठी टाईम्स Times New Roman हे फॉन्ट वापरावे. संगणकीय लेखाची मुद्रीत प्रत व सदस्यत्वाचा अर्ज स्वतंत्र टपालाने संपादकाच्या पत्त्यावर पाठवावे.

३) लेखातील टीपा लेखाच्या अखेरीस द्याव्यात. संदर्भ ग्रंथाची यादी, लेखकाचे आडनाव, ग्रंथाचे शिर्षक, प्रकाशकाचे नांव, प्रकाशनाचे वर्ष व संदर्भाचा पृष्ठ क्रमांक देण्यात यावा.

४) लेखकांनी कृपया शोधनिबंध टाईप केल्यानंतर प्रूफ शुद्धलेखन आणि व्याकरण अचुक तपासून नंतरच अंतिम प्रिन्ट काढून पाठवावी. तसेच सोबत सध्याचा पासपोर्ट फोटो पाठवावा.

५) या शोधपत्रिकेसाठी निबंध किंवा लेख मराठी, हिंदी, इंग्रजी यापैकी कोणत्याही भाषेत लिहिलेला असावा व पाठविलेला लेख इतरत्र कुठेही प्रसिद्ध झालेला नसावा.

६) शोधनिबंधाच्या प्रकाशनाबाबत संपादक मंडळाचा निर्णय अखेरचा राहील.

७) 'अर्थविश्वाचे' सभासद होण्यासाठी मागे दिलेला फॉर्म भरून पाठवावा.

रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर व इतरही विद्यापीठातील प्राध्यापकांना आचार्य पदवी (अर्थशास्त्र, वाणिज्य, बिझनेस मॅनेजमेंट) प्राप्त झालेली असेल अशा प्राध्यापकांनी आपल्या कार्याची माहिती, फोटो व विद्यापीठाच्या पत्राची प्रत संपादकीय पत्त्यावर त्वरीत पाठवावी. तसेच अर्थशास्त्र विषयासंबंधी पुस्तक लिहिलेले किंवा प्रकाशीत केले असेल त्याचीही माहिती पाठवावी. त्यांना 'अर्थविश्व' मधून प्रसिद्धी दिली जाईल.

# संपादकीय संवाद.....

## 'एक कदम स्वच्छता की ओर'

२ अक्टूबर २०१४ को महात्मा गांधीजी के १४५ वे जन्मदीन के अवसर पर दिल्ली में भारत सरकार द्वारा 'स्वच्छ भारत अभियान' प्रारंभ किया गया । इस राष्ट्रीय स्तर के अभियान का उद्देश गलियों, सड़कों तथा अधो संरचना को साफ सुथरा करना है। मिशन का उद्देश १.०४ करोड परिवारों को लक्षित करते हुये २.५ लाख सामुदायिक शौचालय, २.६ लाख सार्वजनिक शौचालय हर एक शहर में एक ठोस अपशिष्ट प्रबंधन की सुविधा प्रदान करना है। इस मिशन का उद्देश सभी ग्रामीण तथा शहरी क्षेत्रों को कवर करना है ताकि दुनिया के सामने हम एक आदर्श देश का उदाहरण प्रस्तुत कर सके।

'अर्थविश्व' को इस मिशन से जोडते हुये प्रस्तुत अंक में 'स्वच्छ भारत अभियान' संबंधी लेख प्रस्तुत किये गये है। ये सभी जानकारीयाँ आप सभी के लिए महत्वपूर्ण तथा उपयुक्त साबीत होगी ऐसी अपेक्षा करती हूँ।

'अर्थविश्व' के उन्नती में आप सभी का सहयोग हमें निरंतर प्राप्त हो रहा है। इसे वैचारिक तथा आर्थिक दृष्टी से सक्षम करने हेतु आप सभी का भविष्य में भी हमें सहयोग मिलता रहेगा ऐसी आशा करती हूँ।

धन्यवाद .....

डॉ. संगीता जी. टक्कामोरे
प्रमुख संपादक 'अर्थविश्व'

# हात फिरे तेथे लक्ष्मी शिरे - स्वच्छतेतून समृद्धीकडे

नरेश दे. आंबिलकर
मराठी विभाग प्रमुख,
श्री. नरेंद्र तिडके महाविद्यालय,
रामटेक, जि. नागपूर. मो. 9423112181

संपूर्ण भारतात स्वच्छता अभिमानाचे पोवाडे गायले जात आहेत. मात्र महाराष्ट्रात गेल्या अनेक वर्षापासून सगळीकडे 'ग्रामस्वच्छतेचा मंत्र' घुमतो आहे. महाराष्ट्राला हा स्वच्छतेचा महामंत्र देण्याचे कार्य विदर्भातील सर्वश्रेष्ठ संत गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी केले आहे.

बाह्य स्वच्छता ज्याप्रमाणे महत्वाची त्याप्रमाणे आंतरीक स्वच्छताही महत्वाची आहे.

गाडगेबाबानी आपल्या हयातभर संपूर्ण महाराष्ट्रात स्वच्छतेचा जागर जागविला त्यांच्या या कार्यालय अभिवादन करण्यासाठी महाराष्ट्र राज्याने यापूर्वीच संत गाडगेमहाराज ग्रामस्वच्छता अभियानाची सुरूवात केली.

याच स्वच्छतेचा वारसा ग्रामगीतेच्या माध्यमातून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी प्रभावीपणे सांगितला आहे. राष्ट्रसंत म्हणतात,

हात फिरे तेथे लक्ष्मी शिरे ।
हे सूत्र ध्यानी ठेवोनी खरे
आपले ग्रामची करावे गोजिरे ।
शहराहुनी ।

ज्या ठिकाणी स्वच्छतेचा हात फिरेल त्या ठिकाणी लक्ष्मीचा वास राहिल. या स्वच्छतेतूनच समृद्धता येईल. आज खेड्यातील जनता शहराकडे धाव घेत आहे. शहरे फुगत चालली तर खेडी ओस पडत चालली आहेत. जर खेड्यांना स्वयंपूर्ण बनवून पूर्वीचे वैभव प्राप्त करून द्यावयाचे असेल तर स्वच्छतेला पर्याय नाही.

राष्ट्रसंत यासाठीच ग्रामस्वच्छतेचे महत्व पोटतिडकीने सांगतात.

हे गावीचे लोकं विसरले ।
आळसाद्वारे दुर्देव शिरले ।
दैन्य, दारिद्र्य सर्वत्र भरले ।
गावामाजी ।

या स्वच्छतेला ग्रामीण जनता विसरली आणि गावाचा उकिरडा झाला. गांधीजींनी खेड्यांकडे चला असा मंत्र दिला पण आधुनिक काळात शहरातील वरवरच्या रंगाला भुलून आज जो तो उठतो आणि शहराकडे धाव घेतो आहे. यामुळे गावे अंतिम घटका योजित आहेत. राष्ट्रसंत ही खंत व्यक्त करतांना म्हणतात

शहरी गेली गावची बुद्धि ।
शहरी गेली गावची समृद्धी ।
कष्टाळू शेती, हस्तकला सिध्दी
तीही गेली।

गावावरुन त्या देशाची परीक्षा केली जाते कारण गाव हाच देशाचा आरसा असतो. अनेकांनी

'गड्या आपुला गाव बरा' असे जरी काव्यातून कथेतून सांगितले असले तरी प्रत्यक्षातील स्थिती राष्ट्रसंत यथार्थपणे वर्णित करतात.

कागदी पुस्तकात काव्यात ।
खेड्याचे वर्णन दिव्य बहुत ।
परी वस्तुस्थिती पाहता तेथे ।
क्षणभरही राहवेना ।

कारण आज गावाची दुर्दशा झाली आहे. गाव आणि घाण हे जणू काही समीकरण झाले आहे. गावाच्या पिछेहाटीचे कारण ग्रामगीतेत दिले आहे.

रस्ते सर्व घाणीने भरले ।
आजूबाजूस उबके साचले ।
एकही काम न निभे तेथले ।
शहराविन ।
गावाचे मार्ग निष्ठेने व्यापले ।
आडकोने घाणीनी भरले ।
ठायी ठायी उकिरडे साचले ।
गाव वेढले गोदरीनी ।

या संतापासून प्रेरणा घेवून महाराष्ट्रातील उच्चशिक्षित युवकाने आपल्या गावाला नंदनवन बनविण्याचा प्रण केला आणि गांधीजीच्या आवाहनाप्रमाणे शहर सोडून हा युवक आपल्या गावात परत आला. एम. कॉम. अहमदनगर जिल्ह्यातील हिवरे बाजार या गावाला स्वच्छतेतून समृद्धता मिळवून दिली. आज हिवरे बाजार हे गाव जगाच्या नकाशावर आले आहे.

या स्वच्छतेतूनच समृद्धता प्राप्त केलेल्या या हिवरे बाजार ग्रामपंचायतीला राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय भेटी स्तरापर्यंत अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. देशविदेशातील अभ्यासक यात आदर्श व स्वच्छ गावाला आवर्जून भेटी देत आहेत.

गावांना गावातील स्वच्छता नावलौकीक मिळवून देऊ शकते हे राष्ट्रसंतांनी सांगितलेले वास्तव अहमदनगरच्या हिवरे बाजार या गावावरून स्पष्ट होते.

मात्र इतर गावे आजही त्याच दुर्गंधित आणि दारिद्र्यात जीवन जगत आहेत. सध्याच्या अशा गावांचे वर्णन त्यावेळी राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेतून हुबेहुबपणे केले आहे.

आपण तेवढे स्वच्छ रहावे ।
भोवती गलिच्छ वातावरणाची पाहावे ।
शाने सुमंगलता कधी न पावे ।
तन मन होई दुषित ।

अशाच दुसऱ्या आदर्श गावाचे नाव आहे. लेखामेंढा विदर्भातील नक्षलग्रस्त असलेल्शा गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी गाव असलेल्या लेखामेंढा या गावाने तर संपूर्ण भारतासमोर एक नवा आदर्श ठेवला आहे.

या गावातील देवाजी तोफा व गावकऱ्यांनी प्रशासनाला नमवून 'राव न करी ते गाव करी' ही म्हण प्रत्यक्षात आणली आहे. लेखामेंढा या गावाने परिसरातील जंगलाचे जीवापाड रक्षण करून या जंगलावर दावा केला होता. वनविभागाने मात्र या गावाचे हक हिरावून घेतले होते. शेवटी गावाने न्यायालयात धाव घेतली. अगदी सर्वोच्च न्यायालयापर्यंत ही लढाई लेखामेंढा गावाने लढली. शेवटी निकाल गावाकडून लागला.

आज लेखामेंढा गाव आदर्श गाव म्हणून घोषित झाले आहे. स्वच्छ व समृद्ध असलेल्या या लेखामेंढाचे आर्थिक व्यवहार इंटरनेटद्वारे होत आहेत. या गावातील ग्रामपंचायतीचे वार्षिक उत्पन्न एक कोटी रूपयापेक्षा जास्त आहे.

सर्वाधिक श्रीमंत ग्रामपंचायतीचा मान लेखामेंढा या गावाला मिळाला आहे. दारूबंदी, चराईबंदी, कुऱ्हाडबंदी असणाऱ्या या आदर्श गावाचे अभ्यासासाठी विदेशातील अभ्यासक इथे तळ ठोकून आहेत. स्वच्छ सुंदर असलेले लेखामेंढा निसर्गाशी आपली नाळ जोडून काय करीत आहे.

तर दुसरीकडे गावागावातील एकता भंग पावत चालली आहे. या गावांना वाचविणे त्यांना त्याच्या जीवनरस पुरविणे ही काळाची गरज आहे. कारण राष्ट्रसंत म्हणतात.

गाव हा विश्वाचा नकाशा ।
गावावरून देशाची परीक्षा ।
गावाची भंगता एकता ।
अवदशा येईल दशा ।
गावात एकता निर्माण व्हावी ।

गावाचे नंदनवन व्हावे यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

ज्या दिवशी गाव झाले एक ।
तेची उत्सवदिन अलौकिक
ओळखू न येती राव रंक
उत्सवामाजी ।

गावाची समृद्धता ही गावाच्या सौंदर्यावर अवलंबून असते. आता शहरे झकास व गावे भकास झाली आहेत. भारतातील गावांना नवचैतन्य प्राप्त करावयाचे असेल तर ग्रामगीतेचे अमृतकण गावांच्या हाती देणे गरजेचे आहे.

आज पंतप्रधानांनी स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत मोठ्या शहरांसाठी मोठ्या निधींची घोषणा केली आहे. मात्रा गावांना खासदार दत्तक ग्राम, आमदार दत्तक, ग्राम घोषित करावयास लावले आहे. मात्र यातून गावाचे कोणते कल्याण साध्य होईल हे कुणालाच सांगता येत नाही. शहरांसाठी मोठ्या प्रमाणात निधीची उपलब्धता करून देण्यात आली. मात्र गावांना आजही उपाशी राहण्याची वेळ आली आहे.

जर भारताला सुजलाम् सुफलाम् बनवायचे असेल तर स्वच्छतेची सुरूवात ग्रामपातळीवरुन करावी लागेल.

गावाच्या स्वच्छतेतून परमार्थ साध्य करण्यासाठी राष्ट्रसंत आवाहन करतात.

सर्वाभूती परमेश्वर ।
त्यासी बाधक नसे सत्य व्यवहार ।
करावे संघटनेने गाव सुंदर ।
ही पुजाची तयारी ।

गाव दिव्य वैभवाचा, सुखाचा वाटेकरी व्हायचा असेल तर प्रथम अवघा गाव एक व्हायला हवा. सर्वांची सुख दुःख समजून घेण्याची परस्परांनी सहाय्य करण्याची वृत्ती गावामध्ये वाढीस लागायला हवी तेवढाच विकास घडेल असे ते म्हणतात. राष्ट्रसंतांच्या डोळ्यात सुखी संपन्न अशा मंगलमय गोकुळस्वरूप ग्रामाचे स्वप्न सदैव तरळत होते. हे स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्यासाठी आपण काम करावे याचेही चिंतन त्याच्याजवळ होते. हे चिंतन आपल्या वाङ्मयातून त्यांनी समाजापुढे

मांडले. हे चिंतन जसेच्या तसे आपल्या ग्रामवासियांनी उचलले, अनुसरले असते तर एकेक गाव त्यांच्या कल्पनेप्रमाणे स्वर्गातील नंदनवन बनले असते.

ग्रामशुद्धी या अध्यायामध्ये राष्ट्रसंतांनी ग्रामस्वच्छतेचा आग्रह प्रतिपादन केला आहे. सर्व गावाचे कल्याण साधण्यासाठी प्रत्येक गावकऱ्याने सार्वजनिक कार्यात आपला वाटा उचलावा. वैयक्तिक नव्हे तर सामाजिक, सार्वजनिक स्वच्छतेकडेही प्रत्येकाने लक्ष पुरवाने असा विचार महाराज मांडतात.

राष्ट्रसंत केवळ बौद्धिक, आत्मिक, वैचारिक उन्नचीचाच विचार करीत नाहीत. तर या सर्वांबरोबरच ग्रामस्थांचे स्वास्थ, ग्रामस्थांचे सामाजिकच भौतिक पर्यावरणही विशुद्ध निकोप राखण्यासाठी काय करावे याचे मार्गदर्शन करतात. सामाजिक स्वच्छतेकडे दुर्लक्ष करणाऱ्या प्रदूषाणात भर घालणाऱ्या लोकांच्या कृती, वृत्ती महाराजांना व्यथित करतात. राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेद्वारे सकल समाज जागृतीचे चिंतन मांडलेले आहे.

राष्ट्रसंतांनी वैयक्तिक स्वच्छते इतकीच किंबहुना अधिकच सार्वजनिक स्वच्छतेची काळजी होती. सार्वजनिक स्थळे स्वच्छ, सुंदर, मन प्रसन्न करणारी असावीत असे ते म्हणत सगळ्यांची तने, मने प्रसन्न राहणे, विकास प्रवृत्त होणे अपेक्षित असेल तर सार्वजनिक स्थळांची सुंदरता फार महत्वाची आहे. कारण त्यातूनच सर्वांगसुंदर अशा समाजाचे उन्नयन सिद्ध होत असते.

ग्रामशुद्धीच्या प्रयोगातून ग्रायोद्धाराचे स्वप्न फुलवू पाहणारे संत तुकडोजीचे हे विचारधन ग्रामीण समाजाच्या उत्थानाचा मंत्र देणारे, त्याला कर्तव्य सन्मुख करणारे आणि विधायक वाटांची नव्याने निर्मिती करणारे असे आहे.

गावाने आपले आरोग्य सांभाळले, स्वच्छता, सुंदरता जपण्याचा प्रयत्न केला तर शहरापेक्षाही उत्तम अशी वस्ती या ठिकाणी निर्माण करता येईल.

ग्राम आरोग्याच्या संदर्भातील मुलभूत स्वरूपाचे चिंतन राष्ट्रसंतांनी मांडलेले आहे. रोग झाल्यावर उपाययोजना करण्यापेक्षा ते होऊ नयेत यासाठी आधीच काळजी घेण्याचा सल्ला ते देतात.

ग्रामउद्धाराचा मंत्र देणारे राष्ट्रसंत तुकडोजी तसेच स्वच्छतेचा मूलमंत्र कृतीतून शिकविणारे गाडगेबाबा या दोघांनीही आपल्या उक्ती आणि कृतीने स्वच्छतेतून समृद्धीकडे जाण्याचा मार्ग ठळकपणे दाखविला आहे. या स्वच्छतेला आत्मबुद्धी, विकास सार्वजनिक हिताशी जोडून यातूनच समृद्धता विकसित होईल हे भाकीत सहा दशकापूर्वीच सांगून आपले द्रष्टेपण या दोघांनीही सिद्ध केले आहे.

संदर्भ :

१) ग्रामगीता – राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
२) राष्ट्रसंत वैचारिकक्रांती – बाळ पदवाड
३) वैदर्भीरीती – डॉ. सुभाष सावरकर

◆◆◆

# स्वच्छ भारत अभियान

रमेश पं. गान
प्राचार्य, वाणिज्य विभाग प्रमुख
पी. डब्ल्यू. एस. महाविद्यालय, नागपूर.

भारताचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांनी म. गांधी जयंतीचे औचित्य साधून दि. २ ऑक्टोबर २०१४ रोजी भारतात स्वच्छता अभियान करण्याचे ठरविले. सरकारी आदेश काढून सर्व शाळा, महाविद्यालय, कार्यालय, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, लोकसभा, तसेच ग्रामीण व शहरी पुढारी, आमदार अन् खासदार यांना झाडू घेऊन झाडायला सांगितले. वैराग्यमूर्ती गाडगे महाराजांप्रमाणे स्वतः पंतप्रधानानी रस्ते झाडायला सुरूवात केली. स्वच्छतेचे पाठ जगालाही शिकविले. जगाला स्वच्छतेचे पाठ शिकविणारा हा भारताचा पहिला पंतप्रधान असेल. हा भारतीयांचा अभिमानाचा विषय आहे. तसेच गंगा नदी स्वच्छता अभियान राबविण्याचा त्यांनी निवडणूकीपूर्वी केलेला निर्धार निवडणूकीच्या विजयानंतर त्यांनी त्यासाठी स्वतंत्र विभाग निर्माण केला अन् त्यांची जबाबदारी मंत्र्याकडे सोपविली. शब्दाला जागणारा अन् निर्धारवादी म्हणून श्री नरेन्द्र मोदी ओळखल्या जातात. निर्मळ मनांत निर्मळ विचार राहू शकतात यांचा प्रत्यय जगाला आला आहे.

दहा वर्षापूर्वी 'शायनिंग इंडिया' हा प्रकल्प शायनिंग झाला असता पण हवा-पाणी- जमीन यांनी प्रदूषणाची कमाल मर्यादा गाठल्यामुळे हे राष्ट्र अस्वच्छतेसाठी ओळखल्या गेलेत. आपली शहरे घाणेरडी आहे असे नाही तर ग्रामीण भागसुद्धा घाणेरडा-गचाळ झाला आहे. अस्वच्छतेने अन् प्रदूषणाने जनजीवन उद्ध्वस्त झाले आहे.

जगातील वीस सर्वाधिक अस्वच्छ व प्रदूषित शहरापैकी १३ शहरे भारतात आहे. लुधियाना व कानपूर यानंतर भारताच्या राजधानीचा अर्थात दिल्लीचा नंबर लागते असे जागतिक पातळीवरून दिसून आले. दिल्लीतील वातावरण सकाळपासून संध्याकाळ प्रदूषित वायूने गच्च भरलेले असते. त्यात कार्बनडॉय ऑक्साईड व सल्फुरिक वायूचे प्रमाण जास्त आहे. जे मानवी, प्राणी यांना अत्यंत हानिकारक आहे.

हवेत प्रदूषित कण (पी.एम.) मोठ्या प्रमाणात आढळून येतात. एका घनमिटर मध्ये १०० एम.जी.एम. कणाची मर्यादा सुसह्य समजली जाते. पण दिल्लीत या कणांची मर्यादा ९५० झाली आहे. हे कण बारीक असतात अन् श्वासोश्वासातून आपल्या फुफ्फुसात सहजपणे जातात. कालांतराने आपल्या शरीराती पल्मोनरी ट्युशूना ग्रासून काढतात त्यामुळे अस्थमा, निमोनिया तसेच कर्करोग होण्याचा देखील शक्यता अधिक असते. यामुळे होणाऱ्या मृत्युमध्ये भारत जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे. या प्रकारामुळे २०१३-१४ या वर्षात सहा लाख मृत्युमुखी पडले.

विकसित राष्ट्रामध्ये यांचे प्रमाण यापेक्षा

अधिक आहे. भारतात दरवर्षी १.४ टन हरित वायू उर्त्सजित होते. यामुळे वेळी-अवेळी उष्णता पाऊस वाढते. अमेरिकेत हेच प्रमाण १.७ टन आहे. भारतापेक्षा जास्त आहे. जगाची सरासरी ५.३ टन इतकी आहे. विदेशात विमानातून बाहेर पडल्यावर हवेतून नाकाला झोंबणारा दरवळ जाणवतो. श्वास रोखल्या जातो. अन् जीव गुदमरतो. विकसित राष्ट्रमध्ये उर्जेच्या उत्पादनामुळे प्रदूषण वाढले आहे. अलिकडच्या काळात या राष्ट्रांनी उर्जेचा शिस्तबद्ध वापर करायला. सुरुवात केली आहे. पण भारतात तसे नाही. आपला देश अर्ध विकसित विकसनशील देशांत येत असल्यामुळे दोन्ही प्रकारचे प्रदूषण भारतात आहे. उत्तर भारतात वातावरणात जो काळा धूर मोठ्या प्रमाणात आढळतो. तो चलित वाहनामुळे अन् शेतातील गोवऱ्या, कचरा व गवत जाळल्यामुळे होतो. उपग्रहाच्या छाया चित्रामुळे हे सप्रमाण सिद्ध झाले आहे. यालाच ऐसियन ब्राऊन क्रॉऊड म्हटल जाते. या क्राऊडमुळे पावसाळा व हिवाळा उशीरा सुरू होतो असे हवामान तज्ञाचे मत आहे.

पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांनी सत्तेवर आल्यानंतर शंभर स्मार्ट शहरे निर्माण करण्याचा संकल्प केला आहे. त्यात त्यांचा मतदार संघ बनारसचा समावेश आहे. तसाच त्यांनी घेतलेल्या दत्तक गावाचाही समावेश आहे. रोज दुर्गंधीचा सामना करावा लागतो. त्याचा उगम वायु प्रदूषणामुळे होतो. नियंत्रणासाठी कोठेही उपाय योजना राबवली जात नाही. एकट्या दिल्ली शहात १८ लाख वाहने रोज फिरतात. त्यात रोज बाराशे गाड्यांची भर पडते. अर्थात त्याचा भयानक परिणाम वातावरणावर होतो. वाहने निर्मितीवरर नियंत्रण कसे आणता येईल. याचा शोध घेतला असता सौर उर्जेवर, विद्युत चालणारी वाहने, तसेच बॅटरीवर चालणारी यंत्र विकत घेणे, हा पर्याय उपाय चांगला ठरणारा आहे. त्यात अधिक संशोधन करून दूषित वायू वातावरणात अधिक प्रमाणात जाणार नाही हे संशोधकाने लक्षात घ्यावे. हे संशोधकासाठी एक आव्हान आहे पण ते प्रदूषणावर आळा घालण्यासाठी आवश्यक आहे.

वरील गोष्टीमुळे मानवाच्या जीवंन जगण्यावर प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे. त्याकरीता डिसेंबर ९७ मध्ये क्योटो समझोता मंजूर करण्यात आला. अन २००५ पासून अंमल बजावणी सुरु झाली. हा प्रश्न जागतिक विचारवंतांच्या विचाराचा प्रश्न झाला. अमेरिकेने क्योटो समझोत्याकडे पूर्ण दुर्लक्ष केले कारण कार्बनच्या उर्सजतेला नष्ट करण्यासाठी अधिक वेळ आणि खर्च लागणार होता. चीन आणि भारत यांच्यासह शंभर विकसनशील राष्ट्रांना वेगळे करण्यात आले. चीन हे राष्ट्र औद्योगिक दृष्ट्या मोठे असून 'जागतिक मानके' मानावी अशी अपेक्षा बाळगून भारताने स्वच्छतेकडे व प्रदूषणाकडे दुर्लक्ष केले आहे. परंतु अलीकडील भारत चीन समझोत्यातून २०२५ ते २०३० पर्यंत कार्बनचे प्रमाण २४-२८% कमी करण्याचे ठरविण्यात आले आहे. श्री नरेन्द्रभाई हे अत्यंत वैज्ञानिकदृष्टीने जगाकडे बघतात. वातावरणावर शास्त्रज्ञांचे वेगवेगळे मत येत असतात. म्हणूनच मोदीने आपले मोदी तंत्र निर्माण केले आहे. जे तंत्र म. गांधीच्या स्वच्छता अभियानावर असून आजच्या दृष्टीने विकसित आहे.

भारतांत सर्वत्र स्वच्छतेचा अभाव जाणवते.

त्यात घर-पाणी-रस्ता, परिसर, बगीचे, कार्यालय व सार्वजनिक स्थळे या ठिकाणी स्वच्छतेचे महत्व भारतीयांना जाणवत असले तरी त्यांच्याकडून कृती होत नाही. आज प्रार्थना मंदिर, देवळे, विहार, क्रुस, मश्जिद अशा पवित्र ठिकाणी घाण, कचरा जाणीवपूर्व तर कधी सवयीने केल्या जातो. स्वच्छता हे काम सफाई कामगारांचे तसेच सरकारी कनिष्ठ नोकरांनीच करावे असे जुनाट वादी मत आहे. यात परिवर्तन होणे आवश्यक आहे. ती सुरवात आपल्याला आपल्यापासून करणे अगत्याचे आहे. याचं भान भारतीयाने राखल्यास स्वच्छ भारत सहज तयार होऊ शकतो.

स्वच्छतेचे महत्व जाणून घेऊन म. गांधीजीने रस्ते, संडास, नाल्या साफ केल्यात; स्वच्छ केल्या. अन् भारतासमोर आदर्श ठेवला. सर्वोदय नेते जयप्रकाश नारायण, पंडित नेहरू, विनोबा भावे असे अनेक थोर मंडळी त्यावेळी होती. पण मिशन ज्याच्या नावाने चालत होते. ते म. गांधी गेल्यावर देश अनाथ झाला व मिशन थंड झाले. आज सर्वत्र विज्ञान युग निर्माण झाले. यामुळे धन कचरा, प्लास्टिक व इलेक्ट्रॉनिक कचरा यांचा सुकाळ झाला अन् पर्यावरणाचा नाश झाला. म. गांधीचे व्रत वैराग्यमूर्ती गाडगेबाबांनी स्वतः हातात झाडू घेऊन स्वच्छतेकडे वळले. स्वच्छतेचे महत्व ते गाव खेड्यातील लोकांना कीर्तनाद्वारे समजावून सांगायचे पण त्यालाही मर्यादा होती. ती मोहीम पुन्हा राष्ट्रसंतांनी जणमाणसात सुरु केली अन् आपल्या भजनातून, ग्रामगीता या ग्रंथातून समाज प्रबोधनाला सुरूवात केली. **'तुझ गावचि नाही कां तीर्थ' 'अरे वाजला रे डंका। घेऊ नको शंका। सुधरला गाव सारे। लोक लागले'** या खड्या आवाजातून अन् गीतातून माणसाचे मने कार्यान्वित झाली अन् महाराजानंतर ती मोहिम थंडावली. निरोगी आरोग्यासाठी स्वच्छता आवश्यक आहे.स्वच्छतेमुळे चांगले विचार येतात. कृतीत बदल होतो त्यामुळे आर्थिकता व समृद्धी वाढते मनाची प्रसन्नता वातावरणावर अवलंबून असते. आध्यात्माचे सुखही अनुभवता येते हे सारे त्यांनी ग्रामगीतेत सांगितले. महाराजांच्या समकालीनांनी ते सांभाळले पण पुढे काय? तर सारे अंधारमय झाले.

म. गांधीजीनी ज्या भारताचे स्वप्न पाहिले त्यात स्वातंत्र्यासोबतच स्वच्छ व विकसित देशांची योजना होती. त्याचे स्वरुप लक्षात घेऊन वैचारिक परिवर्तन होणे आवश्यक आहे. वैचारिक परिवर्तन झाले की कृतीला सुरुवात होते. आज आपण शपथ घेऊ या की 'मी माझ गाव, स्वतः स्वच्छ करील परिसरांची स्वच्छता राखील अन् सर्वांचे हात त्या कार्याकडे वळविला. जोपर्यंत प्रत्येक माणसाने मनापासून ठरविल्याशिवाय व आपली विचारधारा बदलविल्याशिवाय आचारविचार व व्यवहारात बदल केल्याशिवाय स्वच्छ भारत निर्माण होऊ शकत नाही. 'स्वच्छ भारत-निर्मळ भारत' होईपर्यंत माझे कार्य हे सतत चालू राहिल.

**जय हिन्द – जय भारत**

**संदर्भ :**

१. दै. महाराष्ट्र टाईम्स

२. दै. लोकमत

३. स्वच्छता अभियान, भारत सरकार.

◆◆◆

# स्वच्छ भारत अभियान : एक स्तुत्य उपक्रम

सुनिल शिंदे
भिवापूर महाविद्यालय, भिवापूर.

भारतामध्ये स्वच्छतेचा आदर्श फार पुर्वीपासूनच अनेक संत महात्म्यांनी दिला आहे. आपल्या सर्वांना लहाणपणापासूनच स्वच्छतेचे धडे प्राथमिक शिक्षणापासूनच मिळाले आहे. आपल्या देशात स्वच्छतेच्या कार्यासाठी व उपदेशासाठी संत गाडगेबाबा आणि महात्मा गांधी यांचे नाव आवर्जुन घेतले जाते. निष्काम कर्म, समाजसेवा व मानवसेवा हीच खरी ईश्वरसेवा मानणारे संत गाडगेबाबा हे आधुनिक संत होऊन गेले. त्यांनी माणुसकीचा संदेश देत स्वच्छतेचा व मानवतेचा नवा धर्म समाजात रूजवला. 'सेवा परमो धर्म' हा मुलमंत्र त्यांनी दिला. आयुष्यभर चिध्यांचे वस्त्र पांघरणारा, सारे गाव स्वच्छ केल्यावर तळहातावर भाकरी घेऊन खाणारे गाडगेबाबाबा यांनी आयुष्यभर खेडे, शहरातील रस्त्यावरील घाण काढली व रात्री कीर्तनाच्या माध्यमातून लोकांच्या डोळ्यातील घाण काढून मन निर्मळ स्वच्छ करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे बाबांचे क्रांतीकारक विचार लोकांना दीपस्तंभासारखे ठरले. भारताला स्वच्छतेची प्रेरणा महात्मा गांधीकडूनसुध्दा मिळाली साऱ्या जगाला आदर्शाची प्रेरणा देणाऱ्या गांधीजींनी दक्षिण आफ्रिका आणि भारतामध्ये श्रमदानातून स्वच्छतेचा नवा अध्याय आपल्या कृतीशिल कार्यातून इतिहासात नोंदविला आहे. स्वच्छतेच्या बाबतीत गांधींजी स्वतः झाडू घेवून अस्पृशांच्या व हरीजनांच्या वसाहतीत जात. रस्ते स्वच्छ करत. स्वच्छता गृहे स्वच्छ करत. स्वच्छतेचे महत्व जगाला पटवून देत. महात्मा गांधींनी म्हटले होते की, स्वच्छता स्वातंत्र आंदोलनापेक्षाही जास्त महत्वपुर्ण आहे. ज्या देशात स्वच्छता आणि शिस्त नाही, तो देश 'स्वतंत्र' असूच शकच नाही. महात्मा गांधी यांच्या वाराणसी भेटीबाबत आचार्य विनाबा भावे यांनी एक आठवण सांगितली होती. वाराणसी म्हणजे तिर्थक्षेत्र. गंगेच्या तिरावर वसलेले काशी विश्वेश्वराचे मंदिर म्हणजे हिंदूचे दैवत. काशी विश्वेश्वराच्या दर्शनाला यावे असा तेथील लोकांनी साहजिकच गांधीजींना आग्रह केला परंतु त्यांनी नकार दिला. लोकांना आश्चर्य वाटले. परंतु मंदिराचा परीसर अत्यंत अस्वच्छ असल्याचा दुर्लोकीक गांधीजींना कळला होता. त्यामुळे गांधीजींनी आधी स्वच्छता राखणार असाल तरच मंदिरात येईल असा स्पष्ट निरोप कळविला होता.

## महाराष्ट्रातील ग्राम स्वच्छता अभियान

शासकीय पातळीवरील स्वच्छता अभियानाच्या बाबतीत महाराष्ट्राचे तत्कालीन ग्रामविकास पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री स्व.आर.आर. पाटील उर्फ महाराष्ट्राचे लाडके आबा पाटील यांच्या नावाचा आवर्जुन उल्लेख करणे आवश्यक आहे. आर. आर. पाटील यांनी अस्वच्छ परीसर आणि वैयक्तिक स्वच्छतेच्या अभावामुळे आरोग्यावर होणारे परीणाम लक्षात घेवून २०००-२००१ पासून महाराष्ट्रामध्ये संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यास सुरवात केली. प्रचंड लोकसहभागाने या चळवळीला लोकचळवळीचे स्वरूप दिले. एवढेच नाही तर कोट्यावधी रूपयांची विकासकामेही लोकसहभागातून करण्यात आली. शुध्द आणि सुरक्षित पिण्याचे पाणी, घराची स्व्च्छता आणि अन्न काळजी, वैयक्तिक स्वच्छता, परीसर स्वच्छता, सांडपाण्याचे नियोजन आणि घनकचऱ्याचे व्यवस्थापण, मानवी

मलमुत्राची विल्हेवाट यासारख्या विभागात काम करून गावांनी उत्स्फुर्तपणे ग्राम विकासाचा पाया मजबूत केला.

**स्वच्छ भारत अभियान :**

महाराष्ट्र सरकारने सुरू केलेल्या संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाला गावे आणि गावातील लोकांचा मिळालेला सहभाग लक्षात घेवून केंद्र सरकारने भारतामध्ये २००३ पासून संपुर्ण स्वच्छता अभियान राबविण्याला सुरवात केली. १ एप्रिल २०१२ पासून या अभियानाचे नामकरण निर्मल भारत अभियान आणि २ ऑक्टोंबर २०१४ पासून भारताचे पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदी यांनी महात्मा गांधी यांच्या १४६ व्या जन्मदिनाचे औचित्य साधुन संपुर्ण भारताच्या कानाकोपऱ्यात स्वच्छ भारत अभियान राबविण्याची संकल्पना मांडली. आपल्या देशात एखाद्या कोणत्याही चांगल्या योजनेला सुरवातीला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळतो. परंतु नंतर अशा प्रकारची कोणती योजना आपल्या देशात सुरू होती हे सुध्दा आपल्या स्मरणात राहत नाही. तसेच संपुर्ण स्वच्छता अभियान आणि निर्मल भारत अभियानाच्या बाबतीत घडले. पंतप्रधानपदाची सुत्रे स्विकारल्यापासून नरेंद्र मोदी यांनी अनेक देशाचा दौरा केला तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, स्वच्छतेशिवाय विकासाला काहीच अर्थ नाही त्यामुळे त्यांनी भारतामध्ये स्वच्छ भारत अभियान चळवळीच्या स्वरूपात राबविण्याचा निर्धार केला आणि त्याची सुरवात स्वतः हातात झाडु घेऊन केली. याची दखल सर्वच राज्यांना घ्यावी लागली. लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र लढ्यामध्ये 'स्वराज्य हा माझा जन्मसिध्द अधिकार आहे' तो मी मिळविणारच ही साद दिली होती त्याप्रमाणे प्रत्येक भारतीयाने 'स्वच्छता हा माझा जन्मसिध्द अधिकार आहे तो मी मिळविणारच' असे स्वतःच्या मनाशी ठानले पाहिजेत. स्वच्छता ही केवळ नरेंद्र मोदी यांची एकट्याची जबाबदारी नाही. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी सुध्दा आपल्याला स्वच्छतेचा मंत्र दिला होता. लहानपणापासूनच आपण अभ्यासक्रमात तो शिकलोही पण तो आपण विसरलो. आणि या ना त्या प्रकारे थेंबे थेंबे तळे साचे या म्हणी प्रमाणे आपण घाणीचे साम्राज्य वाढवित गेलो. खरे तर स्वच्छतेबद्दल कोणी आपल्याला सांगु नये. आपण स्वतःच स्वच्छता ठेवली पाहिजे. अस्वच्छतेमुळे आपले,. कुटुंबातील व परीसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येते हे आपण जाणले पाहिजे. आपल्या सर्वांचा सर्वात जास्त पैसा औषधावर खर्च होतो तो अस्वच्छ राहणी, अस्वच्छ घर आणि अस्वच्छ परीसर ह्यामुळे म्हणून सर्वांनी आपल्या मनाशी पक्का निश्चय करून थोडी थोडी स्वच्छतेला सुरवात केल्यास संपुर्ण भारत स्वच्छ होईल. 'स्वच्छता जिते असे लक्ष्मि तिते वसे' हे लक्षात घेतले पाहिजे.

**स्वच्छ भारत अभियानाची उद्दिष्टे :**

१. देशाच्या ग्रामिण भागातील जीवनमानाची गुणवत्ता उंचावणे.
२. देशाच्या ग्रामिण भागात स्वच्छता कार्याची व्यापकता वाढविणे.
३. जाणीव जागृती आणि आरोग्य शिक्षण यातून स्वच्छतेच्या सुविधांची मागणी निर्माण करणे.
४. देशाच्या ग्रामिण भागातील शाळा आणि अंगणवाड्यातून स्वच्छतेच्या सुविधा निर्माण करणे.
५. स्वच्छतेच्या कमी खर्चाच्या सुविधा निर्माण करणे आणि योग्य प्रोत्साहन देणे.
६. पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे व अन्नपदार्थांचे होणारे प्रदुषण कमी करण्यासाठी उघड्यावर मलमूत्र विसर्जन करण्याच्या पध्दतीचे निमुर्लन करणे.

**स्वच्छ भारत अभियानाची भूमिका**

१. हे अभियान लोकाभिमूख व लोक सहभागावर आधारीत करणे.

२. मागणी आधारीत अंमलबजावणी.

३. वरील दृष्टीकोण स्विकारतांना जाणिव जागृती, शाळा व घरातील स्वच्छतेच्या सोयी आणि स्वच्छ पर्यावरणावर भर.

४. प्रत्येक कुटूंबासाठी शौचालय अनुदान देण्यापेक्षा गरीबातील गरीब कुटूंबाला प्रोत्साहनपर बक्षिस.

५. ग्रामीण भागात शालेय स्वच्छता कार्यक्रम हा महत्वाचा घटक.

६. लोकांच्या स्थाणिक गरजेप्रमाणे तांत्रिक सुधारणा, माहिती प्रसारावर आधारीत अभियानात पंचायतराज, सहकारी संस्था, महिला मंडळ, बचतगट आणि स्वयंसेवी संस्था यांचा समावेश.

७. स्वच्छता आणि आरोग्याच्या सवयी सुधारणे आणि त्या सवयींना अनुरूप असणाऱ्या बांधकामास परवडणाऱ्या आणि उपलब्ध होवू शकणाऱ्या सुविधा अनेकतंत्रामधून निवडून सर्व ग्रामिण स्तरावर स्वच्छता सुविधांचा योग्य बदल घडवून आणणे.

**स्वच्छता राखणे प्रत्येक नागरीकांचे कर्तव्य**

स्वच्छ भारताचे स्वप्न हे फक्त सरकारचे मंत्र्यांचे, सामाजिक संघटना किंवा समाजसेवकांचे नसून ते सर्वांचेच आहे. त्यामुळे देशातील सव्वाशे कोटी नागरीकांनी मिळून स्वच्छ भारताचे स्वप्न पूर्ण केले पाहिजे, असे आवाहन नरेंद्र मोदी यांनी या अभियानाला सुरवात केल्यानंतर, इंडिया गेट येथे विद्यार्थ्यांना संबोधित करतांना देशवासीयांना केले. या अभियानाला राजकारणाशी जोडू नये, हे देशभक्तीचे कार्य असून २०१६ पर्यंत भारताला स्वच्छ देश म्हणून जगासमोर आणायचे असल्याचेही त्यांनी सांगितले. शास्त्रीजींच्या 'जय जवान, जय किसान' या घोषणेला सर्वांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद देत धान्याची कोठारे भरली होती. त्यामुळे महात्मा गांधी यांचे 'क्विटइंडिया' चे स्वप्न पूर्ण झाले. पण 'क्लीनइंडिया' चे स्वप्न अजुनही अपूर्ण आहे. देश स्वच्छ ठेवणे हे सफाई कामगाराचे काम नाही. ही सर्वांची जबाबदारी आहे. मी प्रथम या देशाचा पुत्र आहे. आणि नंतर पंतप्रधान. त्यामुळे देश स्वच्छ राखण्याची आजपासून मी शपथ घेतो. त्याची सुरवात मी आजपासून मी माझे घर, गल्ली आणि गावापासून करणार आहे, असेही ते म्हणाले. भारताचे राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी सुध्दा लोकांच्या सहभागाशिवाय हे काम सरकार एकट्याने करू शकत नाही. स्वच्छ भारताचे लक्ष्य साध्य करण्यासाठी सर्व भारतीयांनी या अभियानात सहभागी होण्याची नितांत आवश्यकता असल्याचे म्हटले.

**ग्रामपंचायतीला वर्षाला २० लाख रूपये.**

स्वच्छ भारत अभियानासाठी देशातील सुमारे २ लाख ४७ हजार ग्रामपंचायतींना वर्षाला २० लाख रूपये देण्यात येणार आहेत. या रकमेतून ते आपले गाव स्वच्छ ठेवू शकतील असे पेयजल आणि स्वच्छता मंत्री नितीन गडकरी यांनी सांगीतले हे अभियान सरपंच शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या सहकार्याने राबविले जाणार असल्याची माहिती दिली.

**स्वच्छता अभियानासाठी स्वतंत्र कोष**

राज्यात राबविण्यात येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियानासाठी स्वच्छ महाराष्ट्र कोष स्थापन करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेला आहे. स्वच्छ भारत अभियानांतर्गत राज्यातील ग्रामिण आणि नागरी भागात राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी हा कोष वापरण्यात येणार आहे. मुख्यमंत्री या कोषाचे अध्यक्ष असतील. तसेच पाणी पुरवठा व स्वच्छतामंत्री, नगरविकास राज्यमंत्री, मुख्य सचिव, अॅप्पर सचिव (वित्त), प्रधान सचिव (नगर विकास) प्रधान सचिव (पाणी पुरवठा) सचिव (नगर विकास २) यांचा सदस्य म्हणून समावेश असून स्वच्छ महाराष्ट्र अभियानाचे

राज्य संचालक कोषाध्यक्ष असतील. स्वच्छ भारत अभियानाच्या अमंलबजावणीसाठी वैयक्तिक शौचालये, सामुदायीक शौचालये आणि घनकचरा व्यवस्थापन यासाठी येणाऱ्या खर्चासाठी या कोषातील निधिचा उपयोग होणार आहे.

## उपसंहार

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेले स्वच्छ भारत अभियान सध्या देशाच्या प्रगतीसाठी व माणसांच्या जीवनमान बदलण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. मोदींच्या स्वच्छ भारत अभियानामुळे ढेपाळलेली प्रशासन यंत्रणा पुन्हा जागी झाली आहे. परंतु हे अभियान केवळ फार्स ठरू नये कारण मोंदीसोबतच अनेक उद्योजक आणि सिनेकलावंत स्वच्छतेकरीता हातात झाडू घेवून रस्त्यावर उतरले असल्याचे आपण सर्वांनी पाहीले आहे. परंतु या सर्वांनी त्यांची ही सुरवात फोटो काढून मिडीया-मध्ये सर्वांग प्रसिध्दीसाठी चमकोगीरीसाठी केलेले कार्य ठरू नये. हे अभियान म्हणजे प्रसिध्दीसाठी केलेली स्टंटबाजी ठरू नये. आपण जबाबदारीने हातात झाडू घेतला आहे याची जाणीव ह्यापुढेही सर्वांनी ठेवणे गरजेचे आहे. एक दिवस हातात झाडू घेवून हे अभियान यशस्वी होणार नाही यासाठी प्रभावी इच्छाशक्तीची गरज आहे. स्वच्छता अभियानाकरीता जनजागृतीची गरज असून प्रशासन व समाजामध्ये समन्वयाची गरज आहे. आपला परिसर स्वच्छ ठेवणे ही प्रत्येक नागरीकांची जबाबदारी असुन अस्वच्छतेस नागरीक व प्रशासन दोघेही जबाबदार आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. समाजातील प्रत्येकाने स्वच्छता अभियानात सहभागी होणे गरजेचे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छतेबाबत चांगलं पाऊल उचललं आहे. कारण देशात व राज्यात सर्वत्र सार्वजनिक ठिकाणी कचरा, पान-खर्रा, तंबाखू खाऊन कुठेही पिचकाऱ्या मारणे व कुठेही थुंकण्याचे प्रमाण बरेच मोठे आहे. शासकीय कार्यालयात गेल्यास याची प्रचीती येईल. शिस्त व स्वच्छतेबाबत सुशिक्षितांपासून अशिक्षितही अग्रेसर आहेत. गांधी जयंतीच्या निमित्ताने सुरू केलेल्या स्वच्छता अभियानाचा उद्देश स्तुत्य असला तरी अंमलबजावणी योग्य दिशेने व्हायला हवी. पालकांनी स्वतःच्या कृतीने बालकांच्या मनावर स्वच्छतेचे अनन्य साधारण महत्व कसे बिंबवायचे याचे मार्गदर्शन पालक सभांमधून करायला हवे. शालेय अभ्यासक्रमास पालक समुपदेशनाची जोड देण्याचा देशव्यापी कार्यक्रम शाळा-महाविद्यालयांमधून राबवावा. कचराकुंड्या व डम्पिंग ग्राउंडबाबत स्पष्ट नियम करून त्याचे पालन न झाल्यास काय व कशी कारवाई करायची याबाबतही जनतेस माहीती द्यावी. दुकाने, मुख्य रहदारी, बाजार, शाळा, कार्यालये आणि वार्ड, वस्ती इत्यादी ठिकाणी कचरा पेटी ठेवावी व लोकांना कचरा पेटीमध्येच टाकायची सक्ती करावी. शहरांप्रमाणेच प्रत्येक गावामध्ये कचरा उचलणाऱ्या गाड्यांची व्यवस्था करावी आणि कचरा नियमितपणे उचलला जातो आहे यावर देखरेख ठेवावी. आपल्या घरातील कचरा काढून घर साफ करणे ही प्रकृती आहे आणि घर साफ करून कचरा रस्त्यावर टाकणे ही विकृती आहे. पण घर साफ करून कचराकुंडीत टाकणे ही संस्कृती. समाजाच्या विकृतीचे रूपांतर संस्कृतीत झाले तर भारत खरोखरच कचऱ्यापासून मुक्त होईल अशी आशा करायला हरकत नाही.

## संदर्भ


१. योजना - सप्टेंबर २००७
२. कुरूक्षेत्र - जानेवारी २०१३
३. वर्तमानपत्रे-तरुण भारत ५. ऑक्टोंबर २०१४ सकाळ ३ ऑक्टोंबर २०१४ लोकमत ८ ऑक्टोंबर २०१४


◆◆◆

# स्वच्छता आणि आधुनिक भारताचा विकास

प्रफुल्ल रावजी झोडापे
वाणिज्य विभाग प्रमुख
सोनोपंत दांडेकर महाविद्यालय पालघर,
जि. पालघर, ता. पालघर-४०१ ४०४

**प्रस्तावना :**

स्वच्छ व सुंदर भारताचे स्वप्न हे फक्त भारत सरकारचे नसावे, तर ते प्रत्येक भारतीयाचे असावयास पाहिजे. स्वच्छ आणि सुंदर भारताची जगामध्ये ओळख निर्माण केल्या शिवाय भारताची चांगली प्रतिमा निर्माण केल्या जाऊ शकत नाही. भारतात अनेक रूढी, परंपरा, देव, धर्म मानले जातात. परंतु स्वच्छतेच्या बाबतीत आजही २१ व्या शतकात भारतीय जनात मोठया प्रमाणावर जागरूक नाही. त्यासाठी सरकारला अनेक प्रयत्न करावे लागत आहेत. मा. नरेंद्र मोदी सरकारने २ ऑक्टोबर २०१४ रोजी स्वच्छतेच्या बाबत देशव्यापी "स्वच्छ भारत अभियान" हाती घेतला या अंतर्गत लोकांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी, शौचालय, सांडपाणी आणि कचऱ्याची विल्हेवाट यासारखे कार्यक्रम हाती घेऊन राष्ट्रीय उत्पन्न वाढवणे लोकांचे आरोग्य सवंर्धन करणे यावर भर दिला आहे. भारतात (अस्वच्छतेमुळे) डायरिया मुळे दरवर्षी ८ लाख मुले मृत्यु मुखी पडतात व जनतेच्या आरोग्यावर प्रती व्यक्ती प्रती वर्ष ६,७००/- खर्च केला जातो. या गोष्टींवर आळा घालण्यासाठी "स्वच्छ भारत" मोहीम अंतर्गत भारताचा विकास साधन्याचा प्रयत्न भारत सरकार करत आहे.

**स्वच्छतेची व्याख्या :**

"मानवनिर्मित तयार होणारा कचरा सांडपाणी मानवी मलमुत्राचे योग्य व्यवस्थापन करून त्याचे मुळ रूप बदलुन त्यापासुन काही उत्पादने (खत, बायोगॅस, शेतीसाठी पाणी, विद्युत इ.) तयार करणे म्हणजे स्वच्छता अशी सर्व साधारण व्याख्या करता येईल."

समाजाची प्रतिष्ठा, विकास, शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य हे स्वच्छतेचे मूलभूत आधार आहेत.

"स्वच्छता हा मानवी जीवनाचा मुलभूत हक्क आहे. कारण मानवी जीवनात स्वच्छतेला अनन्य साधारण महत्व आहे"

**स्वच्छते संबंधी विचार :**

१) सांडपाण्याची दुरावस्था दूर होणे हे सक्तीचे हवे त्यामुळे जंताचा त्रास होतो. जे लोक स्वच्छतेचे पालन करतात त्यांना जंत होऊ शकत नाही. आजार केवळ गरीबीमुळे होत नाही तर स्वच्छतेकडे केलेल्या दुर्लक्षामुळे पसरतात.

२) स्वच्छता करणे म्हणजेच देवभक्ती करणे, आपण देवाचे आशिर्वाद जसे अस्वच्छ

देहाणे घेऊ शकत नाही. तसेच, अस्वच्छ मनाने देखील घेता येत नाही स्वच्छ देह अस्वच्छ शहरात राहु शकत नाही. (महात्मा गांधी - यंग इंडिया, १९ नोव्हेंबर १९२५)

३) महात्मा गांधी म्हणतात - "स्वच्छता स्वातंत्र्या पेक्षा जास्त महत्वाची आहे".

४) संतगाडगे बाबांनी स्वच्छतेचे महत्व ओळखुन शिक्षणाबरोबर स्वच्छतेचा महाराष्ट्रात प्रचार प्रसार केला.

५) मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणतात "शौचालये मंदीरापेक्षा जास्त महत्वाचे आहेत".

**सार्वजनिक स्वच्छता :**

सार्वजनिक स्वच्छतेत प्रामुख्याने पुढील बाबींचा समावेश होतो.

अ) हवेची स्वच्छता, ब) पाण्याची स्वच्छता, क) घराची स्वच्छता, ड) मैला (विष्ठा) वाहुन नेणारी व त्याचा विनियोग करणारी व्यवस्था.

**स्वच्छ भारत अभियानाची सुरूवात :**

मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २ ऑक्टोबर २०१४ गांधी जयंतीच्या दिवशी स्वच्छ भारत अभियानाची सुरूवात केली आणि १५० व्या गांधी जयंतीच्या वर्षापर्यत म्हणजेच २ ऑक्टोबर २०१९ पर्यंत ही मोहिम जोमाने राबवण्यात येणार आहे व यश संपादन करण्याचे प्रयत्न करण्यात येणार आहेत. या मोहीमे अंतर्गत संपुर्ण भारतीयामध ये स्वच्छते बाबत जागरूकता निर्माण करणे. रेल्वे, बस स्टॅण्ड, रस्ते, लोकवस्ती, औद्योगिक परिसर इत्यादींच्या स्वच्छतेवर भर देण्यात आला आहे.

**स्वच्छ भारत अभियानाचे उद्दिष्टये :**

१) घनरूपी आणि द्रवरूपी कचरा निर्मुलना साठी यंत्रण निर्माण करणे., गावाची व शहरांची स्वच्छता राखने आणि सांडपाण्याची व्यवस्था निर्माण करणे.

२) स्वच्छ आणि सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे.

३) उघडयावर शौचास जाण्यास प्रतिबंध घालणे.

४) वैयक्तिक, सामुदायिक शौचालय बांधणे.

५) शौचालयाचा योग्य वापर होतो किंवा नाही त्याचा आढावा घेणारी यंत्रणा उभारणे.

६) वर्ष २०१९ पर्यंत देशातील सर्व गावात पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन टाकणे व स्वच्छ पिण्याच्या पाण्याची उपलब्धता करून देणे.

७) खराब वस्तु संबंधी लोकांत जागरूकता निर्माण करणे व त्याचा योग्य तो वापर करणे किंवा त्याची विल्हेवाट लावणे.

८) देशी तंत्रज्ञान वापरून कमी भांडवलात मध्यम किंवा लहान आकाराचे कारखाने काढुन कचऱ्यावर प्रक्रिया करणारे कारखाने काढणे.

९) पर्यावरणाशी समरस असलेले तंत्रज्ञान वापरून कचऱ्याची विल्हेवाट लावणे.

१०) शहरी व औद्योगिक कचऱ्याची विल्हेवाट लावणे व त्याचा स्त्रोत कमी करणे इत्यादी गोष्टींवर भर देण्यात येणार आहे.

**स्वच्छ भारत अभियानाद्वारे केले जाणारे काही कार्य :**

अ) या अभियानावर रू. ६२,०००/- करोड खर्च करण्यात येणार आहेत या खर्चात वाढ होऊ शकते.

ब) या अभियानाअंतर्गत २०१४ ते २०१९ या कालावधीत ११ करोड शौचालये बांधले जाणार आहेत.

क) भारतातले ६० कोटी लोक शौचालयाचा वापर करत नाही. त्यांना शौचालय वापरण्यासाठी प्रवृत्त केले जाणार आहे.

ड) प्रत्येकाने आठवडयातुन दोन तास स्वच्छतेसाठी वेळ द्यावा यासाठी प्रवृत्त करणे.

इ) अस्वच्छते मुळे निर्माण होणाऱ्या आजारावर प्रती व्यक्ती, प्रती वर्ष रू. ६,५००/- खर्च येतो तो कमी करण्यासाठी प्रयत्न करणे.

**स्वच्छ भारत अभियान इतिहासाची पुनरावृत्ती :**

स्वच्छ भारत अभियान आज नव्याने सुरू केले असले तरी या बाबत यापुर्वी महात्मा गांधी यांनी सामाजिक पातळीवर हे अभियान राबवले आहे. ते स्वतः हातात खराटा घेऊन प्रामुख्याने दलित वस्तीत जाऊन आपल्या अनुयायासोबत स्वच्छतेचे काम करत असत.

४ फेब्रुवारी १९१६ (महात्मा गांधी खंड - ६) द व्हाईस ऑफ टुथ भाग-१ या मध्ये ते म्हणतात "आपली मंदिरे ही पवित्रता, स्वच्छता व शांततेची देवघरे आहेत. परंतु या मंदिराभोवतालच्या परिसर जसा घाणेरडा आहे तशाचा असल्या पाहिजेत का ? यावरून महात्मा गांधी यांनी स्वच्छतेवर भर दिला होता.

संत गाडगे बाबा स्वतः हातात खराटा घेऊन ज्यागावी किर्तनाला जात असत ते गाव स्वतः सकाळी झाडत असत घाण काढीत आणि रात्री किर्तनद्वारे शिक्षण आणि स्वच्छते बाबत लोकांमध्ये जागरूकता निर्माण करत असत.

महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, नारायण गुरू, बाबा आमटे इत्यादी मान्यवरांनी स्वच्छते बाबत जनतेला जागरूक केले.

**देशाच्या विकासासाठी स्वच्छ भारत अभियानाची गरज :**

**१) पर्यटन आणि स्वच्छ भारत :**

भारतातील अनेक राज्यात वेगवेगळ्या परंपरा उत्सव मानले जातात व प्रत्येक राज्यात कोणते ना कोणते तरी पर्यटन स्थळे आहेत. उदा. काश्मिर मधिल निसर्ग सौंदर्य, महाराष्ट्रातील अंजिठा, वेरूळ, प्रसिध्द किल्ले, मध्य प्रदेशातील साची, भेळाघाट यासारखे अनेक पर्यटन स्थळे आहेत. बरेचसे पर्यटन स्थळे दुर्लक्षित आहेत. या पर्यटन स्थळांचा विकास करून त्याच्या भोवतालचा परिसर स्वच्छ आणि सुंदर बनवला तर मोठया प्रमाणावर पर्यटनच्या माध्यमातुन रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. विदेशी चलन सुध्दा मिळेल.

आजच्या घडीला पर्यटना पासुन ३९.५ दशलक्ष लोक प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष रोजगारात गुंतलेले आहेत व त्यापासुन ६.६ टक्के जिडीपी मध्ये भर

पडते. या व्यवसायात अनेक रोजगारांच्या संधी आहेत, स्वच्छभारत अभियानाची साथ मिळवुन व्यवसायात संधी वाढवता येतील.

२) आरोग्य आणि स्वच्छता :

ज्या देशातील जनतेचे आरोग्य उत्तम आहे तो देश जोमाने प्रगती साधु शकतो. देशातील एकुण जनतेपैकी ६० टक्के जनता उघडयावर शौचास बसते त्यामुळे अतीसार कॉलरा सारखे आजार बळवतात त्यामुळे दरवर्षी प्रती व्यक्ती रू. ६,५००/- खर्च केला जातो. स्वच्छ भारत अभियाना मुळे याला आळा घातला जाऊ शकतो व प्रति व्यक्तींवर होणारा खर्च कमी करून तो देशाच्या विकासासाठी वापरला जाऊ शकतो.

३) स्वच्छ तंत्रज्ञान :

स्वच्छ तंत्रज्ञानाच्या वापरामुळे कचऱ्यापासुन बायोडिझेल/पेट्रोल, इलेक्ट्रीक, खत इ. सारखे उत्पादनाची निर्मिती करून वापरल्यास वातावरण दुषीत होण्यापासुन वाचवता येईल तसेच या उत्पादन निर्मिती मुळे नविन रोजगाराच्या संधि निर्मान होतील त्यामुळे देशाचा काही प्रमाणात विकास साधता येणे शक्य होईल.

४) स्वच्छता व वैयक्तिक उत्पादकता :

स्वच्छ भारत अभियानामुळे वैयक्तिक आरोग्य सांभाळता येईल लोकांचे वैयक्तिक आरोग्य जर चांगले असेल तर देशाच्या उत्पादकतेवर त्याचा परिणाम होईल. चांगले आणि दर्जेदार उत्पादनात भर पडेल त्यामुळे देश विकास साधता येईल.

५) परकिय/विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुक :

स्वच्छ आणि सुंदर भारत जगाला दिसल्या शिवाय विदेश गुंतवणुकदार भारतात येणार नाही त्यासाठी सार्वजनिक स्वच्छता आवश्यक आणि महत्वाची सुध्दा आहे. विदेशी गुंतवणूकी साठी सिंगापुर सारख्या देशाचे अनुकरण करावयास हरकत नाही. सिंगापुरचे संस्थापक 'ली चुआन' सार्वजनिक स्वच्छता सांभाळण्यासाठी स्वतःजवळ कचऱ्याची पिशवी असावी लागते, शौचालयात किती पाणी वापरावे याचे नियम आहेत. नियम न पाळणाऱ्या लोकांवर दंडात्मक कारवाई केली जाते. त्यामुळे सिंगापुर जगातील स्वच्छ देश म्हणुन ओळखला जातो. त्यामुळे त्याचकडे विदेशी गुंतवणुक आकर्षित होऊन देशाचा विकास झपाटयाने होत आहे हा प्रयोग भारतात व्हावयास हरकत नाही.

स्वच्छता व संयुक्त राष्ट्र संघ :

जुलै २०१० मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या सभेत शिक्षण, अन्न सुरक्षा, आरोग्य इत्यादी सारख्या हक्का मध्ये जल आणि स्वच्छतेचा समावेश करण्यात आला त्यामुळे मानवी हक्काची परिपुर्ती होऊन दारिद्र कमी करण्यात मदत होईल.

भारतीय राज्यघटना आणि स्वच्छता :

१९९२ मध्ये संविधानाच्या ७४ व्या घटना दुरूस्तीमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थाना अधिकार आणि त्यांच्या कार्याला संविधानिक मान्यता मिळाली आहे. त्यानुसार शहरातील गरिबांना अल्पदरात ठराविक अवधित स्वच्छता, सामाजिक, आर्थिक बाबतीतील पायाभुत सुविधा अल्प दरात पुरवाव्या लागतात त्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थाना सक्षम बनवणे आवश्यक आहे.

**भारतातील शहरांची स्वच्छता व घन कचऱ्यांचे व्यवस्थापन :**

पहिल्या पंचवार्षिक योजनेपासुन स्वच्छतेसंबंधी कार्यक्रम भारतात राबवण्यात येत आहेत. शहरातील स्वच्छता, आरोग्यदायी व जगण्यास सुसाहाय करण्याची जबाबदारी राज्य शासनाची असते. भारतातील घन कचऱ्यावर प्रक्रिया करणारे काही राज्य –

| राज्य | घन कचऱ्यावर प्रक्रिया करण्याची टक्केवारी |
|---|---|
| चंदिगड | १०० टक्के |
| मेघालय | ५८ टक्के |
| दिल्ली | ५२ टक्के |
| केरळ | ५० टक्के |
| मणिपूर | ५० टक्के |
| तेलंगाना | ४८ टक्के |
| कर्नाटका | ३४ टक्के |

(माध्यम : शहरी विकास मंत्रालय ऑगस्ट २०१५)

वरिल सारणी वरून लक्षात येते अजुनही घन कचरा व्यवस्थापन भारत फार मागे आहे.

**शौचालयाच्या सुविधांची उपलब्धता :**

| जनगणना कालखंड | १९८१ | २००१ | २०११ |
|---|---|---|---|
| शौचालयाची उपलब्धता असलेले कुटूंब | १.००% | २१.९०% | ४६.९०% |
| शौचालयाची उपलब्धता नसलेले कुटूंब | ९९.००% | ७८.१०% | ५३.१०% |

माध्यम (www.on.org./len/events/toiletday)

२००१ च्या जनगणने नुसार २१-९० टक्के लोकांकडे वैयक्तिक शौचालयाच्या सुविधा उपलब्ध होत्या. २०११ च्या जनगणने नुसार ४६.९ टक्के कुटूंबाकडे हि सुविधा उपलब्ध होती. म्हणजेच ५३.१ टक्के लोकांकडे हि सुविधा नव्हती.

देशात स्वच्छते बाबत प्रसार व प्रसिध्दीवर झालेला देश पातळी वरील खर्च आणि वैयक्तिक शौचालय बांधलेली एकुण कुटूंब संख्या :

| आर्थिक वर्ष | प्रचार प्रसिध्दीवरील देशपातळी वरील खर्च (रू. लाखात) | देशात वैयक्तिक शौचालय बांधलेल्या एकुण कुटूंब संख्या |
|---|---|---|
| २००९ - १० | ११४८५.३९ | १२४०७७७८/- |
| २०१० - ११ | ११५१२.९७ | १२२४३७३१/- |
| २०११ - १२ | १०९४८.२५ | ८७९८८६४/- |
| २०१२ - १३ | १२५८१.४४ | ४५५९१६२/- |
| २०१३ - १४ | २०८३७.७७ | ४९७६२९४/- |
| २०१३ ३१ ऑक्टोबर, २०१४ अखेर | ४०१२.३३ | १४२३९१२/- |

(संदर्भ : www.mdms.nic.in)

**स्वच्छ शहरासाठी आर्थिक पाठबळ :**

शिक्षण, रोजगार, आरोग्य, सुविधा मध्ये सुधारणा केल्या शिवाय आणि पुरेशे आर्थिक पाठबळ स्वच्छता मोहिमेला दिल्याशिवाय भारतात स्वच्छ शहरे अस्तित्वात येऊ शकत नाही.

**स्वच्छता आणि सामाजिक बदल :**

भारतात रूढी परंपरे नुसार अनुसुचित जाती जमाती मधिल महिला पुरूष स्वच्छतेचे कामे करतात. आजही स्वच्छेतेचे काम हिणदर्जाचे समजले जाते तेव्हा या कामा मध्ये यंत्राचा वापर करून या कामाला समाजात सन्मान मिळावा व कुठल्याही जाती धर्माच्या मानसाला हे काम स्विकारणे कमी पणाचे वाटणार नाही अशी व्यवस्था निर्माण करावी लागेल.

**मुंबई आणि स्वच्छता : भारताची आर्थिक राजधानी -**

मुंबईत उच्च न्यायालयाने जेव्हा पर्यंत कचऱ्याची विल्हेवाट शास्त्रीय पध्दतीने लावली जाणार नाही. तेव्हा पर्यंत नविन बांधकामांना परवानगी देण्याचे महापालिका आणि राज्य सरकारचे अधिकार गोठवले आहेत.

मुंबई, ठाणे, नागपूर, पुणे, नाशिक, औरंगाबाद हे सर्व शहरे ओबड धोबड वसत गेलेली आहेत. त्यात शौचालय, सांडपाणी, पिण्याच्या पाण्याच्या समस्या या जवळपास सारख्याच आहेत. या शहरातील कचरा फक्त फेकला जातो आणि त्याला आग लावली जाते त्यामुळे धुर, दुर्गंधीमुळे परिसरातील लोकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

अनेक कचरा प्रकल्पांना सरकारने गती दिली असी तरी २०१९ पर्यंत या समस्ये पासून सुटका होणे शक्य दिसत नाही. सध्या सुमारे ८६०० मेट्रिक टन कचरा दररोज तयार होतो आणि त्यातील ७५ टक्के म्हणजे ६५०० मेट्रिक टन कचऱ्याची शास्त्रिय पध्दतीने विल्हेवाट लावली जात नाही हे चित्र फार विदारक आहे.

**देशाचा विकास :**

देशाचा विकास करण्यासाठी १०० टक्के कचऱ्यांचे शास्त्रीय पध्दतीने विल्हेवाट लावणे गरजेचे आहे. कचऱ्या पासुन संपत्ती निर्माण करणे आवश्यक आहे. कचऱ्याचे शास्त्रीय वर्गीकरण करून जैव कचऱ्यातून खत, वीज, वायु (गॅस) निर्मिती केली तरच या समस्येपासून मुक्ती मिळु शकते. त्यासाठी अर्थसंकल्पात तरतुद करणे. तसेच देशातील नागरिकांत या संबंधी शिक्षण देऊन जागरूकता निर्माण करणे व देशाचे भविष्य उज्वल बनवणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**

१) www.indiacelebrating.com.govern ment/ swachha
२) लोकसत्ता वर्तमान पत्र (मुंबई) २ मार्च २०१६
३) लिमन एम. एस., "पायाभूत अभ्यास" २०१३ प्रकाशक शेठ प्रा. लिमिटेड.
४) https//www.quora.com/how-relevant-is swachhabharat
५) www.moneycontrol.com/news/ economybudget2016
६) Dr. Atul A. Agwan "Corporate Social responsibility", "A getway to Swachha Bharat Abhiyan" "International research Journal of Commerce and law (IRJCL) volume – 1, Issue – 5 Dec. 2014.
७) www.indiabudget.nil in last accessed. Feb – 2015
८) V.K. Puri – S. K. Mishra, "Indian Economy" Himalaya Publishing House (2014)
९) "योजना" विशेषांक, 'स्वच्छता विकास आणि सामाजिक बदल', संपादक रमेशकुमार झा. सी.बी.डी. बेलापुर. नवि मुंबई.

◆◆◆

## शुभेच्छा...



कला वाणिज्य महाविद्यालय, वरवट बकाल, ता. संग्रामपूर, जि. बुलढाणा येथील अर्थशास्त्र विभागप्रमुख तथा मराठी अर्थशास्त्र परिषद कार्यकारीणी सदस्य प्रा. डॉ. सुभाष रामचंद्र गुर्जर यांना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठामार्फत आचार्य पदवी प्रदान करण्यात आली त्यांचा संशोधनाचा विषय पश्चिम विदर्भातील पानपिंपरी उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक अध्ययन (कालखंड २००१ ते २०१०) हा होता. त्यांनी श्री शिवाजी महाविद्यालय अकोला येथील डॉ. आर. के. शेख यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन पूर्ण केले. त्याबद्दल अर्थविश्व परिवारातर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन !

# आर्थिक विकासात स्वच्छता अभियानाचे महत्व

वर्षा गंगणे
गोंदिया

स्वच्छता आणि आर्थिक विकास यांचा अतूट आणि अगदी जवळचा संबंध आहे. स्वच्छतेची, संकल्पना भारतात प्राचीन काळापासून राबविली जात आहे. स्वच्छतेतून प्रगती हा संदेश गाडगेबाबा, महात्मा गांधी यांनी त्याकाळी सर्व स्तरातून दिला, काही प्रमाणात तो अंमलातदेखील आणला गेला. आरोग्य, पर्यावरण, सौंदर्य, इत्यादि सर्व पातळयांवर स्वच्छतेचे महत्व वेळोवेळी पटवून देण्यात आल्याची अनेक उदाहरणे आहेत. पण स्वच्छता अभियान नावाचे देशव्यापी धोरण यापूर्वी राबविण्यात आले नाही. स्वच्छता आणि लोकजागृती, स्वच्छता मोहिम आणि आरोग्य, स्वच्छतेतून समृध्दीकडे असे उपक्रम राज्यपातळीवर किंवा त्या-त्या क्षेत्रात राबविण्यात आले त्याला व्यापक स्वरूपात वर्तमान पंतप्रधान मा.श्री नरेंद्र मोदी यांनी सुरूवात केली. सर्वप्रथम लाल किल्ल्याची साफ-सफाई झाली आणि याला एक चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले. २०१९ पर्यंत स्वच्छ भारत मिशन राबविण्याचे स्वप्न साकार करण्याचे ध्येय शासनाने ठरविले आहे. स्वच्छतेतून समृध्दीकडे हा संदेश शहरी तसेच ग्रामपातळीवर देखील घराघरापर्यंत पोहचविला जात आहे. हागणदारीमुक्त गावाचे स्वप्न साकार करण्याचे उदिद्ष्ट या योजनेत राबविण्यात येत आहे.

स्वच्छता अभियान आणि विकास या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. पूर्वी घर आणि कुटुंबापुरती स्वच्छता ही संकल्पना राबविली जात असे. आता ती राष्ट्रपातळी ते जागतिक पातळीपर्यंत स्विकारण्यात आली आहे. स्वच्छता अभियान राबविल्याशिवाय भारताचा सर्वांगिण विकास साधता येणार नाही याची जाणिव होऊ लागली आहे. विकासमार्गातील अनेक अडथळयापैकी स्वच्छतेचा अभाव व त्यासंबंधी वाईट प्रथा हे देखील एक ठोस कारण असल्याचे लक्षात आल्यामूळे आर्थिक विकासात स्वच्छता अभियान धोरणाचे महत्व मान्य करण्यात आले. स्वच्छतेअभावी किंवा स्वच्छतेच्या निम्न दरामुळे अनेक आर्थिक व सामाजिक प्रश्न निर्माण होतात. ते संपुष्टात आणण्यासाठी १००० शहरांची स्वच्छता व मैला वाहून नेण्याची परंपरा संपविण्यासाठी स्वच्छ भारत अभियानाची सुरूवात करण्यात आली. शौचालये बांधणे हा या अभियानाचा प्रमुख मुद्दा ठेवण्यात आला. ग्रामपातळीवर अनेक योजना, जाहिराती व जनजागृतीद्वारे हा मुद्दा पटवून देण्याचे कार्य सतत सुरू आहे.

भारतात जवळ-जवळ १३ कोटी घरांमध्ये शौचालये नाहीत. ६३ कोटी लोकांजवळ शौचालयां-संबंधी पुरेश्या सोयी नाहीत. शहरी क्षेत्रात स्वच्छते-संबंधी अनेक गंभीर समस्या आहेत. ज्यातून प्रदूषण, आरोग्यविषय समस्या, दुर्गंधी आणि इतर अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. ज्या गंभीर परिणामांकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात आले आहे. स्वच्छतेअभावी

मृत्यू हे सत्य सर्व पातळयांवर नाकारण्यात आल्यामूळे भारतात आरोग्य मंत्रालयांच्या धक्कादायक वार्षिक अहवालानंतरच या मुद्दयाकडे गांभिर्याने लक्ष देण्यात आले. डिसेंबर २०११ साली आरोग्यविषयक सर्वेक्षणात अस्वच्छतेमूळे संक्रामक रोग वाढून स्त्रियांच्या मृत्यूचे प्रमाण वाढले आहे. ३८% मृत्यू अस्वच्छतेमूळे झाले हे स्पष्ट झाले आहे. (WHO) जागतिक आरोग्य संघटनेच्या एका अहवालानूसार २०१२ साली दाक्षिण पूर्व आशियात संक्रामक रोगांमूळे ४०% मृत्यू संक्रमक रोगांमूळे झाले तर एकटया भारतात हे प्रमाण ४१% आहे. पुढील आकृतीद्वारे हे स्पष्टपणे दर्शविता येईल.

## रोग आणि मृत्यू




स्रोत :- वार्षिक अहवाल आरोग्य मंत्रालय, भारतसरकार २०११.

### अ स्वच्छता अभियान धारेणाची ठळक उदिदृष्टे :

स्वच्छता अभियान धोरण राबविण्याची ठळक उदिदृष्टये पुढील प्रमाणे सांगता येतील यॉ उदिदृष्टांचे वर्गिकरण केल्यास ते अधिक उपयुक्त ठरेल.

| स्वच्छता अभियानाची ठळक उदिदृष्टे | |
|---|---|
| आर्थिक उदिदृष्टे | सामाजिक उदिदृष्टे |
| १ विकासाकडे वाटचाल करणे | स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण करणे |
| २ नविन रोजगार संधी निर्माण करणे | आरोग्य सुदृढ बनविणे |
| ३ अवशिष्ट वस्तूंचा पुर्णवापर करणे | स्वच्छतेचे महत्व पटवून सवयी लावणे |
| ४ कृषी उत्पादनात वाढ करणे | सामाजिक परिवर्तन आणणे |
| ५ जलसाठे स्वच्छ व सुरक्षित ठेवणे | सामाजिक विषमतेत घट करणे |
| ६ गरीबी दूर करणे | सुंदर व समृध्द भारताचे स्वप्न साकार करणे |
| ७ आर्थिक विषमतेत घट करणे | परस्पर सहकार्ये व सामंजस्य वाढीस लावणे |

| | |
|---|---|
| ८ सहाय्यक उधेगांना प्रोत्साहन देणे | जातीभेद व वर्णभेद संपुष्टात आणणे |
| ९ प्रदूषणावर नियंत्रण लावणे | सामाजिक मुल्यांची जोपासना करणे |
| १० राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करणे | मातामृत्यू व बालमृत्यूचे प्रमाण कमी करणे |
| ११ सशक्त अर्थव्यवस्थेची निर्मिती करणे | मानसिक परिवर्तन आणणे |

वरिल सर्व उदिदृष्टे पूर्ण करण्यासाठी स्वच्छता अभियान धोरण राबविण्याची गरज राज्य, राष्ट्रीय तसेच आंतराष्ट्रीय स्तरावरदेखील मान्य करण्यात आले आहे. या मुददूयांचे थोडक्यात स्पष्टीकरण करता येईल.

➤ **आर्थिक उदिदृष्टे :**

स्वच्छतेचा थेट संबंध आर्थिक क्षेत्र व विकासाशी आहे. हे लक्षात घेऊन स्वच्छता अभियानाचे धोरण राबवितांना पुढील आर्थिक उदिदृष्टांचा विचार करण्यात यावा.

१) **विकासाकडे वाटचाल करणे :** अतिविशाल लोकसंख्या असणाऱ्या देशात स्वच्छतेशिवाय विकास साधणे अशक्य आहे. आर्थिक विकासाचा दर वाढविण्यासाठी व्यापक पातळीवर स्वच्छता मोहिम राबविल्यास इतर अनेक समस्यांवर मात करता येईल. विकासाकडे वाटचाल करण्यासाठी स्वच्छता अभियान राबविणे महत्वपूर्ण आहे.

२) **नविन रोजगार संधी निर्माण करणे :** स्वच्छता अभियान धोरण वेगवेगळया पातळयांवर राबविले गेल्यास उदा. जलस्वच्छता, कचराव्यवस्थापन, वायूप्रदूषण, तांत्रिक कचऱ्याची विल्हेवाट इ. मुळे रोजगाराच्या अनेक नविन संधी निर्माण होऊन बेरोजगारी दूर करता येईल.

३) **अवशिष्ट वस्तूंचा पुर्नवापर करणे :** विकासाच्या प्रक्रियेत तसेच दैनंदिन व्यवहारात रोज शेकडो टन वस्तू टाकाऊ ठरतात. आर्थिक-सामाजिक तसेच तांत्रिक क्षेत्रात या अवशिष्ट वस्तूंचा पुर्नवापर करण्यासाठी संशोधन, प्रक्रिया उदयोग तसेच नविन व्यवसायांना चालना देण्याचे उदिदष्ट निश्चित करून अवशिष्ट वस्तूंचा उपयोग करता येतो.

४) **कृषी उत्पादनात वाढ करणे :** अस्वच्छतेमूळे माती देखील; शेतीक्षेत्र प्रदुषित होते. त्यामूळे शेतीची उत्पादनक्षमता कमी होऊन एकूण उत्पादनात घट होते उदा. प्लास्टिकच्या अतिवापरामूळे, जमिनीत ते रूतून बसल्यामूळे त्याठिकाणी बियाणे उगवत नाही. स्वच्छतेमूळे शेतीच्या उत्पादनात वाढ करता येते.

५) **गरीबी दूर करणे :-** स्वच्छता अभियान मोहिमेमूळे अनेक हातांना काम व रोजगार मिळणे शक्य होते. अर्थात लोकांना आर्थिक उत्पन्न मिळविण्याचे साधन मिळते ज्यातून भारतातील एक प्रमुख समस्या असणाऱ्या गरीबीचे उन्मूलन करता येते.

६) **जलसाठे स्वच्छ व सुरक्षित ठेवणे :** जलस्त्रोत व साठे सुरक्षित ठेवणे हे या अभियानाचे प्रमुख उदिदृष्ट होय ज्याचा थेट संबंध शेती तसेच जनतेच्या आरोग्याशी आहे. पिण्याचे स्वच्छ पाणी पुरविणे, सांडपाण्याचा पुर्नवापर, जलसाक्षरता यासारख्या सहाय्यक योजनांद्वारे स्वच्छता अभियान राबविले गेल्यास जलसाठे देखील स्वच्छ व सुरक्षित ठेवता येतील. त्यादृष्टीने हे अभियान महत्वपूर्ण आहे.

७) **आर्थिक विषमतेत घट :-** स्वच्छता मोहिम राबवितांना रोजगाराच्या अनेक नविन संधी उपलब्ध होऊन बेरोजगारांना काम मिळेल. आर्थिक उत्पन्नाचे

एक साधन मिळाल्यामूळे गरीब व बेरोजगारांचे उत्पन्न वाढून आर्थिक विषमतेत घट होईल. आर्थिक समानता निर्माण करणे हे स्वच्छता अभियानाचे एक उदिद्ष्ट आहे.

**८) सहाय्यक उद्योगांना प्रोत्साहन देणे :** स्वच्छतेसंबंधी मोहिम राबवितांना अनेक सहाय्यक उद्योगांना चालना देता येते उदा. साखर कारखान्यातील ऊसाच्या चिपाडापासून गुरांचा चारा, खत तयार करणे, ज्वारीच्या धांडयांपासून बायोडिझेल तयार करणे इ. यामूळे सहाय्यक उद्योग निर्माण होऊन रोजगार संधी निर्माण करण्याच्या दृष्टीने हे अभियान महत्वपूर्ण आहे.

**९) प्रदूषणावर नियंत्रण लावणे :** स्वच्छता आणि प्रदूषण यांचा थेट संबंध आहे. वाढते प्रदूषण हा अर्थव्यवस्थेच्या विकासातील मोठा अडथळा आहे. स्वच्छतेद्वारे वाढते प्रदूषण नियंत्रित करणे हा प्रमुख हेतू आहे. जल, वायू व माती या तिन्ही पातळयांवर स्वच्छता अभियान राबवून प्रदूषण नियंत्रण करण्यासाठी हे अभियान अत्यंत महत्वपूर्ण आहे. कचऱ्याची विल्हेवाट, घनकचऱ्यापासून खत व तत्सम वस्तू बनविणे, वृक्षारोपण, नदया, तलाव स्वच्छ करणे इ. धोरणात्मक उपायांद्वारे प्रदूषण नियंत्रित करता येते.

**१०) राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करणे :** बेकारांना कामाच्या संधी उपलब्ध करून देऊन दरडोई उत्पन्नात वाढ करणे शक्य आहे. दरडोई उत्पन्न वाढल्यास देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करता येईल. या उददेशाने स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. राष्ट्रीय उत्पन्नातील वाढीवरून त्या देशाची आर्थिक प्रतिमा व विकासातील स्थान लक्षात घेता येते. त्यादृष्टीने स्वच्छता अभियान धोरण महत्वपूर्ण ठरते.

**११) सशक्त अर्थव्यवस्थेची निर्मिती करणे :** भारत सर्वाधिक जनसंख्येचा देश असून मोठी बाजारपेठ येथे उपलब्ध आहे. त्यामूळे विकसित देश म्हणविण्याची क्षमता ,या देशात आहे. स्वच्छता अभियानातून समृध्दीकडे वाटचाल करता येते हे लक्षात आल्यामूळे त्या दृष्टीने हे धोरण राबविले जात आहे. जागतिक अर्थव्यवस्थेत एक स्वतंत्र स्थान निर्माण करणे हे या धोरणाचे एक वैशिष्टय आहे. भारत महासत्ता होण्याच्या दिशेने टाकलेले हे एक महत्वाचे पाऊल आहे.

➤ **सामाजिक उदिदृष्टे :**

वरिल आर्थिक उदिद्ष्टांशिवाय स्वच्छता अभियान धोरणाची काही सामाजिक उदिद्ष्टे देखील आहेत.

**१) स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण करणे :** जनतेच्या मनात स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण करून समाज व देश स्वच्छ करणाच्या उददेशाने हे अभियान राबविण्याचे निश्चित करण्यात आले.

**२) सुदृढ आरोग्याची निर्मिती करणे :** स्वच्छता आणि आरोग्य यांचा प्रत्यक्ष व जवळचा संबंध आहे. स्वच्छतेअभावी अनेक रोगांचा प्रादुर्भाव होतो. सुदृढ आरोग्यातून सुदृढ समाज घडविण्याच्या हेंतूने स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे.

**३) स्वच्छतेचे महत्व पटवून सवयी लावणे :** स्वच्छतेचे महत्व जनतेला पटवून स्वच्छतेच्या सवयी लावणे हे अत्यंत महत्वाचे कार्य या धोरणाद्वारे साध्य केले जात आहे. रस्त्यावर थुंकणे, उघडयावर शौचास जाणे, कचरा व घाण टाकणे. यातून अनेक सांसर्गिक रोग पसरण्याची शक्यता असते. ती टाळण्यासाठी स्वच्छता अभियान राबविण्याचे ठरविण्यात आले. स्वच्छतेच्या सवयी बालपणापासून लावण्याचे ध्येय

ठेऊन शाळेत हात धुवा योजना राबविण्यात येत आहे. ज्यामूळे बालपणापासून स्वच्छतेची सवय लागेल.

**४) सामाजिक परिवर्तन आणणे :** स्वच्छतेतून सगळयांना एकाच पातळीवर आणणे व समाजात क्रांतीकारक बदल घडवून आणणे हे या धोरणाचे एक महत्वाचे उदिद्ष्ट होय.

**५) सामाजिक विषमतेत घट करणे :** आर्थिक विषमतेतून सामाजिक विषमता मोठया प्रमाणात निर्माण होते व त्यामधून असंतोष, हिंसा, वैमनस्य यासारखे प्रश्न निर्माण होतात ते टाळण्यासाठी सर्वांना एकत्र आणून कार्य करण्याची गरज असते जी या अभियानाद्वारे साध्य करण्याचे उदिद्ष्ट आहे.

**६) सुंदर व समृध्द भारताचे स्वप्न साकार करणे :** स्वच्छतेतून समृध्दीकडे हे घोषवाक्य घराघरात माहित करून अनेक स्पर्धा, उत्सव, चळवळ, श्रमदान, चर्चासत्रे इ. च्या माध्यमातून स्वच्छता अभियान राबविण्याचे ध्येय निश्चित करण्यात आले.

**७) परस्पर सहकार्य व सामंजस्य निर्माण करणे :** स्वच्छता ही एक सार्वभौम संकल्पना आहे. त्याद्वारे परस्परांमध्ये सहकार्य वाढवून प्रेम, सद्भाव व सामंजस्य निर्माण करण्याचे उदिद्ष्ट या अभियानाचे आहे.

**८) जातीभेद व वर्णभेद संपुष्टात आणणे :** भारत हा धर्मनिरपेक्ष देश म्हणविला जात असला तरी अजूनही जातीभेद व वर्णभेद अस्तित्वात आहे. स्वच्छता अभियान मोहिम राबवितांना सर्व स्तरांवरील व जातीतील लोक एकत्र येऊन काम करतील. त्यातून सलेखा वाढून जातीभेद व वर्णभेद नष्ट करण्याचे ध्येय ठरविण्यात आले. मैल वाहून नेणे ही कुप्रथा हद्दपार करण्याचे उदिद्ष्ट राबविण्यात येत आहे.

**९) मातामृत्यू व बालमृत्यूचे प्रमाण कमी करणे :** स्वच्छतेअभावी मोठया संख्येने असणारे बालमृत्यू व मातामृत्यूचे प्रमाण कमी करण्याचे या धोरणाचे उदिद्ष्ट आहे. यादृष्टीने अनेक योजना राबविण्याचे ठरविण्यात आले आहे.

**१०) मानसिक परिवर्तन आणणे :** स्वच्छता राखण्याची मानसिकता निर्माण करून ती अंमलात आणण्याचे उदिद्ष्ट हे अभियान राबवितांना ठरविण्यात आले. मानसिकता बदलल्याशिवाय स्वच्छतेची संकल्पना कायम व स्थायी स्वरूपात राबविता येत नाही. त्या हेतूने लोकांचे मानसिक परिवर्तन अनेक योजना व उपक्रमांद्वारे करण्याचे ठरविण्यात आले.

वरिल सर्व उदिद्ष्टांच्या पूर्ततेसाठी स्वच्छता अभियान धोरण समर्थपणे विविध पातळयांवर देशाच्या कानाकोपऱ्यातून राबविले जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हातात झाडणी घेऊन स्वच्छता मोहिमेची सुरूवात का केली, सगळे वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी या चळवळीत सहभागी झाले. झपाटल्यालगत लोक कामाला लागले. एका नव्या उर्जेची निर्मीती झाल्याप्रमाणे त्यातून चैतन्य व आनंदाची निर्मिती झाली. हा उपक्रम राबविण्यासाठी केंद्र सरकारने ४००० पेक्षा अधिक शहरांच्या स्वच्छतेचा संकल्प केला असून त्यासाठी ६२ हजार कोटी रू.ची पाच वर्षांसाठी योजना तयार केली आहे. ज्यापैकी १४,६०० कोटींपेक्षा अधिक रक्कम केंद्र सरकार देणार आहे. पिण्याचे पाणी आणि स्वच्छतेसाठी ग्रामिण क्षेत्रात स्वच्छता मंत्रालयातर्फे अंदाजपत्रकात अनुदानाची तरतूद करण्यात येणार आहे.

स्वच्छता हा एक विचार आता मोहिमेच्या स्वरूपात राबविण्यात येत आहे. पण सद्यस्थिती लक्षात घेता भारतात जवळ-जवळ १३ कोटी

घरांमधे शौचालये नाहीत. ७०% ग्रामिण लोक अजूनही उघडयावर शौचास जातात. ६३ कोटी लोकांजवळ शौचालयांसंबंधी पूरेश्या सोयी नाहीत. या सोयी निर्माण करण्याची मोहिम राबविल्यास मिस्त्री ते रंगकाम करणारे श्रमिक यांना काम मिळेल व आर्थिक उत्पन्नात वाढ होईल. अमेरिकेतील सॉयल योजनेप्रमाणे योजना भारतातही राबविल्यास मोठया प्रमाणात स्वच्छता कायम ठेवून खतनिर्मितीला प्रोत्साहन देता येईल, ज्याचा दुहेरी फायदा होईल. १) स्वच्छता कायम राखता येईल. २) खतनिर्मितीतून जमिनीची सुपिकता वाढविता येईल. याचा एकूण परिणाम म्हणजे जनतेचे आरोग्य सुधारता येईल तसेच कृषीउत्पादनात वाढ करता येईल. आर्थिक विकासासह वाढत्या कचऱ्याचे समायोजन केल्यास स्वच्छता अभियान अधिक सक्षमपणे यशस्वी होईल.

शहरी क्षेत्रात घरोघरी कचरागाडी जाऊन कचरा गोळा करते अस्वच्छतेबाबत दंड केला जात आहे. अनेक कार्यक्रम राबविले जात आहेत. ग्रामिण क्षेत्रात निर्मल ग्राम पुरस्कार, हागणदारी मुक्त ग्राम अशा योजना राबविण्यात येत आहेत. प्रदूषण नियंत्रणासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. स्वच्छता अभियानाला जनतेने संपूर्ण पाठिंबा व प्रतिसाद दिल्यास आरोग्य, स्वच्छता, पेयजल शुध्दीकरण, खतनिर्मिती, प्रदुषण नियंत्रण यावर होणाऱ्या कोटयवधी रूपयांची बचत करणे सहज शक्य आहे.

## अ निष्कर्ष :

स्वच्छ भारताची संकल्पना साकार करण्यासाठी लोकांच्या मनोवृत्तीत, बदल करणे आवश्यक आहे, मानसिकता बदलणे गरजेचे आहे. स्वच्छता म्हणजे एका सामाजिक मुल्याची जोपासना होय हे पटवून देण्याची गरज आहे. स्वच्छता आर्थिक विकास आणि सामाजिकता यामधे गहिरा संबंध असल्यामूळे स्वच्छतेसाठी लोकांना स्वच्छतेच्या सवयी लावणे गरजेचे आहे. गरीब व अज्ञानी अस्वच्छता पसरवणारे समजले जात असत पण आता सुशिक्षित व नोकरदार लोक देखील अस्वच्छता पसरवितात ही शोकांतिका म्हणता येईल. विकासाची धारा सर्वत्र निर्मळ व स्वच्छ स्वरूपात आणण्यासाठी स्वच्छता अभियान एक आदर्श उपक्रम आहे. असे ठामपणे म्हणता येईल.

## ब) शिफारस :

देशात ९५ कोटी लोकांजवळ मोबाईल आहे. पण शौचालयांचा उपयोग करणाऱ्यांची संख्या केवळ ४० कोटी आहे. २०११ च्या जनगणनेनूसार देशातील २६ लक्ष कर्मचारी कोरडी शौचालये स्वच्छ करणारे आहेत. ज्यांची समाजात अजिबात प्रतिष्ठा नाही. या धक्कादायक आकडयांवरून असे स्पष्ट होते की, स्वच्छता अभियान जोमाने राबविण्याची गरज आहे. स्वच्छतेला आपली जीवनशैली बनविणे गरजेचे आहे. शेवटी एवढे म्हणावेसे वाटते.

संस्कृती जतन करेल स्वच्छता
आरोग्य संपदा आणेल स्वच्छता
विकासाचे स्वप्न फुलवेल स्वच्छता
सुंदर भारत घडवेल स्वच्छता

## संदर्भ सूची :

१) योजना - जानेवारी २०१५
२) लोकराज्य - ऑक्टो. २०१५
३) जनगणना अहवाल - २०११
४) आरोग्य आणि कुटुंब कल्याण अहवाल - २०११

◆◆◆

# स्वच्छ भारत अभियान-एक सर्वेक्षण

संगीता टक्कामोरे
विद्यासागर कला महाविद्यालय, खैरी (रामटेक)
मो. नं. ९४२३४०८२९१

## प्रस्तावना

राष्ट्रपीता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे अवचित्य साधून प्रधानमंत्री श्री. नरेन्द्र मोदीजी यांनी २ ऑक्टोबर २०१४ रोजी स्वच्छता,स्वास्थ्य व साफसफाईला प्राथमिकता देऊन 'स्वच्छ भारत अभियानाला' सुरवात केली. महत्मा गांधीजीच्या १५० व्या जयंतीनिमत्त 'स्वच्छ भारत अभियाना' चा सन २०१९ पर्यंत वास्तविकतेत परिवर्तन करण्याच्या दृष्टीकोनातून एक कार्ययोजनात तयार करण्यात आली. या अभियानाचे उद्दिष्ट म्हणजे शौचालयाच्या वर्तमान संख्येला तीन प्रतिशत पासून वाढवून २०१९ पर्यंत दहा प्रतिशत पर्यंत पोहचविणे होय. या उद्दिष्टचाच्या पूर्ततेसाठी दरदिवशी १४००० शौचालयाच्या निर्मितीचा वर्तमान स्तर ४८००० पर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. या कार्ययोजनेच्या अंतर्गत भारतदेशाला पाच वर्षाच्या कालावधीत उघड्यावर शौच करण्यापासून मुक्त बनविण्याचे आव्हान करण्यात आले आहे. या कार्ययोजनेला सफल करण्यासाठी विविध कार्यक्रम राष्ट्रीय पातळीवर राबविण्यात येणार आहे.

**स्वच्छ भारत अभियानाची उद्दिष्ट्ये :**

१) देशातील उघडे शौच बंद करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला शौचालय सुविधा उपलब्ध करून देणे.

२) ठोस आणि तरल कचरा यांच्या निचऱ्याची आधुनिक प्रणाली लागू करणे.

३) स्वच्छता आणि सुव्यवस्था सोयीचा मार्ग प्रशस्त करणे.

४) गावागावात ग्राम स्वच्छता आणि सुरक्षितता स्थापीत करून जागरूकता निर्माण करणे.

५) पाण्याची टंचाई दूर करून जलनियोजन, जल व्यवस्थापन, जागोजागी पाण्याच्या टाक्या, शुद्ध पाणीपुरवठा यासाठी पाण्याची योग्य व आवश्यक पूर्ती करणे.

वरील विविध उद्दिष्ट्ये पूर्ण करण्यासाठी व २ ऑक्टोबर २०१९ पर्यंत संपूर्ण भारत देशाला घाणमुक्त करून स्वच्छ व सुंदर बनविण्यासाठी भारत सरकार द्वारा स्वच्छता अभियान कार्यक्रम संपूर्ण देशात राबविण्यात येत आहे.

स्वच्छता अभियान कार्यक्रमाची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी आणि लक्ष प्राप्तीसाठी खालील कार्य करण्याचा संकल्प घेण्यात आला आहे.

**स्वच्छता अभियान योजनेची लक्ष प्राप्तीची कार्य :**

१) संपूर्ण देशात व्यक्तिगत, सामुहिक तसेच सामुदायिक शौचालये निर्माण कार्य केले जाईल.

२) ठोस आणि तरळ कचरा प्रबंधनाच्या माध्यमातून साफ-सफाई व स्वच्छतेवर भर दिला जाईल.

३) प्रत्येक गावात पाणी-पुरवठा करून देण्यासाठी पाण्याची पाइपलाईन टाकली जाईल जेणेकरून २०१९ पर्यंत प्रत्येक घरापर्यंत नळाचे पाणी उपलब्ध होऊ शकेल.

पेयजल आणि स्वच्छता मंत्रालयाद्वारे या सर्व कार्यक्रमांना संपूर्ण देशात लागू करण्यात आले आहे. ८ ऑगस्ट २०१५ ला शहरी विकास मंत्रालयाद्वारे स्वच्छ भारत रैकिंग रिपोर्ट-२०१५ सादर करण्यात आली आहे. स्वच्छ भारत रैकिंग रिपोर्ट-२०१५ तयार करण्यासाठी एक सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणाचे काही मापदंड व आधार निश्चित करण्यात आले होते.

**स्वच्छ भारत रैकिंग सर्वे चे मापदंड व आधार :**

स्वच्छ भारत रैकिंग सर्वे चे काही मापदंड व आधार खालील प्रमाणे आहेत.

१) उघड्यावर शौच करणाऱ्यांची संख्या.
२) ठोक कचरा प्रबंधन व्यवस्था
३) दूषित जल शोषण व्यवस्था
४) पेयजलाची गुणवत्ता
५) जलाशयाच्या पाण्याची गुणवत्ता
६) जलजनित आजारापासून मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या.

वरील मापदंडाचा आधार घेऊन स्वच्छतेच्या दृष्टीने देशाचा सर्वेक्षण करण्यात आले. संपूर्ण देशात ४७६ शहरांची निवड करून त्या शहरांची स्वच्छतेच्या दृष्टीने क्रमवारी लावण्यात आली. या सर्वेक्षणाची एक रिपोर्ट तयार करण्यात आली. या सर्वेक्षण रिपोर्टानुसार जी स्थिती समोर आली ती फारशी सकारात्मक नव्हती.

उत्तर भारताच्या बाबतीत या रिपोर्ट नुसार बहुतेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग दिसून आल्याचे स्पष्ट होते प्रधानमंत्री श्री. मोदीजींचे क्षेत्र वाराणसीच्या स्थितीत देखील फारशी सुधारणा झाल्याचे दिसून आले नाही. ४७६ च्या रैकिंगमध्ये वाराणसीला ४१८ वे स्थान प्राप्त झाल्याचे दिसून आले. उत्तरप्रदेश आणि बिहारच्या एकही शहराला स्थान प्राप्त झाल्याचे दिसून आले नाही.

सर्वेक्षण-२०१५ नुसार स्वच्छतेत पहिला नंबर कर्नाटकातील मैसूर शहराने पटकावल्याचे दिसून आले. तर ४७६ वे म्हणजेच शेवटच्या नंबरवर मध्यप्रदेशातील दमोह शहराचे नाव आहे. स्वच्छ भारतातील अगदी सर्वात वर असलेली १० शहरे आणि ४७६ मधील सर्वात खाली असलेली १० शहरांची यादी या रिपोर्टनुसार दर्शविण्यात आली आहे. ती खालील प्रमाणे आहे.

**स्वच्छ भारताची प्रथम १० शहरांची नावे**

| रैकिंग | शहर |
|---|---|
| १ | मैसूरू |
| २ | तिरूचिरापल्ली |
| ३ | नवी मुंबई |
| ४ | कोच्ची |
| ५ | तिरूअनंतपुरम् |
| ६ | हासन |
| ७ | मांड्या |
| ८ | बेंगलूरु |
| ९ | हालिशहर |
| १० | गंगटोक |

भारतातील स्वच्छ १० शहरातून कर्नाटकातील चार शहरांचा समावेश असल्याचे वरील सारणीत दिसून येते. त्यात मैसूर, हासन, मांड्या व कर्नाटक राजधानी बेंगलूर यांचा समावेश आहे. याचा अर्थ स्वच्छतेच्या बाबतीत देशात कर्नाटकाची स्थिती सगळ्यात चांगली आहे. ऐतिहासीक शहर मैसूरु देशातील सर्वाधिक स्वच्छ शहर आहे तर कर्नाटक राज्याची राजधानी बेंगलूरु देशाची सर्वाधिक स्वच्छ राजधानी आहे.

स्वच्छ भारताच्या ४७६ च्या यादीतील खालची १० शहरे

| अनु. क्र. | रैकिंग | शहर | राज्य |
|---|---|---|---|
| १ | ४७६ वे | दमोह | (मध्यप्रदेश) |
| २ | ४७५ | भिण्ड | (मध्यप्रदेश) |
| ३ | ४७४ | पलवल | (हरियाणा) |
| ४ | ४७३ | भिवानी | (हरियाणा) |
| ५ | ४७२ | चित्तौढगढ | (राजस्थान) |
| ६ | ४७१ | बुलंद शहर | (उत्तरप्रदेश) |
| ७ | ४७० | नीमच | (मध्यप्रदेश) |
| ८ | ४६९ | रेवाडी | (हरियाणा) |
| ९ | ४६८ | हिंडौन | (राजस्थान) |
| १० | ४६७ | सम्भलपुर | (ओडिसा) |

४७६ शहरांच्या स्वच्छतेच्या यादीतील शेवटच्या १० शहरांचा समावेश वरील सारणीत करण्यात आला आहे. त्यात ४७६ व्या क्रमांकावर मध्यप्रदेशातील दमोह शहर आहे. तर ४७५ व्या क्रमांकावर देखील मध्यप्रदेशातील भिण्ड शहराचा समावेश असल्याचे दिसून येते. ४७० व्या क्रमांकावर देखील मध्यप्रदेशातीलच नीमच शहर असल्याचे निदर्शनास आले आहे.

मध्यप्रदेशातील तीन शहरे, हरियाणा राज्यातील तीन शहरे तसेच राजस्थानातील २ शहरे तसेच उत्तरप्रदेश व ओडिशातील एक-एक शहरांचा समावेश या शेवटच्या १० शहरामध्ये असल्याचे दिसून येते. म्हणजेच अस्वच्छतेच्या बाबतीत मध्यप्रदेशानंतर हरियाणा या राज्याचा क्रमांक लागतो.

**निष्कर्ष –**

स्वच्छ भारत अभियानाच्या या रैकिंगची सर्वे रिपोर्ट खूब सकारात्मक नसली तरीही स्वच्छतेच्या कामाला सुरवात झाल्याचे निश्चितच दर्शविते. भारताला स्वच्छ भारत बनविण्यासाठी अजूनही बरेच परिश्रम घ्यावे लागणार आहे. कारण कचऱ्याच्या ढीगावर स्वच्छ, स्वस्थ व सुंदर भारताची प्रतिमा स्थापित केल्या जाऊ शकणार नाही तर त्यासाठी भरपूर प्रयत्न व त्याला पूरक अशा विविध कार्यक्रमाची योजना व अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. आणि यासोबतच देशातील लोकांना स्वच्छतेची सवय लावणे देखील तितकेच महत्वाचे आहे.

'स्वच्छ भारत अभियाना' अंतर्गत देशाला स्वच्छ, स्वस्थ व सुंदर बनविण्याकरिता भारत सरकार राष्ट्रीय पातळीवर विविध कार्यक्रम जोमाने राबवित आहे. जेणे करून सन २०१९ पर्यंत संपूर्ण देशाला अस्वच्छतेपासून मुक्त करता येईल परंतु यासाठी सरकारला देशातील जनतेचे सहकार्य मिळणे तेवढेच महत्वाचे आहे. त्याशिवाय स्वच्छ, स्वस्थ व सुंदर भारताचे स्वप्न पूर्ण होऊ शकणार नाही.

**संदर्भ :**

प्रतियोगिता दर्पण-जाने.,फेब्रु., मार्च २०१६
लोकराज्य – जाने., फेब्रु., मार्च २०१६
योजना – जाने., फेब्रु., मार्च २०१६
संपदा – जाने., फेब्रु., मार्च २०१६
कुरूक्षेत्र-जाने., फेब्रु., मार्च २०१६

◆◆◆

# सप्तपदी स्वच्छतेची

ज्योती व्ही. कवठे (रणदिवे)
विद्यासागर कला महाविद्यालय,
खैरी.

भारतीय जनता पक्ष निवडून आल्यावर शपथविधी होण्याच्या आधीच नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली नवीन सरकारच्या उपक्रमाबंधक एक घोषणा करण्यात आली ती अशी की "नवीन सरकार लवकरच 'स्वच्छ भारत अभियान' उत्तर प्रदेशातल्या काही शहरातून होईल २०१९ पर्यंत भारतातली एक हजार शहर व गाव पूर्णपणे स्वच्छ करण्याच प्रयोजन आहे. या कामासाठी मोठ्या प्रमाणात कचरा निर्मूलन व्यवस्थेचं यांत्रिकीकरण करण्यात येईल त्यासाठी केंद्र सरकार लागेल तेवढा खर्च करेल."

या घोषणेने सामान्य नागरिक खूप प्रभावित झाला. त्याचा आनंद मला पण झाला कारण असे झाले तर देशात खूप समारात्मक बदल होतील असे वाटले. दुसरीकडे मनात शंका निर्माण झाली खरच भारतातील एक हजार शहर व गाव खरोखरच स्वच्छ होतील काय? जी स्वच्छता स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ६५-६७ वर्षात होऊ शकली नाही ती २०१९ पर्यंत होईल काय? असा एक प्रश्न मनात निर्माण झाला पण काही असो त्या दृष्टीने स्वच्छतेला प्राधान्य देऊन सुरूवात तर झाली हे खरे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तयार केलेली स्वच्छतेची संकल्पना अतिशय सुंदर आहे. याची सुरूवात त्यांनी गुजरातमध्ये मुख्यमंत्री असताना केली होती. वाराणसीतून निवडून आल्यामूळे त्यांनी त्यांची सुरूवात तिथून केली मग उत्तर प्रदेश व हळूहळू उर्वरित भारत या योजनेतंर्गत येणार आहे. २०१९ मध्ये महात्मा गांधी यांची १५० वी जयंती आहे. महात्मा गांधीजीना स्वच्छता प्रिय होती. म्हणून सरकारने या योजनेला "महात्मा गांधी स्वच्छ भारत अभियान" असं नाव दिल.

शहर स्वच्छता हा विषय नगरपालिकांच्या अधिकारात असतो. जर केंद्र सरकारनं त्याला प्राधान्य दिलं तर केंद्र, राज्य व शहर पातळीवरच्या सरकारी यंत्रणांना एकमेकांशी सहकार्य कसं करायचं हे शिकता येईल. आज केंद्रात भाजपचं सरकार आहे. अनेक राज्यात कॉंग्रेस, जनतादल, तृणमूल कॉंग्रेस, अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम अशा अनेक पक्षांची सरकार आहे. अशा परिस्थितीत जर केंद्र, राज्य व नगरपालिका यांच्या मध्ये सहकार्य झाले तर ते भारतातल्या राजकीय पक्षांमध्ये सकारात्मक संबधासाठी महत्वाचं ठरेल. तसेच शहर स्वच्छता याकडे लक्ष दिले जाईल.

**शहर व गाव स्वच्छ झाली तर**

- रोगराई कमी होईल.
- बराचसा कचरा ऊर्जा निर्माण करण्यासाठी वापरता येईल.
- कमी खर्चात ऊर्जा मिळेल.
- देश स्वच्छ दिसायला लागेल.
- मोठया प्रमाणात परदेशी गुंतवणूक होईल.
- आर्थिक उत्पन्न व रोजगार वाढेल.

## महाराष्ट्र व स्वच्छता

संताची भूमी असलेल्या महाराष्ट्राने संत गाडगेबाबांच्या स्वच्छतेविषयक उपदेशांना पुस्तकामध्ये, कथा , किर्तनामध्ये गुंतवून ठेवले मात्र प्रत्यक्ष सुधारणेला आपण भरपूर वाव ठेवला आहे. म्हणूनच केंद्र सरकारने स्वच्छ भारत ही योजना सुरू करून 'एक पाऊल स्वच्छतेकडे' टाकण्यास सर्व भारतीयांना प्रवृत्त केले आहे. महात्मा गांधी यांनी आपल्या आचरणातून जो स्वच्छतेचा मूलमंत्र सर्वांना दिला त्यालाच नव्याने उजाळा देत २०१४ मध्ये महात्मा गांधीच्या जयंतीला म्हणजेच २ ऑक्टोंबर ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वच्छ भारत अभियानाचा शंख फुंकला त्याचबरोबर ही योजना केवळ मोठमोठी मेट्रो शहरेच नव्हे तर भारतातील प्रत्येक जिल्हा,गावे, खेडोपाडी, वाडया व रस्त्यावर तसेच नदया, ओढे नाले इ. सोबतच कचरा व मलनिस्सारण इत्यादी साठीही राबवण्यात येत आहे.

### स्वच्छता अभियानाचा उद्देश :

- उघडयावरील शौचविधी बंद करणे.
- हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांना या कामाहून मुक्त करणे.
- नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी आधुनिक व शास्त्रोक्त पद्धतीचा अवलंब करणे.
- स्वच्छतेच्या चांगल्या पद्धतीच्या अनुषंगाने सवयी मध्ये बदल करणे.
- स्वच्छते विषयी जागरूकता निर्माण करणे आणि त्याची सार्वजनिक आरोग्याशी सांगड घालणे.
- नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची क्षमता वाढविणे.
- खाजगी संस्थांच्या सहभागासाठी सुयोग्य वातावरण निर्माण करणे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वच्छ, सुंदर व पर्यावरण युक्त देशाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी राज्यात मोठया प्रमाणावर हे अभियान राबविण्यात येत आहे. घर स्वच्छ राहिले तर गाव स्वच्छ राहिल, गाव स्वच्छ राहिले तर शहर स्वच्छ राहिले, शहर स्वच्छ राहिले तर राज्य स्वच्छ राहिल पर्यायाने देश ही स्वच्छ राहिल. त्यामुळे २ ऑक्टोंबर २०१९ पर्यंत देश स्वच्छ करण्याच्या संकल्पाला महाराष्ट्राने ही मोठया प्रमाणात हातभार लावला आहे. या संकल्पाला महाराष्ट्राने व्यापक स्वरूप दिले आहे. राज्यातील नागरी भागात स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) राबविण्यास सुरूवात झाली आहे. नागरी भागातील स्वच्छतेवर महाराष्ट्र शासनाने लक्ष केंद्रीत केले आहे.

सन २०११ च्या जनगणने नुसार राज्याची नागरी लोकसंख्या ५ कोटी ८ लाख २७ हजार ५३१ एवढी आहे. नागरी भागातील एकूण कुटुंबाची संख्या १ कोटी ८ लाख १३ हजार ९२८ एवढी आहे. त्यापैकी साधारण २९% कुटुंबाना शौचायलाची सुविधा उपलब्ध नाही. शौचालयाची सुविधा उपलब्ध नसलेल्या कुटुंबापैकी साधारण ७३% कुटुंबे सार्वजनिक शौचालयांचा वापर करीत आहेत. साधारण २७% कुटुंबे उघडयावर शौचालयास जात आहे. राज्यात २६ महानगरपालिका व २३९ नगरपरिषदा अशा एकूण २६५ नागरी स्थानिक स्वराज्य संस्था आहे. या सर्व स्थानिक संस्थामधून दर दिवशी निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याची शास्त्र शुध्द पद्धतीने फारच थोडया शहरामध्ये विल्हेवाट लावली जाते. त्यामुळे पर्यावरण विषयक व नागरिकांच्या आरोग्यविषयक समस्या निर्माण होत आहेत. त्या समस्या सोडविण्यासाठी राज्य शासन महानगरपालिका तसेच नगरपालिकांच्या साहय्याने प्रयत्न करित आहे. स्वच्छतेच्या दृष्टिने. टाकलेले हे एक पाऊल आहे.

समृद्ध आणि सशक्त राष्ट्र उभारणीची वाट पायाभूत सुविधा बरोबरच स्वच्छतेतून जाते. स्वच्छतेतून समृद्धीकडे जाण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानी स्वतः हातात झाडू घेऊन स्वच्छतेला सुरूवात केली. या कार्यात केंद्र सरकारनं पुढाकार घ्यायचा ठरवलेलं असले तरी केवळ दिल्लीवर अवलंबून राहण्याची गरज नाही. आपल्या महाराष्ट्रानं उत्तर प्रदेशातला प्रकल्प पूर्ण होण्याआधीच स्वच्छता या विषयात आघाडी घेतली. स्वच्छ भारताचे स्पप्नपूर्ण करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मे २०१५ मध्ये "स्वच्छ महाराष्ट्र अभियान" ची मुहूर्त मेढ रोवली. त्यांच्या प्रेरणेने आणि नगरविकास विभागाच्या सचिव मनीषा पाटणकर यांचा पुढाकाराने महाराष्ट्राने 'एक कदम स्वच्छता की ओर' या पलीकडे जाऊन सप्तपदी स्वच्छतेची" ही योजना सुरू केली ती १५ मे २०१५ रोजी.

**सप्तपदी स्वच्छतेची :**

- सहभागाचा ठाम निर्धार
- व्यापक लोकसहभाग
- शौचालयाच्या वापरासाठी प्रवृत्त करणे
- कचऱ्याचे संकलन, वर्गीकरण व वाहतूक करणे
- कचऱ्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करणे.
- सांडपाण्यावर प्रक्रिया करणे.
- हरित महाराष्ट्र साकारणे.

ही स्वच्छतेची सप्तपदी आहे ही सप्तपदी आजन्म आचरणात आणण्याचे सर्वांनी ठरविले. स्वच्छता ही एका दिवसापुरती फॅड नसून सतत करत रहावी लागणारी प्रकीया आहे. त्यामुळे या कार्यक्रमा अंतर्गत विविध नगरपरिषदेच्या नगराध्यक्षांनी व मुख्याधिकाऱ्यांनी स्वच्छतेची शपथ घेतली. त्याच्या परीणाम असा झाला की अवघ्या तीन चार महिन्यात म्हणजेच २ ऑक्टोंबर २०१५ ते २६ जानेवारी २०१६ या कालावधीत ३६ शहरे हागणदारी मुक्त व स्वच्छ झाली आहे.

जो पर्यंत आपण पर्यावरणपुरक बनत नाहीत तो पर्यंत विकसित होणार नाही. स्वच्छतेचा संबंध सामान्य माणसाच्या जीवनमानाशी आहे. त्यामुळे शहरातील सामान्य माणसांचे जीवनमान उंचावले तरच शहर स्वच्छ व सुंदर होईल. यासाठी लोकांचा सहभाग महत्वाचा आहे. जोपर्यंत लोक एखादया उपक्रमात स्वतःहून पुढे येत नाहीत. तो पर्यंत केवळ परिवर्तन होण्याची अपेक्षा ठेवणं चुकीच आहे. स्वच्छ महाराष्ट्राचे स्वप्न हे फक्त सरकारचे, मंत्र्याचे सामाजिक संघटना, समाज सेवकांचे नसून ते सर्वांचेच आहे त्यामुळे देशातील सव्वाशे कोटी नागरिकांनी मिळून भारताचे स्वप्न पूर्ण केले पाहिजे हे देशभक्तीचे कार्य समजून नागरिकांनी त्यात सहभागी व्हावे. "क्लीन इंडिया" चे महात्मा गांधीचे स्वप्न अजूनही अपूर्ण आहे ते स्वप्न पूर्ण करणे ही सोपी गोष्ट नाही कारण सवयी बदलायला वेळ लागतो पण आपण हे करू शकतो असा प्रत्येक माणसाने विश्वास व्यक्त केला पाहिजे.

देश स्वच्छ ठेवणे हे फक्त सफाई कर्मचाऱ्यांचे काम नाही. देश स्वच्छ ठेवणे ही सर्वांची जबाबदारी आहे. महाराष्ट्रातील सर्व जनतेने अशी शपथ घेतली पाहिजे की मी माझे घर, गल्ली आणि गाव स्वच्छ ठेवणार आहे अस जर केल तर २०१९ च्या अगोदरच महाराष्ट्र स्वच्छ होईल. स्वच्छ भारत अभियानासाठी देशातील सुमारे २ लाख ४७ हजार ग्रामपंचायतीना वर्षाला २० लाख रूपये देण्यात येणार आहेत. पेयजल आणि स्वच्छता मंत्री नितीन गडकरी यांनी ही घोषणा केली. त्यामुळे प्रत्येक गाव स्वच्छ ठेवणे शक्य होईल हे अभियान सरपंच शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या सहकार्याने राबविता येईल. राज्यात सर्वात जास्त समस्या निर्माण होते ती म्हणजे कचऱ्याची राज्यात

दररोज निर्माण होणाऱ्या २० हजार मेट्रीक टन कचऱ्यापैकी केवळ १३०० टन कचऱ्यावर प्रक्रिया होते. त्यामुळे कचऱ्याचे संकलन विकेंद्रीत करून मुरणारा कचरा आणि डम्प कचरा अशी वर्गवारी करून कचऱ्याची समस्या सोडविता येईल.

गाव स्वच्छ ठेवण्यासाठी विविध कार्यक्रम सरपंच, शिक्षक आणि विद्यार्थी राबवितात परंतु परत काही दिवसांनी आधी होती तशीच स्थिती पाहावयास मिळते मी ज्या ग्रामपंचायती मध्ये राहते तिथे असे चित्र पाहावयास मिळते की, रस्त्याच्या दोन्ही बाजूला दोन मोठी नावाजलेली कॉलेज पण रस्त्याच्या उजव्या आणि डाव्या बाजूला खूप सारा कचरा स्वच्छता अभियान राबविल्या नंतर देखील पुन्हा तोच प्रश्न उपस्थित होतो की हा कचरा कोण करतो? कचऱ्याची गाडी, नागरीक, विद्यार्थी की दुकानदार? मला तरी असे वाटते की, मी कचरा करणार नाही, इतंराना कचरा करू देणार नाही अशी स्वच्छतेची शपथ घेऊन उपयोग होणार नाही. त्यासाठी कडक कायदा केला पाहिजे स्वच्छते बाबत माझ्या वाचण्यात असे आले होते की, नॉर्वे हा एक छोटासा देश पण सगळी कडे खुप स्वच्छता कारण कायदा खुप कडक तिथे एखादा व्यक्ती नुसता थुंकला तरी शिक्षा होते ती रूपयाच्या संदर्भात नाही तर जी व्यक्ती तिथे थुंकेल त्या व्यक्तीला आपल्या जिभेने ते साफ करावे लागते अशी शिक्षा असेल तर कुणी थुंकण्याची हिम्मत करणार नाही. आपल्या कडे तर सगळी कडे पिचकाऱ्या दिसून येतात या बाबत न बोलल बंर.

### स्त्री शक्ती आणि स्वच्छता

महाराष्ट्र राज्यात १५ मे पासून जे स्वच्छता अभियान यशस्वीरित्या राबवले जातेय त्यात स्त्रियांचा सहभाग मोलाचा ठरला आहे. हे अभियान यशस्वी करून दाखवण्या मागे स्त्रीशक्ती वैयक्तिक किंवा सामाजिक पातळीवर हिरीरीने उभी ठाकली आहे. सरकारी पातळीवरही स्त्रियांचा स्वच्छता अभियानातील सहभाग कौतुकास्पद आहे. एकूण नगराध्याक्षापैकी ६५% या महिला नगराध्यक्षा आहेत. त्यांनी आपापल्या परिसरात ही योजना यशस्वीपणे राबवून स्त्रियांच्या हाती सत्ता आली की ती काय चमत्कार घडवू शकते हे दाखवून दिले.

हागणदारीमुक्त व स्वच्छ झालेल्या ३५ नगरपरिषदांपैकी २२ नगरपरिषदांच्या नगराध्यक्षा महिला आहे. या नगरपरिषदांच्या बहुतांश मुख्याधिकारी महिला आहेत. त्याचबरोबर महाराष्ट्रातील पहिल्या हागणदारीमुक्त झालेल कोल्हापूर महानगर पालिकेच्या महापौरदेखील या महिला आहेत. त्यामुळे घरा सोबतच आपला परिसर, शहरे देखील महिला स्वच्छ ठेऊ शकतात हे त्यांनी सिध्द केले. त्यासोबतच स्वच्छ महाराष्ट्र अभियान ची धुरा सांभाळणाऱ्या नगरविकास विभागाच्या सचिव देखील महिला आहेत. महाराष्ट्रातले महाबळेश्वर पाचगणी हे पर्यटकांचे आवडते स्थान पाचगणी येथे एका ठिकाणी मोठया प्रमाणावर कचरा टाकला जात होता. त्यामुळे या विकासाला कचरा पॉईंट अशा नाव्याने ओळखले जाऊ लागले. परंतु स्वच्छतेची सप्तपदी कार्यक्रमातंर्गत पाचगणी नगरपरिषदेने या कचऱ्याला संपत्ती मानून त्याचे वर्गीकरण, विघटन आणि प्रक्रिया करून त्यापासून सेंद्रिय खत बनविले जाते. नगरध्यक्षा लक्ष्मी कराडकर आणि मुख्याधिकारी विद्यादेवी पोळ या दोघींच्या समन्वयाने कचरा पॉईंट "स्वच्छ महाराष्ट्र सुंदर महाराष्ट्र पॉईंट" म्हणून प्रसिध्द झाला तो या दोन स्त्रियांच्या परस्परांतील सामंजस्यामुळेच. उमरेडच्या नगराध्यक्षा कुंदाताई पवनीकर आणि राजापूरच्या नगराध्यक्षा मीनल मालतेकर व मुख्याधिकारी रंजना घगे यांनी तर उघडयावर शौचाला जाणाऱ्यांना जरब बसावी म्हणून

एक अभिनव संकल्पना राबवली गुलाबाचे फुल देऊन 'गेट वेल सून' अशा सदिच्छा देत समोरची व्यक्ती शरमेने कदाचित योग्य मार्ग निवडेल असा एक फंडा राबवते तसेच त्यांनी भरारी पथकाच्या माध्यमाहून उघडयावर शौचास जाणाऱ्यावर नजर ठेवून एक गुलाब पुष्प देऊन सत्कार केला. त्यामूळे लोकांना त्यांची चुक कळली आणि आता तिथे कोणीही उघडयावर शौचास जात नाही. यापुढे कुंदाताईनी तर अशा लोकांना चवक दंड ठोठावला आणि ६० हजार रूपये दंड वसूल करून याच योजनेसाठी तो खर्च केला. कांगलच्या नगरध्यक्षा संगीता गडेकर यांनी हागणदारी मुक्तीचे उद्दिष्ट पूर्ण केलेच पण त्याच बरोबर कचऱ्याचे वर्गीकरण करून ऊर्जानिर्मितीचा उपक्रम सुरू केला त्यांनी आपल्या गावाला स्वच्छता अभियान उत्कृष्टपणे राबविणारे आदर्श शहर बनवले. अशा अनेक स्त्रियांची उदाहरणे देता येतील. आज स्वच्छता अभियानातील सिहांचा वाटा उचलणाऱ्या स्त्रियांच जितक कौतुक करावे तितके कमीच आहे. १९७० च्या दशकापासून स्त्रिया राजकारणात व समाजकारणात उतरल्या तेव्हा पासून शहरपातळीवर असो वा गावपातळीवर असो स्त्रियांचा प्रवास सक्षमपणे होताना दिसतो आहे. आपले घर स्वच्छ ठेवण्या सोबतच शहर स्वच्छतेबाबत स्त्रियांनीच पुढाकार घेतलेला दिसून येतो.

**निष्कर्श :-**

भारत महासत्तेकडे वाटचाल करत असताना जी आव्हाने भारतापुढे आहेत त्यात स्वच्छता हे सर्वात मोठे आव्हान आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आपण मोठमोठे उद्योग उभारले धरणे बांधली, रेल्वे, रस्ते, विमानसेवा अशा अनेक बाबतीत आपण खूप प्रगती केली पण स्वच्छता हा आतापर्यंत आपल्या देशात सर्वाधिक दुर्लक्षित विषय राहिला आहे. केवळ भौतिक सुविधा निर्माण करून राष्ट्र विकसित होत नाही. जो पर्यंत आपण पर्यावरण पूरक व आरोग्यदायी राहणीमान तयार करणार नाही तो पर्यंत विकसित राष्ट्र होऊ शकत नाही. "स्वच्छतेची सप्तपदी" ही योजना २०१९ पर्यंत आपले उद्दिष्ट गाठेल केवळ हागनदारी मुक्ती हे उद्दिष्ट नाही. घनकचरा निर्मूलन करतांना त्याचा खते, जैविक इंधन इत्यादी स्वरूपात पूर्नवापर करणे, सांडपाणी प्रक्रिया हे ही उद्दिष्ट आहे. या माध्यमातून निरोगी शहरे निर्माण करता येतील परंतु सर्वात मोठे आव्हान व्यक्तीच्या मानसिकतेला बदलवण्याचे आहे. सर्वत्र कचरा आणि घाण पसरवणाऱ्या प्रवृत्तीना बदलवणे हे काही एका रात्रीत घडून येण्यासारखे नाही. स्वच्छता आणि आरोग्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आपल्याकडे अजूनही वैयक्तिक स्वच्छतेलाच फार महत्व दिले जात नाही तिथे सार्वजनिक स्वच्छता ही केवळ सरकारी, गैरसरकारी संस्थाची जबाबदारी आहे, असे म्हटले जाते. परंतु आपले कुटुंब, गाव, जिल्हा राज्य आणि देश प्रगतीकडे जायला हवा असेल तर स्वच्छते कडे लक्ष पुरवणे आवश्यक आहे. हे अभियान यशस्वी करण्यात सर्व सामान्य महिला, महिला नगराध्यक्षा आणि मुख्याधिकारी यांचा सर्वात मोठा सहभाग आहे. ही केवळ शासकीय योजना राहिलेली नसून महाराष्ट्रातील स्वच्छतेची लोकचळवळ झाली आहे. स्त्रिया आणि पुरूष दोघांनीही ही सप्तपदी एकत्रित पुंढे नेण्याची गरज आहे. तरच "स्वच्छ महाराष्ट्र सुंदर महाराष्ट्र" हे स्वप्न सरकार होईल आणि शहरे स्वच्छ व पर्यावरण पूरक राहतील यात शंका नाही.

**संदर्भ :-**

१) लोकराज्य - मार्च २०१६
२) प्रतियोगिता दर्पण - मार्च २०१६
३) सकाळ, लोकसत्ता

◆◆◆

# "स्वच्छ भारताच्या अंतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियान"

✍ ममता आर. साहू
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
स्व. वसंतराव कोल्हटकर कला महाविद्यालय,रोहणा.
सदस्य क्रं. – १३६

## प्रस्तावना :

गांधीजींच्या मते स्वच्छता पवित्रता आणि आत्मसन्मान जगण्यासाठी पैशाची आवश्यकता नसते. आरोग्यासाठी स्वच्छतेची आवश्यकता असते. स्वच्छता म्हणजे केवळ आंघोळ करणे नव्हे तर सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, मलमुत्र विसर्जित करणे आणि कचरा फेकणे यामुळे अनेक आजारांना निमंत्रण मिळते त्यामुळे ते टाळणे अति आवश्यक आहे. देशातील सर्व शहरामधील नागरिकांना स्वच्छ पर्यावरण व चागले आरोग्य मिळावे यासाठी केंद्र शासनाने स्वच्छ भारत अभियान संपुर्ण देशामध्ये राबविल्या जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वच्छ, सुंदर व पर्यावरण मुक्त देशाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र राज्यात मोठया प्रमाणात हे अभियान राबविल्या जात आहे या अभियानाला भरपूर मोठे प्रतिसाद मिळत आहे. घर स्वच्छ राहिले तर गांव स्वच्छ राहिल, गांव स्वच्छ राहिले तर शहर स्वच्छ राहील, शहर स्वच्छ राहिले तर महाराष्ट्र राज्य स्वच्छ राहिल, पर्यायाने भारत देश हे स्वच्छ राहिल, स्वच्छतेमुळे आरोग्य चांगले राहण्यास मदत होईल. त्यासाठीच महाराष्ट्र राज्याने नागरी व ग्रामीण भागातील स्वच्छतेवर लक्ष केंद्रीत केले आहे.

## संशोधनाचा उदेश्य:

स्वच्छता राखणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे. आणि स्वच्छ सुंदर भारत म्हणजे राष्ट्रभक्तीचा जागर आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या २०१९ मध्ये साजऱ्या होणाऱ्या १५० व्या जयंती निमित्य देश स्वच्छ करुन त्यांना अनोखी श्रध्दांजली अपर्ण करायची आहे आता स्वच्छ भारताचे स्वप्न पूर्ण करण्याची गरज आहे. स्वच्छता राखणे हे फक्त सफाई कर्मचाऱ्यांचे काम नसून, देशांतील १२५ कोटी जनतेचे कर्तव्य आहे.

## स्वच्छतेचे महत्व व स्वच्छता दूत :

संत गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्राम स्वच्छतेला महत्व देतांना लोक सहभागावर अधिक भर दिला. महाराष्ट्राची जनता प्रागतिकतेची कास धरणारी आहे. त्यामुळे 'स्वच्छ महाराष्ट्राचे स्वप्न निश्चित साकारेल ग्रामीण भागाच्या समस्या शहरापेक्षा वेगळ्या असतात. त्यामध्ये शौचालयाची निर्मिती आणि त्यांचे आंपले आरोग्य आणि मानसिकता महत्वाची असते. अस्वच्छतेमुळे आरोग्यावर अनिष्ट परिणाम होतात.

आपण जो पर्यंत पर्यावरण पूरक बनत नाही तो पर्यत आपला खऱ्या अर्थाने विकास होणार नाही. स्वच्छता त्याचा थेट संबंध सामान्य माणसांच्या जीवनाशी आहे. शहर ग्रामीण भाग स्वच्छ व सुंदर होत असेल तर सामान्य माणसाचे जीवनमान ही उंचावणार आपल्या काही मुलभुत सवयीमध्ये बदल होणे गरजेचे आहे. महाराष्ट्र राज्यात विदर्भातील वाशिम जिल्ह्यातील संगीता आव्हाडे यांनी आपला

मंगळसूत्र विकून शौचालय बांधले. तर अकोला जिल्ह्याच्या बाळापूर तालूक्यातील चैताली राठोड ने आपल्या लग्न सोहळ्यामध्ये रुखवतांच्या व सोन्याच्या दागिन्या ऐवजी शौचालय बांधून देण्याची मागणी केली तसेच सुवर्णा लोखंडे यांनी कर्ज काढून शौचालय बांधले या खऱ्या अर्थाने स्वच्छता दूत आहेत. छोटया-छोटया प्रयत्नातून मोठ्या बाबी साध्य होतात.

## घन कचऱ्याचे व्यवस्थापन एक मोठे आव्हान :

महाराषट्र राज्यात दररोज निर्माण होणाऱ्या २० हजार मेट्रीक टन कचऱ्यापैकी १६ हजार मेट्रीक टन कचरा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था कडून संकलित होतो. सा कचऱ्यापैकी केवळ १३०० मेट्रीक टन कचऱ्यावर सध्या प्रक्रिया होते. या आकडेवारी वरुन या बाबतचे आव्हान किती मोठे आहे यांची कल्पना आम्हाला येऊ शकते. हे आव्हान पेलण्यासाठी शासकीय यंत्रणेला नागरिकांच्या प्रयत्नांची जोड मिळायला पाहिजे. या समस्येच्या प्रभावी निराकरण साठी स्वयंस्फुर्त लोक सहभाग ही सर्वात महत्वाची गरज आहे.

२०११ जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्याची नागरी लोकसंख्या ५ कोटी ८ लक्ष २७ हजार ५३१ (राज्यांच्या एकुण लोकसंख्या ४५.२३%) ऐवढी नागरी भागातील एकूण कुटुंबाची संख्या १ कोटी, ८ लक्ष, १३ हजार ९२८ ऐवढी आहे. त्यापैकी २९% कुटुंबांना वैयक्तिक शौचालयाची सुविधा उपलब्ध नाही. शौचालयाची सुविधा उपलब्ध नसलेल्या कुटुंबापैकी ७३% कुटुंबे सार्वजनिक शौचालयाचा वापर करतात तर २७% कुटुंबे आज ही उघडयावर शौचास जात आहे. महाराष्ट्र राज्यात २६ महानगरपालिका व २३९ नगर परिषदा असे एकूण महाराष्ट्र २६५ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामधून दरदिवशी निर्माण होणाऱ्या धनकऱ्याची आधुनिक शास्त्रशुध्द पध्दतीचा अवलंब करुन फारच थोडया शहरामध्ये विल्हेवाट लावली जात आहे.

सारांश रुपाने असे म्हणता येईल की स्वच्छता या धोरणाची खरी सुरुवात करण्यासाठी आपल्याला स्वत: पासुन सुरवात करणे आवश्यक आहे. आम्हाला स्वत: मध्ये स्वच्छते साठी काही बाबीची सवय लावणे आवश्यक आहे. जसे मी कधीही अस्वच्छता करणार नाही. मी ओला व सुखा कचरा वेगवेगळा करुन तो कचरा वाहतूक दाराकडे देईल. सार्वजनिक ठिकाणी मी स्वच्छता राखेल व ही ठिकाणी कोणी अस्वच्छ करत असेल तर त्यांना त्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करेल. मी वैयक्तिक आणि सार्वजनिक शौचालयांचा वापर करेन आणि त्यांच्या वापरासाठी इतरांनाही प्रवृत्त करेल. मी सार्वजनिक ठिकाणी थुंकणार नाही स्वच्छतेच्या मोहिमेत मी माझ्या वैयक्तीक पातळीवर जनजागृती करण्याचा निर्धार करते. स्वच्छ महाराष्ट्र मी हरित करण्याची प्रतिज्ञा घेतो. असे विचार महाराष्ट्र राज्यातील लोकांचे मनात जो पर्यंत रुजत नाही तो पर्यंत महाराष्ट्र राज्यात स्वच्छतेचे धोरण यशस्वी होणार नाही.

## संदर्भ ग्रंथ सुची :


१) लोकराज्य २) योजना ३) अर्थसंवाद

४) भारतातील राजकिय विचारवंत भालभोळे, पिंपळापुरे प्रकाशन, नागपुर.

५) आधुनिक भारताचा इतिहास कोठेकर/वैद्य, प्रकाशन किताब महल, नागपुर.

६) माझे सत्याचे प्रयोग आत्मचरित्र महात्मा गांधी


◆◆◆

# "स्वच्छ भारत अभियान आणि प्रसार माध्यम"

✍ ज्योती पांडे राय
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
एन. जे. पटेल कला व वाणिज्य
महा. मोहाडी, जि. भंडारा.

## एक कदम स्वच्छता की ओर

महात्मा गांधी म्हणाले होते स्वच्छता हे ईश्वराचे दुसरे रुप आहे, मी दृढतेने सांगतो की, आपण आपली स्वच्छता स्वत:करायला पाहिजे.... चला एक पाऊल स्वच्छतेकडे.

हाथ, मुँह बम,.... हाथ साबुन से धोयेंगें, मुँह-शुद्ध जल पियेंगे..., बम- स्वच्छ शौचालय में शौच करेंगे..

अशा एक नाही, अनेक जाहिराती आपण पाहतो, ऐकतो वाचतो, आश्चर्य वाटतं ना...! कि, भारत सरकारला स्वच्छतेकरीता जनजागृती करावी लागतेय,

**प्रस्तावना :**

भारत सरकारने १ एप्रिल १९९९ ला संपूर्ण स्वच्छता अभियान सुरू केले. १ एप्रिल २०१२ ला निर्मल भारत अभियान सुरू केले, व्यक्तिगत स्वच्छता आणि पर्यावरण स्वच्छता करण्याकरीता असे जागरूकता कार्यक्रम भारत सरकारद्वारा सुरू करण्यात आले, परंतु प्रभावी ठरले नाही.

**पार्श्वभूमी :**

राष्ट्रपीता महात्मा गांधी म्हणाले होते, ह्याचाच आधार घेवून आज स्वातंत्र्य प्राप्तीच्या ६७ वर्षानंतर म्हणून मा. प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजींनी २ ऑक्टोबर २०१४ ला राजघाट नवी दिल्ली येथे झाडू लावून स्वच्छ भारत अभियान सुरु केले.

स्वच्छ भारत अभियान हे राष्ट्रीय अभियान आहे.

**आवश्यकता व उद्दिष्टये :**

स्वच्छ भारत अभियान सुरु करण्याची मुख्य आवश्यकता म्हणजे २ ऑक्टोबर २०१९ पर्यंत राष्ट्रपीता महात्मा गांधीच्या १५० जयंती पर्यत भारत घाणमुक्त करावयाचा आहे.

ह्या अभियानात मा. प्रधानमंत्रीद्वारा सर्वप्रथम नऊ राजदुत नेमण्यात आले. सलमान खान, अनिल अंबानी, कमल हसन, कपील शर्मा, प्रियंका चोप्रा, शशी थरुर, सचिन तेंदुलकर, कैटरिना कैफ हे सर्व राजदुत शहरी विकास मंत्री वैकय्या नायडू ह्यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत आहेत.

**उद्दिष्टये व लक्ष्ये :**

स्वच्छ भारत अभियानाची काही लक्ष्ये व उद्दिष्टये पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतात.

१) स्वतंत्र, वैयक्तिक पक्के शौचालय बांधणे.
२) भारतातील उघडे शौच पुर्णपणे बंद करणे.
३) अस्वास्थकर शौचालय ऐवजी फ्लॅश शौचालय बांधणे.

४) उघडी नाली, गटारे, बंद करणे.

५) प्रत्येक शौचानंतर हात साबणाने स्वच्छ धुण्याची सवय लावणे.

६) ग्रामपंचायत, नगरपालिकाद्वारा घनकचरा, द्रव्यकचरा सांडपाणी ई. चा निचऱ्याची सोय करून वैज्ञानिक पद्धतीने मल प्रबंधन करणे.

७) गाव स्वच्छता मोहीम राबविणे.

८) गावागावात सामाजिक जागरूकता निर्माण करणे.

९) पाण्याच्या टाक्या, जलव्यवस्थापन, जलनियोजन, योग्य शुद्ध पाणीपुरवठा, पाणीटंचाई दूर करणे इत्यादी सोयी २ ऑक्टोबर २०१९ पर्यंत पूर्ण करणे.

१०) संपूर्ण भारतात सफाई सुविधा, शाळा, महाविद्यालयातील बगीचे, इमारतीची रंगरंगोटी सुरक्षा लागू करणे.

**कार्यपद्धती :**

मा. प्रधानमंत्रीद्वारा लागू करण्यात आलेले स्वच्छता भारत अभियान तीन क्षेत्रात सुरु करण्यात आले आहे. त्याकरीता विशिष्ट रकमाची वित्त व्यवस्था सुरू करण्यात आली आहे.

अ) शहरी क्षेत्र ब) ग्रामीण क्षेत्र क) शिक्षण क्षेत्र

**अ) शहरी क्षेत्र :** स्वच्छ भारत अभियानातंर्गत शहरातील १.०४४ करोड कुटूंबांना लक्ष ठेवून २.५ लक्ष सामुदायी शौचालय, २.६ लक्ष सार्वजनिक शौचालय आणि प्रत्येक शहर वासीयांना मुलभूत सोयी उपलब्ध करून देणे आहे. सार्वजनिक शौचालय पर्यटन स्थळ, बाजार, बस स्टॉप, रेल्वे स्टेशन इ. ठिकाणी निर्माण करावयाचे आहे. ह्याकरिता ६२ हजार करोड रु. खर्च निर्धारीत करण्यात आला आहे.

**ब) ग्रामीण क्षेत्र :** ग्रामीण भागात स्वच्छता विषय जनजागृती, शुद्ध पेयजलची सुविधा, इ. तरतुदी सुरु करण्यात आल्या येत्या ५ वर्षाच्या कालात उघडयावर शौचालय बसणे पूर्णपणे बंद करून जवळजवळ ११ करोड ११ लक्ष शौचालय बांधण्याचे उद्दिष्ट निश्चित कण्यात आले आहे. त्याकरीता जवळ जवळ १ लक्ष ३५००० करोड रुपये खर्च करण्याची तरतुद करण्यात आली आहे. ग्रामीण जनता, शाळा, ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद ह्यांच्या सहाय्याने सर्व कार्य करण्याची तरतुद करण्यात आली आहे. ग्रामीण भागात व्यक्तीगत शौचालयाकरीता १०,०००/- रु. वरून १२०००/- धन राशी देण्याचे निश्चित करण्यात आले आहे. ह्यामध्ये हात स्वच्छ करणे मोहिम संडास साफ करणे, सांडपाण्याची सोय करणे इत्यादी समावेश करण्यात आला आहे. सरकारकडून ९०००/- रु. आणि राज्यसरकार कडून ३००० रु. चे योगदान लागू करण्यात आले आहे.

**क) शिक्षण क्षेत्र :** मानव संसाधन विकास मंत्रालयद्वारे स्वच्छ भारत, स्वच्छ विद्यालय अभियान २५ सप्टेंबर २०१४ पासून ३१ ऑक्टोबर २०१४ पर्यंत केंद्रीय विद्यालय, नवोदय विद्यालय येथे लागू करण्यात आले. ह्यामध्ये पुढील मुद्दे समाविष्ट करण्यात आले आहे.

१) शाळा सुरू असतांना प्रत्येक विद्यार्थ्यांना एस.बी.ए. आणि महात्मा गांधीनी सांगितलेल्या स्वच्छता अभियानासंबंधी माहिती देणे.

२) वर्ग, प्रयोगशाळा, ग्रंथालय, इ.ची सफाई करणे.

३) शाळेत असलेली मुर्ती, शाळेला योगदान करणारे थोर पुरुषांचे, फोटो इ. ची सफाई करणे.

४) शाळेतील बाग, बगीचे साफ ठेवणे.

५) शाळेची इमारत, रंगरंगोटी लक्ष केंद्रीत करणे.

अशा अनेक मुद्यांवर लक्ष केंद्रीत करून स्वच्छतेवर निबंध स्पर्धा, समयस्फुर्त भाषण, वादविवाद स्पर्धेचे आयोजन करणे. त्याच बरोबर मंत्रालयामध्ये शाळेतील विद्यार्थी, शिक्षक समाजातील सदस्यांना शामील करणे.

**प्रसारमाध्यम व जाहिरात क्षेत्र :**

आम्हा भारतीयांमध्ये अनुकरण प्रवृत्तीचा पगडा मोठ्या प्रमाणात आढळतो, एखादे अभियान, चळवळ, उत्पादन विक्री करण्याकरीता सुरुवातीपासूनच मिडीया, जाहिरात क्षेत्राचे महत्व आढळते.

स्वच्छ भारत अभियान यशस्वी करण्याकरीता ह्या अभियानाची उद्दिष्ट्ये, लक्ष्ये पूर्ण करण्याकरीता अनेक प्रसार माध्यमे कार्यरत आहे. T.V. Radio, News, Channels वर्तमानपत्रे, नियतकालिके, साप्ताहिके, मासिके, Whatsapp, apps, facebook, twitter अशा अनेक प्रसार माध्यमाद्वारे स्वच्छता भारत अभियान सफल करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

राऊरकेला येथे एन.आय.टी.च्या पी.एच.डी.च्या विद्यार्थ्यांनी तुमुर येथे शालेय विद्यार्थ्यांनी लघु चित्रपट, पथनाट्याद्वारे स्वच्छ भारत अभियान लोकांसमोर सादर केले आहे. स्वच्छता भारताव कविता, प्रधानमंत्र्याच्या मन की बात कार्यक्रम, अनेक अभिनेते, अभिनेत्री, राजकीय नेते, उद्योगपती, समाजसेवक, कॉमेडीयन, क्रिकेटर्स, Women empoverment, रामोजीराव, सोनल मानसिंग, गायक, गायिका, पद्मनाभ आचार्य, स्वच्छभारत अभियान, यशस्वी करण्याकरीता कार्यरत आहेत. स्वच्छ भारत, भारतरत्न, स्वच्छ भारत, ॲप्स, रियल टाईम Monetetering system स्वच्छ भारत नेपाल अभियान असे अनेक कार्यक्रम राबविण्यात येत आहेत.

**मुल्यांकन/निष्कर्ष :**

२ ऑक्टोंबर २०१४ ला राजघाट दिल्ली येथे स्वतः झाडू मारुन स्वच्छता करणाऱ्या मा. प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी सुरु केलेले स्वच्छता भारत अभियान महात्मा गांधीच्या २ ऑक्टोबर २०१९ च्या १५० व्या जयंती पर्यंत पूर्ण करायचे आहे. ह्यामध्ये प्रसारमाध्यमांना सिंहाचा वाटा आहे. स्वच्छ भारत अभियान हे एक राष्ट्रीय अभियान आहे. भारताच्या गल्लीपासून दिल्लीपर्यंत ह्याची अंमलबजावणी सुरु आहे. हे एक आव्हान आहे. भारतीयांना स्वागतार्ह आहे. निश्चितच आम्ही भारतीय हे आव्हान स्विकारण्यास, सफल करण्यास, बाध्य आहेत असे नक्की म्हणता येईल की, जाहीरात, टी.व्ही., आणि इतर प्रभावशाली प्रसार माध्यमांच्या आधारे आमचे स्वच्छ भारत अभियान १०० टक्के यशस्वी होईल.

म्हणून मा. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणतात तो क्या हम तरा करें ! २ ऑक्टोंबर २०१९ तक महात्मा गांधी के १५० वी जयंती तक हमारे घर, गली, चौराहे, गाव, स्कुल, अस्फताल महाविद्यालय, गंदगी का नामोनिशान नही रहने देंगे.

◆◆◆

# स्वच्छता अभियान आणि ग्रामीण भारत

शुभांगी मुनघाटे
मु.पो.डोंगरगाव/डेपो, ता. सडक/अर्जुनी,
जि. गोंदिया-४४१८०७
मो. ९४२३९१२८२१

प्रस्तावना :-

भारतीय समाजजीवन हे अस्ताव्यस्तपणा अस्वच्छता, बेपर्वावृत्ती, रोगराई ने ग्रासलेले दिसून येते. यामागे अनेक कारणांपैकी स्वच्छतेचा अभाव हे एक कारण आहे. अस्वच्छता मग ती व्यक्तीगत असो किंवा सार्वजनिक स्वरूपाची तिचे दुष्परिणाम गंभीर असतात. स्वच्छतेचे महत्व नागरिकांना समजावे याकरिता केंद्र व राज्य शासनामार्फत स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे म. गांधी "स्वच्छता" ही देवानंतरची महत्वाची बाब मानत असत. गांधीजी स्वच्छता, शिस्त, नेटकेपणा, शारिरिक श्रम याला त्यांच्या जीवनात प्राथमिक महत्व देत असत.

स्वच्छता हे सुंदरता, सत्यता पवित्रता, संपन्नता, निरोगी जीवन यांचा प्रारंभ असते. स्वच्छता स्वतःचे शरिराची, मनाची, कुटूंबाची घराची, कपडयांची, प्रांगणाची, रस्त्यांची, घराची, शेताची गावाची, देशाची सेवा होय. केरकचरा रत्यावर टाकणे, शौचाला उघडयावर जाणे, पान खाऊन थुंकणे आदी गोष्टी परदेशात वर्ज्य मानल्या. अनेक साथीचे आजार या अस्वच्छतेमुळे होतात.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑक्टोंबर २०१४ मध्ये "स्वच्छ भारत अभियान" सुरू केले. गेले वर्षभर सुरू असलेले "स्वच्छ भारत अभियान" लोकप्रियतेची नवीन शिखरे सर करतं असतांना स्वच्छतेबाबत जनसामान्यांमध्ये जागरूकता देखील वेगाने पसरत आहे. या अभियाना अंतर्गत दहा लाखाहुन अधिक लोकसंख्या असणाऱ्या शहरांची यादी जाहिर केली जाते ही यादी जाहीर करण्यासाठी स्वच्छ भारत अभियानाचे मुख्य घटक पायाभुत सुविधांची उपलब्धता तसेच घरगुती स्वच्छतागृहे आणि शहरातील घनकचरा एकत्र करून त्याची वाहतूक व विल्हेवाट लावण्यासारख्या निकशांवर विचार केला जातो. स्वच्छ भारत योजनेसाठी २०१९ पर्यंत ६२ हजार कोटी खर्च होणार आहे. त्यातील १४ हजार ६२३ कोटी केंद्र सरकार, ४८७४ कोटी खर्च राज्य सरकार, उर्वरित ४२ हजार ५१२ कोटी रूपयाचा निधी खाजगी क्षेत्रातून उभा केला जाणार आहे.

ग्रामीण स्वच्छता :

स्वच्छता अभियान शहरी तसेच ग्रामीण क्षेत्रातही राबविले जात आहे. ग्रामीण स्तरावर स्वच्छता अभियान राबविले जात आहे, या अभियाना

अंतर्गत ग्रामीण जनतेला स्वच्छतेचे महत्व समजावून सांगण्यात येते, ग्रामीण भागासाठी स्वच्छता विषयक विविध योजना शासनामार्फत राबविल्या जात आहेत. या योजनांच्या यशस्वीतेसाठी लोकजागृती करण्यात येत आहेत. विविध प्रचार व प्रसार माध्यमामार्फत जाणीव जागृती करण्यात येत आहे. या योजनांत शौचालय, शोषखड्डे, गटारे, पदपथ, अंगणवाडी, शालेय स्वच्छता कार्यक्रम, आरोग्य केंद्रे, निर्धुर चूली, पिण्याच्या पाणी इ. योजनांचा समावेश आहे.

महाराष्ट्रात सन २००० ते २००१ पासुन महाराष्ट्र शासनाने संपूर्ण स्वच्छता अभियानास सुरूवात केली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज "स्वच्छ ग्राम स्पर्धा" संत गाडगे बाबा "ग्राम स्वच्छता अभियानाव्दारे" स्वच्छतेकडून समृद्धीकडे घेऊन जाणाऱ्या या कार्यक्रमाला उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला. राष्ट्रपिता म. गांधी यांची जयंतीसुद्धा स्वच्छ ग्रामस्पर्धा अभियान दिन म्हणून साजरी केली जाते.

हाती धरूनी झाडू – तू मार्ग दाविलासी ।
स्पर्षे तुझ्या महात्म्या – ये थोरवी श्रमाची ।।

संत गाडगेबाबा गावागांमधून फिरून संपूर्ण परिसर स्वच्छ करीत. साधू संतांनी भजन, किर्तनाच्या माध्यमातून लोकजागृती करून स्वच्छता आणि आरोग्याच्या परस्परसबंध दाखवून दिला.

अस्वच्छतेमुळे अनेक संसर्गजन्य रोग होत आहेत. कॉलरा, प्लेग यासारख्या रोगामुळे कित्येक लोक मृत्यूमूखी पडलेत. म्हणून शासनाने ग्रामीण स्वच्छता अभियानाच्या स्वरूपात राबविण्यास प्रारंभ केला. प्रत्येक कुटूंबातील सदस्याने उघडयावर न जाता शौचालयाचा वापर करावा. गावातील प्रत्येक घरी शौचालय असावा. सांडपाणी वाहून नेण्यासाठी गटारांची व्यवस्था असावी. गटारे तुंबलेली नसावित. घराघरातील कचऱ्याचा निचरा करण्यासाठी कचराकुंडीचा वापर करावा, दुषीत पाण्याचा वापर टाळावा. परिसराची स्वच्छता राखावी. विविध आजारांवरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणजे स्वच्छता.

**उद्दिष्टे :**

स्वच्छता अभियान ग्रामीण भागात राबवित असतांना काही महत्वपूर्ण उद्दिष्टांकडे लक्ष दयावयास हवे. सर्वप्रथम स्वच्छतेचे महत्व नागरिकांना समजावून देतांना स्वच्छतेपासून होणारे फायदे, तोटे, आरोग्यास हानी पोहचविणारे घटक याबाबतीत जागरूकता निर्माण करावी लागेल. स्वच्छता राबविण्यासाठी नेमकी उद्दिष्टे कोणती? त्याची अंमलबजावणी कशी करावी ? याची ठराविक माहिती ग्रामीण लोकांना करून दयावी. ग्रामीण भागात अज्ञानाचे प्रमाण अधिक दिसून येते. ती दूर करून स्वच्छतेविषयी जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न विविध माध्यमांव्दारे करण्यात येत आहे.

**शासकिय उपाययोजना :**

आरोग्यासबंधी सर्व गोष्टी म्हणजे स्वच्छता यासाठी शासनामार्फत विविध उपाययोजना राबविण्यात येतात. यात –

१) पाणी व्यवस्थापन
२) घनकचरा व्यवस्थापन
३) सांडपाणी व्यवस्थापन
४) शौचालये

यासारख्या विविध स्तरावर उपाययोजना करून स्वच्छता राखण्याचा प्रयत्न सुरू आहे.

**१) पाणी व्यवस्थापन :**

ग्रामीण भागातील सार्वजनिक विहीरी, हॅण्डपंप, तलाव यातील पाण्याचे नमुने तपासणीकरिता ते पाणी पिण्यास उपयुक्त आहे अथवा नाही, दुषीत असल्यास त्यावर उपायोजना करण्यात येते. पाणी व्यवस्थापनात पाण्याचा उचित वापर करणे अति पाण्याचा वापर होऊ नये याची खात्री करावी, सार्वजनिक विहिरी नळ अथवा हॅण्डपंपचे वाहणारे पाणी वाहुन जाण्यासाठी पक्की नाली बांधुन ते पाणी गुराढोरांना उपयोगी ठरेल. पावसाचे पाणी साठविण्याकरिता Harwest Water Plan सारख्या योजना राबवून पावसाचे पडणारे पाणी कौलारू घरांना त्या पद्धतीने जोडून तशी योजना प्रत्येकच गावातून अंमलात आणण्यात त्या पाण्याचा वापर होऊ शकेल. पाण्याचा पूनर्वापर सुद्धा उत्तम उपाय आहे.

**२) घनकचरा व्यवस्थापन :**

देशातील ७० : शेतकरी ग्रामीण भागात राहतात. शेती करणे, गुरेढोरे, शेळया, मेंढया पालन, कुक्कटपालन इ. अनेक लघुउद्योग खेडयामधुन चालतात. पाळीव प्राण्यांचे गोठे बांधुन त्यामध्ये मलमुत्र जमा होत. शेण कचऱ्याच्या विल्हेवाटा साठी असणारे उकीरडे घराला लागुन असतात. शेतकरी महिला, पुरूष शेणकचरा हातानें उचलतात. नखांमधील घाण अन्नामार्फत पोटात जातो त्याव्दारे आरोग्य धोक्यात येते. घनकचरा व्यवस्थापन करण्यासाठी शेतकऱ्याने गटगटाने तालुकास्तर, ग्रामपंचायत स्तर, प्रबोधन करणे व स्वच्छतेसबंधी जागृतता निर्माण करण्याचा प्रयत्न शासनामार्फत करण्यात येते आहे. महिलामंडळे गाव स्तरावरील सामाजिक संस्थांचे कार्यकर्ते लोकप्रतिनिधी तसेच महिलांचे मेळाव्यांमधून मार्गदर्शन करण्यात येते. मेळाव्यांमधुन ग्रामीण महिलांना उद्बोधन होईल, त्यांना स्वच्छतेचे महत्व कळेल असे असावेत. त्याचा उद्देश गाव, परिसर बाबतीत आपली भूमिका काय? असा असावयास पाहिजे. स्वच्छ अभियानातील पुरस्कृत गावांना भेटी देण्यात याव्यात. त्यात स्थानिक लोकांना सहभागी करून घेण्यात यावे. शासनामार्फत राबविणाऱ्या योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात यावा.

**३) सांडपाणी व्यवस्थापन :**

ग्रामीण भागात सांडपाण्याचे उत्तम व्यवस्थापन होणे आवश्यक आहे. याकरिता ग्राम स्तरावर सांडपाण्याच्या व्यवस्थापनासाठी उपाययोजना आहेत बहुतेक गावांमध्ये रस्त्यांचे खडीकरण, सिमेंट रस्ते, सांडपाणी वाहून जाण्याकरिता सिमेंट नाल्यांचे बांधकाम करण्यात आलेले आहे. परंतु या नाल्यांची स्वच्छता होत राहिल्यास तुंबलेल्या नाल्यांमधील दुर्गंधी पासून डासांमुळे होणाऱ्या रोगांच्या पार्श्वभूमीवर नियंत्रण राहील. महिन्यातून एकदा नाल्यांचे सांडपाण्यांचे व्यवस्थापन करण्यात

यावे. जे रोगाला मारक असते. गावातील नाल्या मुख्य गटाराला जोडाव्यात यासाठी ग्रामपंचायत स्तरावर ही व्यवस्था करण्यात आली आहे.

**४) शौचालये :**

प्रत्येक कुटूंबाकडे शौचालये असावित ही शौचालये बांधण्याची जबाबदारी घरप्रमुखाची असली तरी आर्थिक परिस्थिती, मोठे कुटूंबाची अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य या गरजा भागविण्यासाठी पुरेसे उत्पन्न नसल्याने शौचालयाचा खर्च पेलवने कठीण जाते. शौचालये टप्याटप्याने बांधुन देण्याचा उपक्रम अलीकडे ७-८ वर्षापासुन हाती घेतला असला तरी तात्पुरती व्यवस्था केली गेली. शासनाकडुन शौचालये बांधण्याकरीता मानसिकदृष्टया तयार केल्या जात आहे. ज्यांच्याघरी शौचालये नाहीत त्यांना शासनाकडुन देण्यात येणाऱ्या योजनांमार्फत लाभ घेतल्यास यश मिळू शकते.

**सारांश :**

स्वच्छता अभियान ग्रामीण राबवितांना लोकांचा सहभाग अवश्यक आहे. स्वच्छतेचे महत्व ग्रामीण स्तरावरील लोकांना विविध उपक्रम व कार्यक्रमाच्या आधारे पटवून देणे. त्यात स्थानिक जनतेला सहभागी करून स्वच्छता अभियान अधिकाधिक यशस्वी करण्याचा प्रयत्न देश पातळीवर तसेच ग्रामपातळीवर होत आहे. शाळा महाविद्यालय विद्यार्थ्यांकडून स्वच्छता मोहिम राबविण्यात येते.

**शिफारसी :**

१) स्वच्छता राबविण्यामागची उद्दिष्ट नेमकी कोणती ? त्याची अंमलबजावणी कशी आणि का करावी ? याची माहिती ग्रामीण लोकांना करून द्यावी.

२) सांडपाण्याचे व्यवस्थापन करण्यासाठी नाली बांधून महिन्यातून किमान एकदा सफाई करण्यात यावी.

३) पाण्याचा वंचित वापर करण्यात यावा. वाहणारे पाणी शोषखड्डे किंवा Harwest Water Plan सारख्या उपाययोजना करून पाण्याचा पूर्नवापर करण्यात यावा.

४) घनकचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करण्यात यावे. कुजलेल्या कचऱ्यापासुन खतनिर्मिती करून त्याचा वापर करण्यात यावा.

५) शौचालये बांधून स्वच्छता अभियानाची यशस्वीता नागरिकांच्या सहभागावर अवलंबून आहे. जोपर्यंत नागरिकांना आपला परिसर स्वच्छ ठेवणे ही आपली जबाबदारी आहे. याची जाणीव होणार नाही स्वच्छता अभियानात नागरिकांचा सहभाग वाढणार नाही तोपर्यंत स्वच्छता अभियान यशस्वी होणार नाही..

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१) स्वच्छतेच्या पाऊलवाटा.

पंचायतराज प्रशिक्षण केंद्र, नागपूर.

२) पाणी गुणवत्ता, सनियंत्रण व सर्वेक्षण प्रशिक्षण पुस्तीका, जिल्हा परिषद गोंदिया.

◆◆◆

# तरूणाईचे नवे धडे स्वच्छतेतून समृध्दीकडे

✍ अनिल दे. गायकवाड
अर्थशास्त्र विभागप्रमुख
राजीव गांधी महाविद्यालय, सडक/अर्जुनी,
जि. गोंदिया, मो. नं. - 9545155397

**प्रस्तावना -**

"स्वच्छता असेल ज्याच्या दारी
आरोग्य नांदेल त्याच्या घरी."

अस्वच्छतेमुळे मानवाचे आरोग्य धोक्यात आले आहे. मानवाला अनेक रोगांना बळी पडावे लागत आहे. दिवसेंदिवस मानवाचे आर्युमान हे कमी होत चालले आहे. त्यामुळे आज आपणा सर्वांना स्वच्छतेचे महत्व कळु लागले आहे. स्वच्छता ही आज काळाजी गरज ठरली आहे. अस्वच्छतेच्या साम्राज्यातुन मुक्त होण्यासाठी शासन अनेक उपाययोजना करत आहे. शहरी आणि ग्रामिण भागात जनजागृती करता यावी यासाठी स्वच्छतेवर आधारीत विविध स्पर्धा घेणे हा सुध्दा स्वच्छतेकडे जाण्याचा एक प्रयत्न आहे.

'स्वच्छता म्हणजे फक्त आपली वैयक्तीक स्वच्छता नसुन जिवनाश्यक असलेल्या पाण्याची स्वच्छता, मानवी जिवनाचीं मुलभूत गरज असलेल्या अन्नाची स्वच्छता, ज्या समाजात राहुन व्यक्ती स्वतःचा विकास करतो, लहानाचा मोठा होतो, त्या परिसराची स्वच्छता आणि गल्लोगल्ली इतरत्र पसरलेल्या कचऱ्याची योग्य विल्लेवाट लावणे म्हणजे स्वच्छता होय.' स्वच्छतेचा मुद्दा आजचाच नसून गेल्या कित्येक वर्षापासून आहे. संत गाडगेबाबांनी कुठल्याही गोष्टीचा अथवा संसाराचा मोह न बाळगता आपले संपुर्ण आयुष्य स्वच्छता व स्वच्छतेचे महत्व पटवून देण्यात घालवले. दिवसभर हातात झाडु घेऊन गावोगाव स्वच्छ करत फिरले व संध्याकाळी गावातील लोकांना एकत्रीत करून आपल्या किर्तनाच्या माध्यमातुन स्वच्छतेचे महत्व पटवून दिले.

केंद्र शासनाने नोव्हेंबर १९८६ ला स्वच्छता अभियानाची रूपरेषा आखली. त्यात प्रत्येक वर्षी काही प्रमाणात बदल करून शेवटी २३ एप्रिल १९९९ ला स्वच्छता अभियानाचा कायदा पारित केला. शासन स्वच्छतेबाबत अनेक योजना राबविते त्यात - स्वच्छता अभियानाअंतर्गत दलित वस्ती सुधार योजना राबविते. त्यात सडक/अर्जुनी तालुकातील चिंचटोला या गावाला पुरस्कार सुध्दा प्राप्त झालेला आहे. तसेच निर्मल ग्राम स्वच्छता योजनेअंतर्गत प्रत्येक घरात शौचालयाची व्यवस्था करता यावी यासाठी शासनाव्दारे प्रतिकुटूंब १२,००० रू. प्रोत्साहन निधी दिला जातो. प्रत्येक गावाला स्वच्छ व शुद्ध पाणी मिळावे यासाठी पाणी पुरवठा

योजना केली आहे. अशा विविध योजनांव्दारे परिसरात स्वच्छता ठेवून मानवाचे आरोग्य सुदृढ कसे राहता येईल व त्यांचा विकास करता येईल याकडे लक्ष दिलेले आहे.

भारताचे पंतप्रधान मा.श्री.नरेंद्र मोदी हे जपान आणि भुतान दौऱ्यावर गेले असता तेथील स्वच्छता पाहून ते प्रभावित झाले. त्यांच्या लक्षात आले की येथील स्वच्छतेमुळे या लोकांचे आरोग्य सुदृढ आहे व त्यामुळे त्यांची वयोमर्यादा वाढली आहे. भारतात परतल्यानंतर आपणही आपल्या देशात स्वच्छतेची मोहिम राबवून आपला देश स्वच्छ, सुंदर, निर्मळ व समृद्ध बनवू म्हणुन २ आक्टोबर २०१४ ला महात्मा गांधीजीच्या जयंतीचे औचित्य साधून संपुर्ण भारतात स्वच्छतेची मोहिम राबविली. स्वतः हातात झाडु घेऊन आपले कार्यालय व आपल्या आजुबाजुचा परिसर स्वच्छ केला.

नोव्हेंबर २०१५ च्या 'लोकराज्य' या मासिकात पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री श्री. बबनराव लेणीकर यांनी आपले मत प्रकट केले आहे. ते सांगतात की, संपुर्ण महाराष्ट्र स्वच्छ बनविण्यासाठी व जनतेला मुबलक पाणी उपलब्ध व्हावे यासाठी 'घरात शौचालय दारात पाणी' हे उदिदष्ट साध्य करण्याचा निर्धार त्यांनी केला आहे. शासन दुष्काळग्रस्त भागातील जनतेच्या पाठीमागे खंबीरपणे उभे असून, जनतेला स्वच्छत व शुध्द पाणी उपलब्ध करून देण्यासाठी ते काटेकोर प्रयत्न करणार आहेत. 'स्वच्छ भारत मिशन' या अंतर्गत स्वच्छतेबाबत उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायती, पंचायत समिती, जिल्हा विभाग व राज्य स्तरावर आणि राज्यातील निर्मल ग्राम पुरस्कार प्राप्त जिल्हा परिषदांना व पंचायत समित्यांनाही राज्य स्तरावरून बक्षिसे देण्यात येतात. या अभियाना अंतर्गत कुटूंब कल्याण, पिण्याचे पाणी व सांडपाणी व्यवस्थापन/सामाजिक एकता या क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींना बक्षीसे देण्यात येत आहेत.

मे २०१५ पर्यंत राज्यातील ६९,९४,४०१ (५६टक्के) कुटूंबाकडे शौचालयाची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे. २०१५-०१६ साठी १७,४३,२६४ कुटूंबाना वैयक्तीक शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्याची उदिष्ट आहे. राज्यातील ९८७८ ग्रामपंचायतींना तर ११ तालुक्यांना केंद्र शासनाच्या निर्मल ग्राम पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले आहे. स्वच्छ अभियानाची सर्व जिल्ह्यामधुन चांगल्या प्रकारे अंमलबजावणी करून २६०३ ग्राम पंचायती हागणदारी मुक्त होऊन महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आले आहे.

सोलापुर मध्ये घनकचऱ्याचे व्यवस्थापन करतांना विजयकुमार सोनवाने यांनी 'स्वच्छतेचा सोलापुर पॅटर्न' या अतर्गत विशेष मोहिम राबविली. १५ जानेवारी २०१५ पासून घरोघरी जावून कचरा गोळा केला. घंटागाडीचे मार्ग निश्चित करून त्याचे वेळापत्रक चौका-चौकात लावले. घंटागाडीतच कचरा टाकायचा आहे याची जाणीव नागरीकांना करून दिली. शहरात कुठेही कुंड्या न ठेवण्याची सक्त सूचना केली. त्यामुळे रोज ९५ टक्के कचऱ्याचे संकलन करणे भाक्य झाले. उघड्यावर शौचास जाणाऱ्यांचा गांधीगिरी पध्दतीने सन्मान करण्यात

आला. काही ठिकाणी गुलाब पुष्प देऊन भल्या पहाटे सन्मान करण्यात आला. या सन्मानानेही मानसिकता बदलली नाही त्या ठिकाणी उघड्यावर शौचालयास जाणाऱ्या व्यक्तींचे फोटो फलकावर झळकावण्यात आले. जिल्हाधिकारी तुकाराम मुंढे यांच्या या सर्व संकल्पना नगरविकास शाखेचे प्रशासन अधिकारी त्रिंबक ढेंगळे -पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी सोलापुर जिल्ह्यात अमलात आणल्या. सांगलीतील सुशिला भिमराव दुधाळ व रूक्मीनी दुधाळ या दोघींनीही स्वतःच्या गळ्यातील सर गहाण ठेवून स्वतःच्या घरी शौचालय बांधले. या दुधाळ बहिणी सांगली जिल्ह्याच्या स्वच्छतेच्या ब्रॅड ॲबेसेडर म्हणजेच स्वच्छतादुत बनल्या आहेत.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या स्वप्नातील स्वच्छ भारताची संकल्पना साकार करण्यास व व्यापक जन चळवळ उभी करण्यासाठी नागपुरात १२ जुन २०१५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांच्या उपस्थितीत, चिटणीस सेंटर येथे झालेल्या नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांच्या कार्यशाळेनंतर सुरूवात झाली. नागपुर जिल्ह्यात १२ नगरपालिका व महादुला आणि मौदा या झालेल्या नगर-पंचायतीमध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या मोहिमेला चांगले यश आले आहे. नागपुर विद्यापीठाअंतर्गत 'राष्ट्रीय सेवा योजना' NSS, NCC या योजनेअंतर्गत, एखादया खेडेगावात महाविद्यालयातून Camp नेले जातात? आठवडाभर त्या गावात राहून संपुर्ण गाव स्वच्छ केला जातो. तरूणांच्या मनात सुद्धा स्वच्छतेबाबत जागृती निर्माण झाली आहे परंतू अजुनही काही तरूण मंडळी यापासून अलिप्त आहेत. एखादया व्यसनात किंवा एखादया क्षणभंगुर सुखात अडकून बसला आहे. अशा युवकांना माझं म्हणणं आहे की, तरूणांनो जागे व्हा, आपल्या देशाच्या विकासाकडे लक्ष द्या, आपला देश स्वच्छ, सुंदर, समृद्ध बनवा. कारण तरूण हाच देशाचा आधारस्तंभ आणि भवितव्य आहे. युवा हाच वायुप्रमाणे अगदी जलद गतीने कोणत्याही गोष्टीचा प्रचार व प्रसार करू शकतो. संत तुकडोजी महाराजांनी सुध्दा म्हटले आहे, "उठो जवानो करके दिखाओ, कहने के दिन गए गए" याप्रमाणे आता फक्त बोलायची वेळ उरली नाही तर देशाला अस्वच्छतेच्या कचाट्यातून मुक्त करण्याचे कार्य करण्याची वेळ आहे.

गावातील सर्व तरूण एकत्र येऊन आठवड्यातून किमान १ दिवस आपल्या सभोवतालचा परिसर स्वच्छ करू शकतात. संध्याकाळी गावातील सर्व नागरीकांना एकत्रीत करून पथनाट्य, चर्चा, प्रबोधन या माध्यमातून स्वच्छतेचे महत्व पटवून देऊ शकतो. आपल्याला स्वच्छतेतून, समृध्दीकडे कसे जाता येईल, अस्वच्छता व प्रदुषण यामुळे मानव व इतर प्राण्यांना कशा प्रकारे रोगांना बळी पडावे लागते या गोष्टी पटवून देऊ शकतो. आज आपण बघतो मिडीयासुद्धा लोकांना स्वच्छतेबाबत प्रेरीत करण्यासाठी अनेक प्रकारच्या जाहीराती टि. व्ही. वर दाखवतोय. त्यात सिने अभिनेत्री विद्या बालनची सुद्धा एक जाहीरात दाखवली जाते. याचप्रमाणे प्रत्येक तरूणींनी अशी जिद्द ठेवावी व असे ब्रिदवाक्य ठेवावे की,

'शौचालय असेल ज्या घरी,
सुन बनून जाईन मी त्याच्या दारी'

शासन स्वच्छतेबाबत अनेक योजना राबवितो, मोहिमा काढतो परंतू काही क्षेत्र वगळता त्या योजना यशस्वी होत नाही याला कारणीभुत आपणच आहोत. मानवाने आपल्या स्वार्थी प्रवृत्तीमुळे संपूर्ण देशात अस्वच्छता व प्रदुषण पसरवून ठेवले आहे. स्वच्छतेबाबतही एखादी योजना शासनाने राबवावी ही आपल्या सामान्य नागरीकांसाठी अतिशय लाजीरवाणी गोष्ट आहे. आपण या देशाचे नागरीक या नात्याने आपले सुद्र्धा कर्तव्य आहे की, आपल्या देशात स्वच्छता ठेवून देशाला सुंदर, समृद्ध करावे. परंतू लोक हा विचार करतात की, कचरा माझ्या घरासमोर नाही, त्याच्या घरासमोर आहे. ही जी मानवाची मानसिकता बनलेली आहे ती बदलविणे फार गरजेचे आहे.

संत तुकडोजी महाराजांनी आपल्या ग्राम-गीतेत म्हटले आहे-

'सुसज्ज असावे गावचे तरूण
कोणतेही संकट येता ऐकुण
आपली सर्व कामे सोडून
धाव घ्यावी तयांनी''

याप्रमाणे आपल्या देशावर सध्या अस्वच्छतेचे संकट आले आहे आणि हे संकट दुर करण्यासाठी सर्व तरूणांनी येऊन देशाला या संकटातून मुक्त करायचे आहे. शेवटी 'आपला विकास हा आपल्या हाती आहे'.

संदर्भग्रंथ :

१. पर्यावरण शिक्षण : डॉ.डी.आर कुलकर्णी
२. लोकराज्य : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई नोव्हेंबर २०१५.
३. द एकानॉमीक टॉइम्स : २ आक्टोंबर २०१४
४. द टॉइम्स ऑफ इंडिया : २ आक्टोबर २०१४
५. अंक योजना : मे २०१५.
६. गोंदिया जिल्हा विकास पुरवणी, लोकमत : लोकमत दैनिक नागपुर १ मे २०१५.

◆◆◆

## : सूचना :

पुढील अंक

**जल व्यवस्थापन काळाची गरज**

या विषयावर आधारित राहील.
त्यामुळे यासंबंधी लेख पाठवावे.
लेख पाठवतांना सोबत
प्रिन्ट आऊट
अवश्य पाठवावे.

# संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान : एक अध्ययन

प्रभाकर उत्तमराव आठवले
सु.ना. कला व उ.खे. वाणिज्य महाविद्यालय,
अकोला.

**प्रस्तावना :**

आधुनिक काळात स्वच्छता अभियान आणि त्याचे महत्व अनेक जाहिरातीतून आपल्या समोर दररोज प्रसार माध्यमे जोराजोरात दाखवित आहेत किंवा याबाबत जाहिरात रेडीयो अथवा बातम्यांच्या माध्यमातून प्रकाशित केल्या जात आहेत. यावरून आजच्या अतिलोकसंख्येच्या आपल्या देशात स्वच्छतेची गरजेची तीव्रता स्पष्ट होते. स्वच्छतेचा अभाव ही समस्या गंभीर स्वरूप धारण करीत असून यामुळे अनेक संकटे निर्माण होत आहेत. परंतु याबाबत महत्त्वपूर्ण कार्य आपल्या अंभगांच्या माध्यमातून करण्याचे कार्य एका खुल्या व्यासपिठाने केले हे महामानव म्हणजे संतशिरोमणी खरे कर्मयोगी गाडगेबाबा यांनी केले होते. त्यांनी स्वतः हातात खराटा घेऊन ग्रामीण भागात स्वच्छता राखण्याचा मंत्र दिला त्यांनी गावातील स्वच्छतेबरोबर लोकांची मने स्वच्छ करण्याचा प्रयत्न केला. शासन सुद्धा स्वच्छता कार्यक्रम राबविण्यासाठी विविध योजनांची आखणी व अंमलबजावणी करत आहे. याचाच एक भाग म्हणून संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान हा कार्यक्रम राबविण्यात येतो. या कार्यक्रमाचे अध्ययन सदर शोधनिबंधातून केले आहे.

**शोध निबंधाची उद्दिष्टे :**

१. ग्राम स्वच्छता अभियानाची पार्श्वभूमी अभ्यासणे.
२. ग्राम स्वच्छता अभियानाची उद्दिष्टये अभ्यासणे.
३. शासनाच्या इतर स्वच्छता कार्यक्रमांची माहिती देणे.

**ग्राम स्वच्छता अभियान :**

सन २०००,०१ पासून महाराष्ट्र शासनातर्फे राबविल्या जाणाऱ्या स्वच्छता विषयक कार्यक्रमास महाराष्ट्रातील थोर असे संत की ज्यांनी गावोगावी फिरून स्वच्छताविषयक लोकजागृती केली त्यांच्या कार्याची स्मन्नती म्हणून अभियानास संत गाडगेबाबा स्वच्छता असे नाव दिले.

ग्राम स्वच्छता अभीयान म्हणजे ग्रामीण भागात राबविले जाणारे अभियान आहे. ज्या गावात ग्रामपंचायत आहे अथवा जी गावे ग्रामपंचायतीच्या अधिपत्याखाली आहे अशा गावात राबविले जाणारे अभियान म्हणजे संत गाडगेबाबा अभियान होय.

स्वच्छता म्हणजे स्वतःचे राहणीमान नीटनीटके व टापटीपपणे ठेवणे, त्याचा अंगीकार करणे ही वैयक्तिक स्वच्छता आणि व्यक्तीचे वास्तव्य असलेल्या ठिकाणाच्या आसपास केरकचरा न टाकणे, उघडयावर शौचास न बसणे व आपला परिसर परसबागांनी, फुलझाडांनी शोभीवंत व नीटनेटका ठेवणे म्हणजे स्वच्छता होय.

गांधीजींच्या ग्रामराज्याच्या संकल्पनेला जागून केंद्र पुरस्कृत ग्राम स्वच्छता कार्यक्रम रूपरेषा प्रथमतः नोव्हेंबर १९८६ मध्ये ठरविली त्यातील निकशामध्ये मार्च १९९१ मध्ये सुधारणा करून १९९३ मध्ये पुन्हा योजना सुरू झाली. एप्रिल १९९९ मध्ये सुधारित मार्गदर्शक तत्व आली, त्यात सर्वकश स्वच्छतेची संकल्पना रूजविली. नवव्या पंचवार्षिक योजनेच्या

अखेरपर्यंत किमान ५० टक्के ग्रामीण जनतेला स्वच्छतेच्या सोयी उपलब्ध करून देण्यासाठी कार्यक्रम हाती घेतला व संपूर्ण स्वच्छता अभियान राबविले. पहिल्या वर्षी रायगड, धुळे, नांदेड व अमरावती या जिल्ह्यात हा उपक्रम राबविण्यात आला.

भारत सरकारने या पार्श्वभूमीवर संपूर्ण स्वच्छता कार्यक्रम हाती घेतला केंद्रीय ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम या मार्गदर्शक पुस्तकात ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाचा मुळ उद्देश सांगितलेला आहे. तो पुढीलप्रमाणे ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमाचा मूळ उद्देश ग्रामीण जनतेचे आरोग्यमान उंचावणे, ग्रामीण भागात स्वच्छता कार्यक्रमाची व्यापकता वाढविणे, जाणीव जागृती आणि आरोग्यविषयक शिक्षण यातून स्वच्छतेच्या सुविधांची मागणी निर्माण करणे, ग्रामीण भागातील शाळा, अंगणवाडयातून स्वच्छतेच्या सुविधा निर्माण करणे व आरोग्यविषयक शिक्षण देणे, उघडयावर मलमूत्र विसर्जन करण्याच्या पदधतीचे निमूर्लन करणे, लोकांचा जीवनविषयक, शिक्षणविषयक दृष्टिकोन विधायक करून लोकांमध्ये ऐक्य निर्माण करणे.

या उद्दिष्टांनुसारच महाराष्ट्र शासनाने ग्रामीण जनेतचा विकास साधण्यासाठी सन २०००-२००१ पासून स्वच्छता अभियान सुरू केले. या अभियानाला संत गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा असे नाव दिले. या अभियानात जनतेतील सर्व घटकांचा सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केला जातो, व निश्चितपणे यश मिळते असे राज्यस्तरावर अभियानात यशस्वी झालेल्या अनेक गावांवरून लक्षात येते. ज्या गावात हे अभियान राबविण्यात आले त्या गावात दारिद्रयाची, दुष्काळाची व सामाजिक अस्वस्थेतेची कात टाकून राज्य वँ राष्ट्रीय स्तरावर बक्षीसपात्र ठरली आहेत, व संपूर्ण जीवनमानच बदलून गेल्याचे लक्षात येते.

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने सन २००० मध्ये जो शासन निर्णय निर्गमीत केला त्यानुसार संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धा, राष्ट्रपिता महात्मा गांधी स्वच्छ जिल्हा परिषद व स्वच्छ पंचायत समिती स्पर्धा, शालेय स्वच्छता अभियान या योजना राबविल्या. संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान या योजनांमध्ये मूळ आहे ते स्वच्छता आणि स्वच्छता ग्रामस्वच्छता अभियानाचा मूळ उद्देश ग्रामीण जीवन विकास साधने हा होय. त्यासाठी स्वच्छता अभियान हे साधन वापरले आहे. व त्या अनुशंगाने विकास करून भारत विकास हे स्वप्न पाहिले आहे. आज एकविसाव्या शतकातही स्वच्छता कशी पाळावी हे सांगण्याची, शिकविण्याची गोष्ट झाली आहे. एवढी उदासीनता स्वच्छतेच्या बाबतीत आढळते. स्वच्छता कार्यक्रमाचे अपयश लक्षात घेता महाराष्ट्र शासनातर्फे ग्रामीण जनेतचा विकास साधण्यासाठी सन २०००.०१ पासून महाराष्ट्र राज्यात **संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्रामस्पर्धा कार्यक्रम** सुरू केला. प्रस्तुत अभियानातून ग्रामीण जनतेचे आरोग्यमान, शैक्षणिक दृष्टिकोन, स्वच्छतेच्या सवयी, लोकसहभाग व जनजागृती इ. बाबींकडे विशेष लक्ष दिले जाते.

महाराष्ट्र राज्यात ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यामागचा उद्देश व अभियानाची गरज दर्शविणारे मुख्य मुद्दे शासनाच्या ग्राम विकास पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने सन २०००-०१ साली जो शासन निर्णय निर्गमीत केला त्यात पुढील बाबी दिल्या आहेत.

**ग्रामस्वच्छता अभियानाची उद्दिष्टे** :

१. ग्रामीण जनतेचे आरोग्यमान उंचावणे.

२. ग्रामीण भागात स्वच्छता कार्यक्रमांची व्यापकता वाढविणे.

३. जाणीव जागृती आणि आरोग्यविषयक शिक्षण यातून स्वच्छतेच्या सवयी लावणे.

४. ग्रामीण भागातील शाळा, अंगणवाडयातून स्वच्छतेच्या सुविधा निर्माण करणे व आरोग्यविषयक शिक्षण देणे.

५. उघडयावर मलमूत्र विसर्जन करण्याच्या पद्धतीचे निर्मुलन करणे.

६. लोकांचा जीवनविषयक, शिक्षणविषयक दृष्टिकोन विधायक करून लोकांमध्ये ऐक्य निर्माण करणे.

वरीलप्रमाणे अभियानाची उद्दिष्टये आहेत. या अभियानाची उद्दिष्टांनुसार महाराष्ट्रात ग्रामस्वच्छता अभियान राबविले जाते.

## ग्राम स्वच्छता कार्यक्रमाचे सरंचनात्मक अध्ययन

नोडल डिर्पाटमेंट, पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभाग

जिल्हा युनीट (३३ जिल्हा परिषदा)

ब्लॉक युनिट (३५१ पंचायत समित्या)

खेडे युनिट (२७९०२ ग्रामपंचायती)

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता समिती

## ग्राम स्वच्छता कार्यक्रमाअंतर्गत यशस्वी कार्यक्रमाचे मूल्यमापन

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता कार्यक्रमाअंतर्गत सन २०१३-१४ या वर्शात राबविण्यात आलेल्या विविध कार्यक्रमास प्राप्त गुणदानाचे अध्ययन पुढीलप्रमाणे

तक्ता क्र. १

ग्राम स्वच्छता कार्यक्रमाअंतर्गत यशस्वी कार्यक्रमांना प्राप्त गुण

| अ.क्र. | घटक | गुण |
|---|---|---|
| १ | पिण्याच्या पाण्याचे व्यवस्थापन | ३० |
| २ | वाया गेलेल्या पाण्याचे व्यवस्थापन | १५ |
| ३ | घरगूती शौचालय | ३० |
| ४ | स्वालीड वेस्ट डिसपोजल | २० |
| ५ | पर्यावरण संरक्षण | २० |
| ६ | व्यक्तीगत स्वच्छता | १० |
| ७ | माहिती आणि शिक्षण | १० |
| ८ | अपंरपरागत उर्जा स्त्रोत | १५ |
| ९ | कुटुंबनियोजन | २० |
| १० | लोकांचा सहभाग | २५ |
| ११ | सामाजिक संशोधन कृती | ०५ |
| | एकूण | २०० |

Source : B. K. Sawai (Director, WSSO) Government of Maharashtra Water Supply & Sanitation Departmenth

एकंदरीत ग्राम स्वच्छता अभियान हे ग्रामीण भागाला सुजल आणि निर्मल करण्याचा मार्ग आहे. स्वच्छतेतून समृद्धीकडे जाण्याचा मंत्र देणारा हा कार्यक्रम गावाला शौचालयाचा वापर करून आरोग्य जपण्याचा मार्ग सांगतो. या कार्यक्रमामुळे शिक्षणातून स्वच्छता, आरोग्य, पर्यावरण व शिक्षणविषयक दृष्टिकोनातून सकारात्मक परिवर्तन होऊन शैक्षणिक विकास होण्यास मदत करतो तसेच लोकांमध्ये ऐक्य व एकात्मता निर्माण होवून एकमेकांच्या सहकार्याने समाजाचा विकास साधण्यास मदत होते.

संदर्भ :


१. आहेरवाडकर एल.जे. २००४., शालेय स्वच्छतादूत कार्यक्रम, युनिसेफ पुरस्कृत अभ्यास अहवाल, औरंगाबाद.

२. कर्वे समीर, कायमस्वरूपी स्वच्छता तंत्रज्ञान.

३. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन दि. २००८ शासन निर्णय क्र. अभियान.१००८ प्र.क.१७७.पा.पु १६.


◆◆◆

# स्वच्छता विकासासाठी शारीरिक शिक्षण व खेळ



अजय श्री. बोंडे
शारीरिक शिक्षण संचालक
कला वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरब – ४४५२०१
ता. दारव्हा, जि. यवतमाळ
इमेल: ajaysbonde@gmail.com

**सारांश :**

आदिकाळापासून मानवाने आजपर्यंत केलेली वाटचाल ही त्याच्या शारीरिक आणि मानसिक क्षमतेवर केल्याचे दिसून येते. या बळावरच मानवाने विकासाच्या प्रक्रियेत मोठे यश संपादन केले आणि त्यातून आजचा आधुनिक मानव आपल्याला दिसून येतो. मानवाच्या उत्क्रांतीवादात त्याला अनेक संघर्षातून समोर जावे लागले. त्यातूनच लयबद्ध हालचाली तो करू लागला व खेळा या संकल्पनेचा जन्म झाला. आधुनिक व पुरातन काळात ग्रीकांच्या बरोबर भारतीय संस्कृतीमध्ये स्वच्छता, आरोग्य आणि शारीरिक शिक्षण व खेळ यांना समाजामध्ये महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. प्राचीन ग्रथांमध्ये व्यायामशास्त्राचे अनेक दाखले व विवेचन आढळून येते व त्याचा प्राचीन भारताच्या विकासाच्या प्रक्रियेत फार मोठा हातभार लागल्याचे दिसून देते. संत, समाजसुधारक, थोर पुरुष आदिंनी स्वच्छता व आरोग्याच्या संदर्भात भारताच्या विकासात फार मोठे योगदान दिल्याचे दिसून येते.

**प्रस्तावना :**

मानवी विकास ही संकल्पना अत्यंत व्याप्त असून या संकल्पनेचे विवेचन करताना मानवी जीवनाचा इतिहास अभ्यासने आवश्यक आहे. जर्हज विल्यम हिगेल याने Science of Logic या महान ग्रंथात असे मत मांडले की, "निरपेक्ष भाव म्हणजे प्रज्ञा अथवा आत्मा असे संबोधले. या बाबी स्थिर नसून गतीशील आहेत. त्यामुळे मूळ स्वरुपातून विकासाचा सिद्धांत म्हणून गतीशीलतेचा विचार केला व त्यातून परिवर्तन, वृद्धी अथवा विकास या नित्य विश्व प्रक्रिया असून तो जीवनाचा एक निरपेक्ष भाग आहे." विकासाची प्रक्रिया वाद (Thesis), प्रतिवाद (Antithesis) किंवा संश्लेषण (Synthesis) या तीन प्रक्रियेतून होत असते. हिगेलच्या नुसार Real is the Rational and Rational is the Real असून त्यासाठी ऐतिहासिक घटना ह्या आंतरिक शक्ती व ग्रहण संबंध अभिव्यक्त करते. त्यामुळे मानवाचा इतिहास हा विकासवादी प्रक्रियेचा इतिहास असून विकासाची अंतिम सीमा मनुष्य होय. जगातील आतापर्यंतच्या बदलात मनुष्य हेच सर्वोच्च रुप आहे. श्री अरविंद घोष यांच्या नुसार मानवाची निर्मिती ही विकासाच्या प्रक्रियेतील अत्युच्च पायरी होय. त्यामुळे चेतनेची प्रगती हाच एक इतिहास होय.

मानववंश शास्त्रज्ञ डह. जी.एस. महापात्रा म्हणतात हिमालयाच्या पायथ्यामधील शिवालिक पर्वत मालेच्या भूप्रदेशात सर्वप्रथम आदिमानवाने उत्क्रांती करून आधुनिक मानव जगासमोर आला. या उत्क्रांतीच्या प्रक्रियेमध्ये आधुनिक मानवाच्या स्वरुपावर ग्रीक लोकांचा सगळ्या जगावर प्रभाव दिसून येतो. परंतु, ग्रीकांच्या पूर्वी भारतीयांनी वेदांच्या माध्यमातून आधुनिक मानवाच्या विकासात महत्वपूर्ण योगदान दिलेले दिसून येते.

**शारीरिक शिक्षण व खेळाची प्राचीन पार्श्वभूमी :**

मानवाच्या उत्क्रांतीवादाचा जेव्हा आपण उल्लेख करतो, तेव्हाच त्याच्या शारीरिक हालचालींसंबंधी आपण विचार करू लागतो. या हालचाली आपल्या नित्य व दैनंदिन जीवन जगण्यासाठी कराव्या लागणाऱ्या संघर्षातून विशिष्ट लय प्राप्त झाली व त्यातून खेळ या संकल्पनेचा जन्म झाला असावा.

भारतीय विचारधारेनुसार मानवी जीवनाची सार्थकता पुरुषार्थाच्या चतूःपदीमध्ये मान्य केली आहे. चे चार पुरुषार्थ धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष आहेत. या चार मध्ये एक शृंखला आहे. चारही पुरुषार्थ प्राप्त करण्याची जी साधने आहेत त्यामध्ये 'शरिराला' आद्यसाधन मानल्या गेले आहे. म्हणूनच "शरीरमाद्यं खुल धर्मसाधनः" असे म्हणतात. मानवी जीवनाची सार्थकता अर्थातच पुरुषार्थाचा मुख्य आधार शरीर आहे. म्हणून शारीरिक शिक्षण व खेळाची संकल्पना संपूर्णतः शरीरशास्त्रावर आधारित आहे.

शरीरशास्त्र म्हणजे मानवी शरीरासंबंधीच्या संपूर्ण तथ्यांचा सांगोपांग विवेचन करणारे शास्त्र मुख्यतः याचे आपल्याला दोन भाग करता येतील. (१) व्यायामशास्त्र (२) चिकित्साशास्त्र. प्राचीन ग्रंथांमध्ये दोन्ही शास्त्रांचा विकास झाल्याचे आढळून येते.

व्यायामशास्त्राचे महत्व, व्याख्या प्राचीन ग्रथांतून दिसून येत असल्यामुळे त्याचे महत्व विषद होते.

(१) तलभ्रमणुणाकर्षधनुराकर्षणादिभीः।
आयोमो विविधोऽङ्गनां व्यायाम इति
कीर्तितः ।। (धनुर्वेद)

(२) शरीरायासज्नकं कर्म व्यायमसंज्ञितम् । (सुश्रुत)

(३) आदित्यस्य नमस्कारं ये कुर्वन्ति दिने दिने ।
जन्मान्तरसहस्त्रेषु दारिद्यं नोपजायते ।

वरील कथनानुसार शारिरिक हालचाली मानवाच्या जन्मापासूनच होतात. व्यायामाची क्रिया मानव निर्मितीपासूनच सुरू होते. मानव निर्मितीपूर्वीची कथा ही भूगर्भशास्त्र व जीवशास्त्र या क्षेत्रांच्या अखत्यारितील आहे. मानवी जीवनाचा उदय या धरतीवर झाला तेव्हा वातावरणातील समस्य जनजाती या अस्तित्वात होत्या. उदा. वृक्ष, प्राणी, पक्षी, नद्या, वर्षा इत्यादि. या प्रकृतीतच मानवाचा विकास होत गेला. मानवाच्या आदिकालाचा विचार केला असता, त्याकाळी जीवनाचा एकमात्र सहारा त्याचे शारीरिक आणि मानसिक बलच होते. या बलाचे संवर्धन त्याच्या दैनिक व्यवहारातून होत होते. परंतु, त्याचे सुनियोजन त्याच्या व्यवहारातून होत गेले व त्यातूनच सुव्यवस्थित हालचालींचा जन्म झाला. ज्याला आपण वरील व्याख्या, विवेचनानुसार व्यायाम अथवा शारीरिक शिक्षण म्हणू लागलो.

वैयक्तिक व सांघिक व्यायामाच्या सुनियोजनातूनच 'खेळ' या संकल्पनेचा जन्म झाला असावा असे वाटते. तसेच खेळ हा मानवाच्या उत्क्रांतीच्या प्रक्रियेतलाच एक भाग संरक्षणासारख्या काही गरजेपोटी तर काही सहजपणे होणाऱ्या माणसाच्या शारीरिक हालचालीतून स्वतःचं मनोरंजनही करून घेण्याची समज त्याला आली असावी. त्यातच 'खेळ' या भावी संकल्पनेची बीज पेरली गेली.

खेळ ही संकल्पना अतिप्राचीन आहे. 'प्राचीन' म्हणजे किती प्राचीन असावी याचा केवळ अंदाज करणेही अशक्य आहे. याबाबत फार तर इतकं म्हणता येईल की, मानवाच्या प्रगतीच्या वाटचाली त्याला जेव्हा स्वतःच्या मनोरंजन करून घ्यावेसे वाटू लागण्याऐवढी त्याची बौद्धिक प्रगती झाली, याच मानसिकतेतून 'खेळ' जन्माला आला.

**स्वच्छता, आरोग्य आणि शारीरिक शिक्षण व खेळ :**

देशाच्या विकासाच्या संदर्भात सुदृढ आरोग्य असणाऱ्या व्यक्तीला फार महत्व आहे. कारण असे म्हणतात ज्या देशाचे नागरिक सुदृढ तो देश सुदृढ. व्यक्तीचे आरोग्य हे अनेक घटकांवर अवलंबून असते. हे मानवी विकासाच्या निर्देशांकाचे अवलोकन केल्यास दिसून

येते. कोणत्याही देशाचा विकास हा त्या देशाच्या चलनाचा दर आंतरराष्ट्रीय चलनाच्या (युरो, डहलर) दराशी तपासून ठरवला जातो व त्यावरून देशाचा आर्थिक विकास किती झाला हे ठरवितात अशी ढोबळमानाने आतापर्यंत देशाच्या आर्थिक विकासाची व्याख्या केली जात असे. परंतु, अलिकडच्या काळात या संकल्पनेत बदल झाला असून त्यामध्ये आता मानवी विकास निर्देशांकाला फार महत्व दिल्या गेले. त्यात व्यक्तीच्या (Individual) सर्वांगीण विकासाला महत्व दिल्या गेले आहे. जसे एखाद्या देशाच्या व्यक्तीचा शारीरिक, मानसिक, सामाजिक विकास किती झाला यावरून मानवी निर्देशांक काढतात व त्यावरून देशाचा मानवी विकास निर्देशांक काढला जातो. त्या आधारावर त्या देशाचा विकास किती झाला हे ठरविल्या जाते. या व्याख्येमध्ये व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाला महत्व दिल्याचे दिसून येते. जी शारीरिक शिक्षणाची व्याख्या आहे.

स्वच्छता आणि आरोग्याचा संबंध अन्योन्य आहे आणि या दोन्हीचा संबंध व्यक्ती आणि समाजाच्या आरोग्याशी आहे. या दोन्हीमध्ये बिघाड झाल्यास त्याचा थेट परिणाम देशाच्या विकासाच्या प्रक्रियेवर दिसून येतो. म्हणून स्वच्छतेच्या व्याख्यासोबतच काही मान्यवरांची मते स्वच्छतेच्या संदर्भात आपण पाहू.

**व्याख्या :**

(१) सामाजिक प्रतिष्ठा, सामाजिक विकास, शिक्षण आणि सार्वजनिक आयोग्य हे स्वच्छतेचे मूलभूत आधार असून स्वच्छता हा नागरिकांचा हक्क आहे.

(२) स्वच्छता हा मानवी जीवनाचा मूलभूत हक्क आहे कारण मानवी जीवनात स्वच्छतेला अनन्य साधारण महत्व आहे.

वरील व्याख्यांचा अभ्यास केला असता मानवी जीवनात स्वच्छतेचे महत्व कळते.

**स्वच्छतेबाबत गांधीजींचे विचार :**

(१) "स्वच्छता ही स्वातंत्र्यापेक्षा जास्त महत्वाची आहे. (Sanitation is more Important than Independence)

(२) आपली स्वच्छता ही अंतरबाह्य असायला हवी.

(३) मनाची आणि देहाची स्वच्छता ही शिक्षणामधील पहिली पायरी. आपला परिसर स्वच्छ करण्याचे काम जसे बादली आणि झाडू करतात तसे मनाचे शुद्धीकरणाचे काम हे प्रार्थना करते.

(४) प्रत्येकानी स्वतःच्या स्वच्छतेकरिता हातात झाडू घेतलाच पाहिजे.

(५) जर मन स्वच्छ असेल तर देह देखील स्वच्छ असेल.

(६) गावही शरीर । त्यास राखावे नेहमी पवित्र।
त्यानेच नांदेल सर्वत्र । आनंद गावी ।।
म्हणोनी स्वच्छ ठेवावे दुकान, धर ।
नाल्या मोऱ्या-सडका चौफेर ।
मग रामधूनची फेरी सुंदर ।
काढावी आबालवृद्धांनी ।।
– राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

(७) मन करा रे प्रसन्न ।
सर्व सिद्धीचे कारण ।।

स्वच्छता पाहून मन प्रसन्न होतें हा सर्वांना अनुभव आहे. प्रसन्नता फार मोठी शक्ती होय असे संत गाडगेबाबा तुकाराम महाराजांच्या शब्दात सांगतात.

(८) ग्राम आरोग्य अर्थात राष्ट्रीय आरोग्याचा स्वच्छता हा मूलभूत पाया आहे असे गाडगेबाबा स्वच्छतेबद्दल सांगतात.

प्राथमिक शाळांमधील विद्यार्थी ते ज्येष्ठ नागरिक अशा लोकसंख्येच्या प्रत्येक घटकाला स्वच्छतेच्या

सार्वजनिक तथा व्यक्तिगत आरोग्याशी असलेल्या संबंधांबाबत संवेदनशील करणे गरजेचे आहे. शारीरिक शिक्षण व खेळाचा या प्रत्येक घटकाशी संबंध येत असल्यामुळे आणि स्वच्छता व आरोग्याच्या संबंधी मान्यवरांची मते, व्याख्या यावरून शारीरिक शिक्षण व खेळ या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश समाजातील प्रत्येक घटकांपर्यंत पोहचविल्या जावून त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होवू शकते कारण खेळामध्ये व्यक्तीच्या आंतरबाह्य स्वच्छतेला तसेच परिसर स्वच्छतेला थोडक्यात सार्वजनिक स्वच्छतेला फार महत्व आहे. म्हणून शारीरिक शिक्षण व खेळाद्वारे स्वच्छता व आरोग्य याचा प्रचार व प्रसार करून देशाच्या विकासाच्या प्रक्रियेत मोलाची भूमिका बजावल्या जावू शकते. त्यासाठी खालील बाबींचा विचार होणे गरजेचे आहे.

* जनजागृतीची गरज
* स्वच्छतेचे सामाजिक आणि व्यावसायिक पैलू
* प्रशासकीय संस्थांमध्ये समन्वय
* व्यापक दृष्टीकोन
* तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर
* वंचितांपर्यंत पोहचविणे
* पुरवठा-गरज यातील तफावर दूर करणे
* क्षमता वाढ प्रशिक्षण
* देखरेख आणि मूल्यांकन
* पुरस्कार देणे

संदर्भ :


१. अग्रवाल त्रिशा, "भारतातील शहरी स्वच्छता : भरकटलेली विकासाची गाथा", <u>योजना</u> (विशेषांक), नवी मुंबई : अंक ६, जानेवारी २०१५, पृ.कं., १.

२. कबाडे चंद्रकांत, "स्वच्छतेतून सामाजिक बदलाकडे", <u>योजना</u> (विशेषांक), नवी मुंबई : अंक ६, जानेवारी २०१५, पृ.कं., २४.

३. पाठक के. एन., "स्वच्छ भारत, अभियान : प्रगतीशील भारतासाठीचे साधन", <u>योजना</u> (विशेषांक), नवी मुंबई : अंक ६, जानेवारी २०१५, पृ.कं., ५४.

४. "स्वच्छता आणि मल:नित्सारणावर महात्मा गांधीजीचे विचार", <u>योजना</u> (विशेषांक), नवी मुंबई : अंक ६, जानेवारी २०१५, पृ.कं., ५९, ६०, ६१.

५. विभूते पी. ई., "मानवी उत्कांती, स्वच्छतेतून सामाजिक विकास", <u>योजना</u> (विशेषांक), नवी मुंबई : अंक ६, जानेवारी २०१५, पृ.कं, ७१, ७२.

६. बोंडे अजय, "भारतीय व विदेशी खेळांच्या प्रचार व प्रसाराकरिता महाराष्ट्र राज्यातील वृत्तपत्रांमध्ये दिल्या जाणाऱ्या स्थानांचे तुलनात्मक अध्ययन", अप्रकाशित शोधप्रबंध, अमरावती : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, २०१४.

७. अजमेर सिंग, जगदीश बंस, जगदार सिंग इ., <u>इसेंन्सीयल्स ऑफ फिजीकल एज्युकेशन</u>, न्यु दिल्ली : कल्याणी पब्लीशर, तिसरी आवृत्ती, २००५, पृ.क्र., १.

८. हिवरे ह. रा., <u>श्री संत गाडगे बाबा विचार धन</u>, मुंबई : प्रशांत प्रिंटर्स, १९९९, पृ.क्र., ५.

९. दाण्डेकर गोपाल निलकण्ठ, <u>देवकीनंदन गोपाला ! श्री संत गाडगेबाबा</u>, पुणे : दुसरी आवृत्ती, २००६.

१०. शर्मा व्ही. के., <u>हेल्थ अँड फिजीकल एज्युकेशन</u>, न्यु दिल्ली : न्यु सरस्वती हाऊस (इंडिया) प्रा. लि., २०१५.


◆◆◆

# भारतातील निर्माणी क्षेत्र स्थिती व समस्या

## (संदर्भ : मेक इन इंडीया)

सुभाष आर. गुर्जर
कला, वाणिज्य महाविद्यालय,
वरवट बकाल, जि. बुलडाणा.
मो. ९४२३९१२८२१

**प्रस्तावना :**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मेक इन इंडीया आणि स्किलींग इंडीया हे दुरदृष्टीने पाहीलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी व भारतातील विकासाला चालना देण्याकरीता विदेशी सहकार्याची अपेक्षा व्यक्त करुन देशाचा विकास साधण्याचा मानस व्यक्त केला. त्याकरीता निर्माणी क्षेत्राकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. त्यासाठी भारताला जागरुकतेने नविन उदयमशीलता धोरण अंमलात आणणे गरजेचे होते. उत्पादन स्पर्धात्मकतेबरोबर, कौशल्यावर आधारीत रोजगार वाढविणे, प्रशिक्षण कार्यक्रम ईत्यादीचा वापर, बौध्दीक हक्क जोपासणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने भारतीय नव उद्योजकांना पाठींबा देण्याच्या दृष्टीने अवलंबिलेले स्कीलींग इंडीया हे धोरण परिणामकारक ठरेल.

अर्थव्यवस्थेमध्ये उद्योग संस्थांना अतिशय महत्वाचे स्थान आहे. समाजकल्याण राष्ट्रविकास व राष्ट्राच्या आर्थिक व औद्योगिक विकासामध्ये उद्योग क्षेत्राचे योगदान मोठे आहे. वास्तविक ज्या देशात अक्षरशा साधी टाचणीही तयार होत नव्हती, तो देश आज अणुयुगात व अवकाशयुगात संचारतो आहे. पोलाद, सिमेंट, रासायनिक खते, इंधन तेल, इंधन वायू, खनिजे, अवजड मशिनरी, यंत्रोत्पादन, विमान व जहाज बांधणी, रेल्वे, बस, ट्रक, वाहतूक साधने, दुरध्वनी, दूरचित्रवाणी इत्यादी सेवासुविधेबाबत देश आज स्वयंपूर्ण बनला आहे. आज औद्योगिक उत्पादनात भारताचा समावेश पहिल्या आठ देशात होतो. आज बहुतांश विकसित देशांचा विकास हा औद्योगिकरणातूनच झालेला आहे. जोपर्यंत देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात प्राथमिक क्षेत्राचे योगदान जास्त असते तोपर्यंत त्या देशाचा आर्थिक विकासाचा वेग मंद असतो. अशा अर्थव्यवस्थेला अविकसित समजल्या जाते. भारतात औद्योगिक विकासाचा त्यात निर्माण झालेल्या समस्यांची सोडवणूक करण्याच्या दृष्टीने सरकारने उपाययोजना राबविल्या आहे.

काही अर्थशास्त्रज्ञांच्या मते, विकासाला प्रोत्साहीत करण्याकरीता अंतर्गत व बाह्य मितव्ययता प्राप्त होणे आवश्यक आहे. प्रो. एलिन यंग व रोजेनस्टीन रोडान यांनी अशा उद्योगाच्या विकासावर भर दिला, जे उद्योग इतर उद्योगगाच्या वृध्दीकरीता बाह्य मितव्ययता निर्माण करतात, अशा उद्योगामध्ये केलेली गुंतवणूक, कमी उत्पन्नाचे दुष्टचक्र भेदण्याकरीता, बाजारातील अपूर्णता दुर करण्याकरीता सहाय्य करते. तसेच गुंतवणूकीची प्रेरणा निर्माण करुन अल्प उत्पादकतेला रोखण्यास मदत करते. अर्थव्यवस्थेतील पुरवठा बाजूकडून या मितव्ययता मिळविण्याकरीता ऊर्जा, दळणवळण, संदेश वाहक, अधिकोष, प्रशासन यांचा विकास आवश्यक आहे. तर मागणी बाजूकडून

आरोय सेवा, शिक्षण व्यवस्था, भूपरिवहन, लोह परिवहन, जलसिंचन सुविधाव्दारे सामाजिक आर्थिक आधारभूत संरचना निर्माण केल्या जावू शकते म्हणजेच विकासाकरीता आधारभूत संरचना म्हणजेच निर्माण क्षेत्राचे महत्व अनन्यसाधारण आहे.

देशात विकासासाठी आवश्यक असणारे घटक भांडवल वगळता पुरेशा प्रमाणात उपलब्ध असून सुध्दा आपला देश विकसित अवस्थेत का बसला नाही, हा विचार समोर येवून भारताच्या अर्थव्यवस्थेत अमुलाग्र बदल करण्याच्या उद्देशाने व भारतात विदेशी भांडवलाचा प्रवाह निर्माण करण्याच्या हेतूने विद्यमान सरकारने २५ सप्टेंबर २०१४ मध्ये मेक इन इंडीया या प्रकल्पाच्या माध्यमातून भारतीय अर्थव्यवस्था जगातील गुंतवणूकदारांना उपलब्ध करुन देण्याचे ठरविले आणि हे धोरण म्हणजेच मेक इन इंडीया होय.

**शोध निबंधाची उद्दिष्ट्ये :**

१) भारतातील निर्माणी क्षेत्रातील विकासाची सद्य:स्थिती अभ्यासणे.

२) भारतातील निर्माणी क्षेत्रामधील अडचणी व समस्यांचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात आला असून त्यात प्रकाशित व अप्रकाशित पुस्तके, वर्तमानपत्रे तसेच संकेतस्थळे इत्यादीचा वापर करण्यात येऊन संकलीत माहितीच्या आधारे शोधनिबंधाची योग्य मांडणी करण्यात आली आहे.

**रस्ते :**

रस्त्याची उपलब्धता ही आर्थिक विकासामधील महत्वाची बाब आहे. देशातील भुपृष्ठ वातूक मंत्रालयामार्फत वर्षभरात १.५० लाख किंमतीचे रस्ते बांधण्यात येतील. पंतप्रधान ग्राम सडक योजना माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी सुरु केली या योजनेत १.७ लाख खेडी रस्त्यांनी जोडली गेली. रस्ते म्हणजे विकास हे समीकरण असते. युपीए सरकारच्या काळातील रखडलेल्या महामार्ग निर्मीतील प्रकल्पाचे पुनरुज्जीवन करण्याचा निर्णय एनडीए सरकारने घेतला त्यानुसार नोव्हेंबर २०१५ पर्यंत ५० टक्के काम झालेल्या प्रकल्पांना आर्थिक मदत देवून ते पूर्ण केले जातील. भ्रष्टाचार व निधीअभावी रखडलेल्या प्रकल्पांना मदत देवून ते पूर्ण करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरण, अर्थ सहाय्य देणारी वित्तीय संस्था आणि संबंधित यंत्रणा यांच्यात त्रिपक्षीय करार केला जाणार आहे.

